म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५५६
REFBK-0024434
REFBK-0024434

## पी. सावळाराम

### गीत संग्रह

भाग पहिला

# गंगा जमुना

REFBK-0024434

REFBK-0024434

संपादक-

रमेश वैद्य

प्रदीप गुजर

प्रकाशिका :
**डॉ. (सौ.) कल्पना पाठारे**
चांदुली प्रकाशन
जीवन दीप बिल्डींग,
ठाणे रेल्वे स्टेशन समोर (पूर्व)
ठाणे — ४००६०३

•

© **पी. सावळाराम**

•

मुखपृष्ठ :
**कमल शेडगे · मोहन वाघ**

•

छायाचित्रें
मांडणी } **आल्हाद वैद्य**

•

वेष्टन छपाई :
श्री साधना आर्ट प्रिंटर्स
लोअर परेल मुंबई

•

मुद्रक :
**जयराम बाबुराव नाईक**
वसुंधरा आर्ट प्रिन्टर्स
हटाळे-नागांव अलिबाग-रायगड


•

प्रथमावृत्ती : **आक्टोबर १९८४**

•

मूल्य : **पन्नास रुपये**

ज्यांच्यामुळें मी पी. सावळाराम झालो त्या
स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर
स्वरकिन्नरी आशा भोसले
व संगीत दिग्दर्शक कै. वसंत प्रभू
या बिल्वदलास
सादर समर्पण



# शुभेच्छा

पी. सावळाराम हे नाव त्यांच्या रसपूर्ण आणि भावगर्भ गीतांच्या द्वारा, महाराष्ट्रातील असंख्य घरांपर्यंत, नव्हे, त्या घरांच्या स्वयपाकघरांपर्यंतही पोचलेले आहे. खानदानी दिवानखान्यांपासून, गोरगरिबांच्या ओटी ओसरीपर्यंत सर्वत्र या नावाचा संचार झालेला आहे. नागर वस्तीच्या वेशीवर ते थांबलेले नाही. ग्रामीण भागातील झोपड्यांत आणि चावडीचव्हाटयावरही त्यांचे स्वागत झालेले आहे. गेल्या तीस चाळीस वर्षात, पी. सावळारामांच्या शंकडो गीतांचा वर्षाव, पारिजातकाच्या फुलांप्रमाणे असंख्य श्रोत्यांच्या कानांवर आणि रसिकतेवर झालेला आहे. भावगीत, भक्तिगीत, चित्रपटगीत, या सर्वच क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करणाऱ्या त्यांच्या लेखणीने त्यांचा जनकवी या पदवीवरील अधिकार प्रस्थापीत केला आहे. इतकी लोकप्रियता मिळविणाऱ्या कवीचा गीत-संग्रह इतक्या उशीराने निघतो आहे हे अेक आश्चर्यच आहे. पण तो निघतो आहे हा आनंद आहे. "हरवले ते गवसले" असे समाधान या संग्रहामुळे ती गीते अैकणाऱ्या असंख्याना आता मिळू शकेल.

लता मंगेशकर, आशा भोसले यांच्यासारख्यांना अमृततुल्य स्वरांचा लाभ या गीतांना लाभला, हे त्या गीतांचे थोर सद्भाग्य होते, यात शंकाच नाही. पण हा व्यवहार अेकतर्फी नव्हता. "गंगाजमुना," "बाळा होउ कशी उतराई," "जो आवडतो सर्वांना," अशी मनोज्ञ गीते त्या स्वरसम्राज्ञींना उपलब्ध झाली, हा त्यांच्या दृष्टीनेही अेक विशेष लाभ होता. या सुंदर संयोगाने, महाराष्ट्रातील अगणीत रसिकांना, कारूण्यापासून शृंगारापर्यंत, अनेक रसांचा उत्कट आणि आल्हाददायक अनुभव दिलेला आहे. "गंगाजमुना" हे गीत अैकताना ज्याचे अंत:करण भरून आले नाही, आणि पापण्या ओलावल्या नाहीत, असा श्रोता शोधूनही सापडणार नाही. मी स्वत: वधूपिता नाही, पण घरातल्या आणि आप्तमित्रांच्या मुली सासरी जाण्याचे प्रसंग मी पाहिले आहेत, आणि या गीतात व्यक्त झालेल्या भावनाना अनुभवलेही आहेत. या प्रसंगातील कांही तपशीलांचे नाट्य आणि कारूण्य सावळारामांनी अचूक टिपले आहे आणि आपल्या प्रासादिक शैलीत शब्दबद्ध केले आहेत. कितीतरी आई-वडलांना हे गीत कवीने खास आपल्यासाठी लिहिले आहे असे वाटले असेल.

"गंगा जमुना" च्या गंगोत्रीत उगम पावलेला हा गीतप्रवाह पुढील काळात अनेक धारांनी वाहू लागला, सांसारिक जीवनातील विविध भावनांचा आणि

रसांचा अविष्कार करू लागला. बोहल्यावर चढणाऱ्या वधूपासून, संसार सजविणाऱ्या गृहिणीपर्यंत, स्त्रियांच्या मनात उद्‌भवणाऱ्या भावना कल्पना हे त्यांच्या गीतांचे खास वैशिष्ट्य आणि बलस्थानही. याच अनुरोधाने कारुण्याबरोबर वात्सल्य, शृंगार आणि भक्ती या रसांच्या बाबतही त्यांच्या लेखणीने लक्षणीय यश संपादन केले आहे. सर्वसाधारण घरातील सुसंस्कृत, संसारी माणूस हा त्यांनी आपला श्रोता-वाचक गृहीत धरलेला आहे. आणि म्हणून त्यांचा शृंगार कधी बीभत्साला स्पर्श करीत नाही, किंवा त्यांचा भक्तीभावही कधी संन्याशाची कफनी अंगावर चढवीत नाही. कौटुंबिकता ही त्यांच्या गीतलेखनाची मर्यादा आहे, त्याचप्रमाणं ते त्यांचे सामर्थ्यही आहे. समोर ठेवलेल्या उद्दिष्टात सावळारामांनी आपल्या सरळ, जिव्हाळ्याच्या आणि अक्लिष्ट शैलीमुळे उदंड यश मिळविले आहे, जे हवे होते ते साध्य केले आहे. म्हणूनच लता-आशाच्या स्वरांनी अमृत केलेली ही गीते, घराघरातल्या मुलीबाळी मोठ्या तन्मयतेने आळवू लागल्या. कितीतरी नववधूनी, "गाणं म्हण" असा आग्रह झाल्यावर, "कृष्णा मिळाली कोयनेला" हे गीत लाजत लाजत आप्तमित्रांपुढे सादर केले असेल. नव्याने "आई" झालेल्या कितीतरी मातांनी आपल्या बालकाना आपल्याकडे भिजल्या नजरेने पाहात "तुझ्यामळे मी झाले आई" हे गाणं स्वतःशी वा प्रगटपणाने गुणगुणले असेल आईबापांच्या सेवेत रमलेल्या अनेक विठ्ठल भक्तांनी "कशाला जाऊ मी पंढरपूरी" या शब्दांतून आपले मन व्यक्त केले असेल. वाङ्मयाच्या व्यवहारापासून दूर असलेल्या अशा अनेकांच्या मनोगतांना या गीतांनी अभिव्यक्तिचे समाधान दिले, आहे. जे दबलेले, साचलेले, त्याला प्रवाहाची वाट काढून दिली आहे. हे त्यांचे कार्य वाङ्मयाच्या आणि सर्वसाधारण नागरिकातील रसिकतेचा परिपोष करण्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आणि गौरवास्पद आहे. मला स्वतःला त्यांचे सर्वाधीक आवडलेले गीत म्हणजे "जो आवडतो सर्वाला" हे होय. मी ते अनेकदा ऐकले आहे आणि पुढही ऐकत राहीन. किती साध्या पण सुंदर शब्दांत सावळारामांनी सुजनत्वाचे वर्णन या गीतात केले आहे!

घेउनि पंगू आपुल्या पाठी
आंधळ्याची होतो काठी
पायाखाली त्याच्यासाठी
देव अंथरी निजहृदयाला।।

अशा हृद्य ओळी लिहिणाऱ्या या कवीचा हा गीतसंग्रह मराठी वाचकांना प्रिय होईल यात मला शंका वाटत नाही.

— वि. वा शिरवाडकर.

# श्री शक्ति

ब. मो. पुरंदरे
१५०० सदाशिव
पुणे २

श्री शिवराज्याभिषेक शके
२८९
आषाढ वद्य ९ बुधवार

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री सांवळाराम
प्रती सेवक ब. मो. पुरंदरे
सेवेसी सा. न. वि. वि.

कल्पनाहि नसताना आपली भेट अगदी अचानकपणे तळेगांवास श्री. गो. नी. दांडेकर यांच्या घरी झाली. मला खरोखर अतिशय आनंद झाला. त्या दिवसापूर्वी, आपल्या मधुर आणि सौंदर्यश्रीमंत काव्यामुळे आपणास कमीत कमी बारा वर्षे ओळखत होतो. प्रत्यक्ष भेट सोमवारी झाली. श्री. ग. रा. कामत यांनी जेव्हां, "हे श्री. पी. सांवळाराम !" म्हणुन परिचय करून दिला, तेव्हां तर मी अत्यंत कुतुहलाने आणि आदराने आपणाकडे बघतच राहिलो. "हे हे हे हे ते पी. सावळाराम ? ज्यांची पद्यरचना आम्ही तृषार्त कानाने आणि अतृप्त मनानें ऐकतो, ते ते पी. सावळाराम हे ?" असा भाव माझ्या मनामध्ये उचंबळून आला.

आणि नंतर तर आपल्या तोंडून ते अप्रतिम महाराष्ट्रगीत ऐकून मला अपरंपार आनंद झाला. आणि म्हणूनच मी स्वत: होऊन आपल्या त्या काव्याचा 'अति आदरें लेखकू जहालो.'

आपल्या रचनांनी आम्ही लोक अक्षरशा मुग्ध होऊन जातो. अत्यंत तरल आणि समर्थ प्रतिभेचे आपण आजचे महाराष्ट्र भाषेचे भूषण आहात. मी स्तुति करीत नाही. प्रशस्तिपत्रकहि देत नाही. ते द्यावें असा माझा अधिकार नाही आणि वयहि नाही. पण हे माझे आणि महाराष्ट्रातल्या – निदान माझ्या परिचयातल्य अनेक रसिकांचे अनुभवाचे व अनुभूतीचे बोल आहेत.

परंतु माझ्या मनांत गेली दोन वर्षे तरंगणारे विचार अगदी प्रामाणिक अंत:करणाने आपणास कथन करूं का ? आपण माझ्यावर रागावणार नाही नां ? आपण आजच्या महाराष्ट्रातले एक अत्यंत प्रभावी कवि आहांत ही तर वस्तुस्थि-

तीच आहे. आपण आजवर अनेक उत्तम गीते चित्रपटांच्या व ध्वनिमुद्रिकांच्या द्वारे मराठी कानामनाला दिली आहेत. आपण असंख्य कुटुंबांत कांही एक न्याराच आनंद ओतला आहे. हें सारं खरं आहे. पण हे सर्व आपल्या प्रतिभेचे 'बाय प्रॉडक्ट' आहे! आपल्यापुढे ओंजळ करून एक नम्र मागणं आहे की, आपण मराठीला एक तरी 'अ-क्षर' अलंकार द्यावा. की जो अलंकार चिरकाल मराठीच्य गळयांत आणि मराठ्यांच्या हृदयांत झगमगत राहील. आपल्या प्रतिभेतून 'शिवछत्रपति' अक्षर व्हावेत! माझ्यासारख्या रायगडच्या वारकऱ्याने दुसरं काय मागावं? लहान तोंडी मोठा घांस घेतल्याबद्दल क्षमा असावी. बहुत काय लिहिणे?

आमचे अगत्य असो द्यावें

विज्ञापना.

ब. मो. पुरंदरे

॥ श्री ॥

# ऋणांकित

"गंगा-जमुना" हा गीतसंग्रह पुस्तकरूपानें प्रथमच मी रसिक चरणी समर्पित करीत आहे. खरं पाहील असता ही सारी गीतं ध्वनिमुद्रित होऊन रसिकांच्या घरोघरी आधीच पोचलेली आहेत. रसिकांनी ही गीतं दत्तक घेतलेली आपत्य आहेत. मी केवळ जनक बाप आहे. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि तिची भगिनी स्वर किन्नरी आशा भोसले यांनी या गीत बाळांचा पाळणा आपल्या अमृततुल्य स्वर माधुरीनं जोजोवलेला आहे. मी व संगीत दिग्दर्शक कै. वसंत प्रभू मिळून त्या आपत्यांचे प्रारंभीचे संगोपन करीत होतो. नंतर त्यांचं लालन पालन रसिकहो तुम्हीच वत्सलतेनं केलं आहे.

मी नावाचा जनक बाप आहे. खरं तर शब्दसृष्टीचा ईश्वरच त्याचा जन्मदाता आहे. त्यानं शब्द रुपानं माझ्या घरी ही बाळं जन्माला घातली.

ही सारी मुलं एके दिवशी माझ्याकडे आली आणि म्हणाली. बाबा ! आम्हाला घरोघरी सर्व रसिक मायबापाना बघायचं आहे. त्यांच्या आग्रहासाठी हा गीत संग्रह निर्माण केला आहे.

माझ्या ३५।४० वर्षांच्या काव्यमय जीवनात गोळा केलेली ही अक्षर संपदा तुमचीच आहे. म्हणून मला ती प्राण मोलाची वाटते आहे. ती तुमच्या हवाली आधीच केलेली असल्यामुळे मी तुमचा जन्माचा ऋणांकीत आहे.

यावेळी मी भावविवश होऊन ह्या साऱ्या गीतांच्याकडे बघत असतां आठवणीनं डोळे उघडले आणि त्या म्हणाल्या आमची ओळख करून द्याना सर्वांना ! त्यांची पटापट चुंबनं घेत समजावणीच्या स्वरात मी बोललो. बाळांनो, तुमची सर्वांची ओळख मी करून देण्याची गरज नाही. आणि या पुस्तकात ती ग्रथित करणं अशक्य आहे. पण त्यापैकी सर्वांचं धुरीमत्व घेतलेली "गंगा जमुना" नावाची आठवण माझ्या गळी पडून म्हणाली, माझी जन्मकथा तरी लोकांना सांगाना. कारण, माझं नांव तुम्ही संग्रहाला दिलय म्हणून म्हणतेय ! तिच्यापुढं मी नतमस्तक झालो. कारण त्या गंगा जमुनामुळे मी उभ्या महाराष्ट्राला माहीत झालो. प्रत्येक मराठी माणसाच्या घरी ती राहिली आहे. राहते आहे. तिचा जन्म पुणेस्टेशनवर १९४८ च्या मे महिन्याच्या एका शनिवारी दुपारी ३।१५ च्या रेल्वे डब्यात मी बसलो असताना झाला.

ती टोपपदराचं लुगडं नेसलेली, गळाभरून दागिने घातलेली, डोक्यावरून पदर घेतलेली मराठमोळी, कुठल्या तरी खेड्यात राहणारी मऱ्हाठी स्त्री माझ्या डोळ्यापुढे उभी राहिली. तिला कडकडून मिठी मारणारी, नुकतंच लग्न झालेली तिची एकुलती एक, सुरेख, देखणी, चंपक गोरी, शेलाटया अंगाची कन्यका मला दिसते आहे. माझ्या डब्यात बसलेल्या दीर, भावोजीशी हसत खेळत बोलणारी आणि लगच आईकडं जाऊन "आई!" म्हणून गळ्यात पडताना तिची आई म्हणाली, बाळे, बाळपणापासून तुला तळहाताच्या फोडा सारखं जपलं. कोंड्याचा मांडा करून तुला घास भरवला. अंगाखांद्यावर खेळवलं. ती, तूं, आता न्हाती धुती झाल्यावर मात्र मंगळसुत्राच्या दोऱ्यानं माझ्यापासून कायमची दुरावते आहेस. पोरी, मला आई म्हणून कोण हाक मारणार? तुझं गोजिरं रूपडं मी कुणात बघू? असं म्हणून ती घट्ट मिठी मारून पटापट मुके घेत असलेली पाहून मी गहिवरलो. माझ्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. गाडीची शिट्टी झाली. त्या मातृदेवतेचं काळीज कलकललं. आणि ती रडव्या स्वरांत म्हणाली, पोरी, सासरी जाताना डोळ्यातून "गंगा–जमुना" आणू नकोस! स्वतःच्या पदराने तिनं डोळे पुसले. साडी सावरली. पडता पदर डोईवर घेतला. मुलगी पळतपळत गाडीत चढली. तिचं हृदयद्रावक काळीज लकलक करीत असलेलं मी पाहिलं. पोरीचा चुडाभरला हात डब्याबाहेर हालत होता. हात उंचावून आई म्हणत होती "गंगा–जमुना डोळ्यात उभ्या का? जा मुली जा दिल्या घरी तूं सुखी रहा.' तिच्याच मुखातून निघालेले शब्दच माझ्या गाण्याचे ध्रुपद झाले.

काही दिवसानं ते भावगीत पुरे झाले. संगीत दिग्दर्शक वसंत प्रभू, तबलजी मारूती कीर, दामुआण्णा माळी व मी मिळून ह्या गीताला स्वरबध्द करण्यासाठी काटकरांच्या दादर येथील लिंबूवाला मार्केटमध्ये दोन दिवस बसलो. सुरेख स्वररचना- सर्वप्रकारच्या लोकांना वसंत प्रभूनी गावून दाखविली. सर्वांना ती आवडली. नंतर आम्ही कु. लता मंगेशकरकडे गेलो. हिंदी चित्रसृष्टीत नुकतीच लौकिकास आलेल्या लताने, मराठीतून प्रथमच हे गीत गाऊन सर्व महाराष्ट्रा पोहोचवले. कु. लता मंगेशकर त्यावेळी १९ वर्षांच्या होत्या. त्यांचा पहिलाच टेप ओके झाला. हे गीत ध्वनिमुद्रीत करण्यासाठी कोलंबिया कंपनीचे व्यवस्थापक कै. वसंतराव कामेरकर यांनी अत्यंत आपुलकीनें मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणांकीत आहे.

गीताचे भावनोत्कट शब्द, त्याला योग्य अशी दिलेली स्वररचना, आणि आईच्या अंतःकरणानंच गायलेली भावमधुरता याचा सुंदर मिलाप या ध्वनिमुद्रिकेत झाला आहे असे गौरवपर उद्गार, "बाई सुंदराबाई" या सुप्रसिद्ध गायिकेनें आमच्या पाठीवर प्रेमाने आशिर्वादात्मक थाप मारून काढलेले आहेत. अधिक काय लिहू? त्या गंगाजमुनेनं मला भावगीताच्या काव्यमय दरबारात नेऊन मानाच्या आसनावर बसवलं–अमर केलं! तसेच त्यांच्या भगिनी स्वरकिन्नरी

आशा भोसले हीने गायलेली, पहिली ध्वनिमुद्रिका "आईबाप हे दैवत माझं असता माझ्याघरी, कशाला जाऊ मी पंढरपुरी" हे गीतही गंगाजमुनाच्या पाठो-पाठ अतिशय लोकप्रिय झालं. ही दोन गीतं रसिकांच्या घरोघरी गेली. आता तुम्ही गेलात तरी कवी म्हणून सारा महाराष्ट्र तुम्हाला कधीही विसरणार नाही. असे गौरवोद्‌गार प्रा. क्षीरसागर यांनी काढलेत. त्या उद्‌गारांचा मी ऋणांकित आहे

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, सौ. आशा भोसले व कै. वसंत प्रभू या माझ्या प्रेमपूज्य विल्वदलाला हा गीत संग्रह अर्पण केला आहे. मी ज्याना गुरुतुल्य मानतो, त्या कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी (श्री. वि. वा. शिरवाडकर) अत्यंत प्रेमानें शुभेच्छा व्यक्त करून माझ्या शिर्षावर "जन कवि" म्हणून गौरवांचा मुकूट घातला त्याबद्दल त्यांचे आभार मानायला शब्दसृष्टीच्या ईश्वराकडे सुद्धा शब्दांचा तुटवडा झाला आहे.

माझे गुरूतुल्य, विठ्ठल सखाराम पागे आणि माझे काव्याचे मार्गदर्शक गुरु श्री. माधव ज्युलियन यांचाही मी ऋणी आहे. त्यानंतर माझे असंख्य चहाते स्त्री, पुरुष, आप्तजन, माझी सौभाग्यवती, मुलं, मुली आणि जेष्ठ व कनिष्ट जामात या सर्वांनी माझ्या काव्यमय जीवनाकडे प्रेमपूर्वक पाहिल्यामुळे मी सारे काही करू शकलो. शेवटी जाता जाता ज्या मातीत – ठाणे नगरात – माझं कवि मन रूजलं, फुललं, बहरलं त्या मातीन मला नगराध्यक्ष करून जनतेच्या हृदय-सिंहासनावर काही काळ बसंवल, त्या मातीचा अबिर लावून, पुंडलीक वरदा म्हणून ऋणांकीत संपवतो.

**पी. सावळाराम**

॥ श्री ॥

# पी. सावळाराम जीवन परिचय

दुसरं महायुध्द भारताच्या दारी कधी पेटलंच नाही. त्यामुळें, लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनीं प्रथा पाडून दिलेले सार्वजनीक गणेशोत्सव, अैन युध्दकाळातही महाराष्ट्रात ठिकठिकाणी पार पडत होते. १९४३ साली, महाराष्ट्रात अनेक मान्यवर काव्यगायक, भावगीत गायक/गायीका प्रसिद्धीस येत होते. गल्लीबोळातले कंपन्यातले गणेशोत्सव, सत्यनारायणाच्या पूजा, नवरात्रोत्सव वगैरे धार्मिक उत्सव तुफान गर्दीत पार पडत. हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच प्रसिध्द भावगीत लेखक त्यावेळेस महाराष्ट्रात होते. त्यावेळी, भावगीत गायनाच्या ध्वनिमुद्रीकाही निघत व त्यांचा खपही चांगला होत असे.

१९४८ साली, रेशनींग खात्यात ची इन्स्पेक्टरचीं नोकरी सांभाळून, शालेय व विद्यालयीन शिक्षण घेत असतानाच थोड्याफार प्रमाणात प्रसिध्दीस आलेल्या पी. सावळारामांच्या " राघु बोले मैनेच्या कानात ग, चल सखे आंब्याच्या वनांत ग," या गीताला श्री. वसंत प्रभू यांनी स्वरबध्द करुन ते कोलंबिया कंपनीनें ध्वनिमुद्रीकेच्याद्वारे प्रकाशीत केलं आणि महाराष्ट्राला पी. सावळाराम गवसला.

१९४९ सालापासून सावळारामांच्या कुंडलितले ग्रह उच्चीचे होते यात तीळमात्र शंका नाही. केवळ हिंदी चित्रसृष्टीत माहीत असलेली महाराष्ट्राची गान कोकीळा, भारताची स्वरसम्राज्ञी, जगप्रसिध्द, श्रीमती लता मंगेशकर यांनी श्री. वसंत प्रभूनें स्वरबध्द केलेले सावळारामांचे "गंगा जमुना डोळ्यांत उभ्या का? जा, मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा" हे गीत गाऊन ध्वनिमुद्रीत केले आणि चमत्कार घडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ही ध्वनिमुद्रीका पोहोचली आणि लता, प्रभू व सावळाराम या त्रिमुर्तींना किर्तीच्या अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवले. भावगीताच्या या ध्वनिमुद्रीकेच्या खपानें उच्चांक गाठला.

तासगावला, मराठी चौथीच्या वर्गात प्रथम क्रमांक मिळवून निवृत्तीनाथ रावजी पाटील यानें मानाचा पहिला मुजरा घेतला. आजचे सुप्रसिध्द श्री. वि. स. पागे हे सावळारामांचे गुरुतुल्य शाळकरी मित्र. हरिभाऊ आपट्यांच्या "उषःकाल" कादंबरितील सावळ्या या व्यक्तिरेखेत आणि निवृत्तीनाथांत श्री. पागेंना कमालीचे साम्य आढळले, तेव्हापासून, निवृत्तीनाथाला ते सावळ्या या नांवानें संबोधू लागले. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना, सावळारामांना माधव

ज्युलियन. सारख्या नामांकीत कवीचे मार्गदर्शन लाभले. पुढें, काव्यप्रकाशनासाठ निवृत्तीनाथानें पी. सावळाराम हेच नांव मुक्रर केले.

घरची आर्थिक परिस्थिती यथायथाच. त्यातून प्रकृतीने कट्टी घेतलेली. ध्येय पुर्तिसाठी जेव्हा सावळाराम कोल्हापूरास हायस्कुलात दाखल झाले, तेव्हा श्री. नाले मास्तरांनी त्यांच्या दोन वेळच्या अन्नाची व्यवस्था केली. पण राहायचे कुठें? अेका परिटाने, तोही प्रश्न सोडवला. तरी सुध्दा फी पुस्तकांचे काय? शेवटीं मेजर दादासाहेब निंबाळकर त्यांच्यासमोर परमेश्वराप्रमाणे उभे राहीले व त्यांनीं सावळारामांच्या सर्व अडचणी दूर केल्या.

राजाराम कॉलिजमधून बी. अे. ची. परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर, सावळारामांनी साताऱ्याच्या सरकारी हायस्कुलात नोकरी पत्करली. बी. टी. करण्याची इच्छा प्रबळ होती. तो काळ होता स्वातंत्र्य लढयाचा. दुसऱ्या महायुध्दाचा महात्मा गांधी, पंडीत नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल वगैरे नामवंत पुढाऱ्यानी तिरंगी झेंड्याखाली साऱ्या भारतातील जनतेला अेकत्रीत करून, राज्यकर्त्या टोपीवाल्यांशी असहकार करण्यास प्रवृत्त केले. ९ ऑगस्ट १९४२ ला गांधीजींनी "चले जाव"चा ठराव पास केला. सारा भारत खडबडून जागा झाला. क्रांतीचा वणवा पेटला.

आजच्या अनेक नामवंत पुढाऱ्यामध्यें सावळारामांचे धाकटे बंधू श्री. हिंदुराव पाटील भुमीगतांच्या सेनेत दाखल झाले. हिंदुराव पाटील सांपडत नव्हते. टोपीवाल्या सरकारनें त्यांच्या आई वडिलांना ताब्यात घेऊन येरवड्याच्या तुरूंगात डांबून ठेवले. सावळारामांच्यामागसुद्धा गुप्त पोलिसांचा ससेमिरा चालूच होता. दुर्दैव आडवे आले. हिंदुराव त्यांच्या सहकाऱ्यासहीत पकडले गेले. पकडलेल्यांची रवानगी सांगलीच्या तुरूंगात झाली. हिंदुरावच ते! तुरूंगात तरी कसे गप्प बसणार? शेवटी, अेक दिवस मुक्रर करून, महाराष्ट्राचे आजचे मुख्यमंत्री श्री वसंतदादा पाटील याच्याबरोबर बावीस बंदुका घेऊन त्यांनी तुरूंगाच्या भितीवरून उड्या मारल्या. नशीब आडवे आले, हिंदुरावांची उडी अेका खडकावर पडून ते जायबंदी झाले. आणि सावळाराम बी. टी. परिक्षेत नापास झाले.

१९४३ साली विवाहीत झाल्यावर सावळारामांनी ठाण्याला संसार थाटला १९४५ साली रेशनींगमध्ये इन्स्पेक्टरची नोकरी पत्करली. काव्य लेखन चालूच होते. स्वच्छ, सुंदर व सोप्या शब्दांना काव्यबद्ध करून सावळारामांनी भावगीते व भक्तिगीते रचली. वसंत प्रभू सारख्या गुणी संगितकारानें त्यांच्या गीताना स्वरबद्ध केले. लता मंगेशकर, आशा भोसले यांच्या मधूर व मधाळ आवाजामुळें त्या सर्व गीताना, महाराष्ट्राच्या प्रत्येक घराघरांत नेऊन, आबाल वृद्धांच्या ओठी नेऊन ठेवले. मराठी चित्रपटातही त्यांनी अनेक गीते लिहीली. लावण्या लिहील्या

काही गीताद्वारे त्यांनी स्त्रियांना अश्रू ढाळायला लावले. उत्कृष्ट गीत रचनेबद्दल त्यांचा १९५२ साली पुण्याला प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. क्षीरसागरांनी त्यांचा मुक्त कंठानें गौरव करून मन:पुर्वक अभिनंदन केले. तब्बल तीन डझन चित्रपटात गाणी लिहीणारे सावळाराम यांनी अर्धा डझन चित्रपटाकरिता कथा, पटकथा व संवादही लिहीलेत.

१९६३ साली त्यांनी महाराष्ट्रराज्य तमाशा मंडळाचे अध्यक्षपदही भुषवीले चित्रपट पुरस्कार सुरू झाला खरा पण त्याना अजून कोणतेच मानचिन्ह मिळाले नाहीये. नाही म्हणायला, मोलकरीण चित्रपटातील, रसरंगतर्फे, "देव जरी मज कधी भेटला" या गाण्याबद्दल त्याना फाळके पुरस्कार मिळाला. तसेच ग. दि. मांच्या निधनानंतर, काव्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्याना ग. दी. माडगुळकर पुरस्कार देण्यात आला. नाट्य परिक्षण मंडळाचे अेक परिक्षक सदस्य म्हणून ते गेली १२ वर्षे काम पाहतात. त्याचप्रमाणें, महाराष्ट्र राज्य गृह. निर्माण मंडळाचे अेक सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

आचार्य प्र. के. अत्रे, नटवर्य घुमाळांच्यासमोर सावळारामांनां म्हणाले होते "तुझ्या कांही गीतांच्याबरोबर इतरांच्या गीतांचे प्रकाशन करुन फालतू माणसे लक्षाधीश झाले. महाराष्ट्रीयन माणसांच्या हृदयें सिंहासनावर जाऊन बसलेला तुझ्या सारखा प्रसिद्ध कवी हजारो वर्षात झाला नाही. महाराष्ट्राचा तूच खरा शेवटचा भावगीतकार आहेस. तुझ्या गीतांचा संग्रह या पुर्वीच प्रसिद्ध व्हायला हवा होता." आज आचार्य अत्रे आपल्यात नाहीत ते असतानाच जर हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होता, तर त्या मराठी भाषेच्या सारस्वतानें आशिर्वादपर शब्दांची फुलें सावळारामांच्यावर उधळली असती यात शंकाच नाही.

१९४२साली महाराष्ट्राचे थोर कादंबरीकार श्री. वि. स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली, त्यांनी सावळारामांना, प्रथमच अेक नवोदीत, उदयोन्मूख कवी म्हणून काव्य वाचनाची संधिही दिली होती. तसेच, १९५५ साली, श्री. ना. सी. फडके यांच्यासारख्या सिद्धहस्त कादंबरीकारानें, सावळारामाना बरोबर घेऊन वसंतपाठमाला नामक शालोपयोगी पुस्तकमाला सुरु करायची ठरवीले होते. सरकार दरबारी वशीले असलेल्या हीत शत्रूंनी, त्या पुस्तकात व्याकरण पाठ कमी म्हणून ती नामंजूर करून घेतली.

१९६६-६७ या वर्षभराच्या काळात सावळारामांनी ठाण्याचे नगराध्यक्षपद भुषविले. अेक कवी नगराध्यक्ष होऊ शकतो या बद्दल आचार्य अत्रेना अत्यानंद झाला व त्यांनी त्यांचे खूप कौतुक केले होते. 'ज्या ठाणेकरांच्या प्रेमाच्या मतावर, सदिच्छेवर मी या जागी विराजमान झालो, त्यांच्या आशिर्वादावरच मला पूढें जगायचे आहे. अशी सावळारामांची भूमिका होती. नगराध्यक्षपदाचे

वर्ष संपल्यावर सुप्रसिद्ध कवी श्री. कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा गौरव करण्यात आला. कुसुमाग्रज त्यावेळी म्हणाले "माणूस अत्युच्च पदावर असताना त्याचे सत्कार होणं स्वाभावीक आहे. पण त्या पदावरून पायउतार झाल्यावर ज्याचा सन्मान होतो, तों खरा लोंकप्रीय" वारकरी पंथाचे, सरळ स्वभावाचे स्वच्छ मनाचे सावळाराम आजही दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहात आहेत.

या मान्यवर कवीचा मित्रांचा गोतावळा मोठा. सरकार दरबारी ओळखिही खूप. सामाजीक कार्यात अनेक ठिकाणी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ठाण्याला कॉलेज व्हायचे घाटत होते. त्यावेळी, सावळारामांनी, त्यांचे मित्र, आणि त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री, श्री. बाळासाहेब देसाई याना सांगून आजच्या ठाण्याच्या कॉलेजची २५ अेकर जागा विनामूल्य मिळवून दिली. भरसभेत, "सावळारामासारख्या सत्शील, सुस्वभावी, निगर्वी व सज्जन माणसाकडे पाहूनच ही जागा देऊ केली" असे श्री. बाळासाहेब देसाई त्यावेळेस म्हणाले. सावळारामांनी, अनेक लोकांची अगणीत कामे स्वतःचा कोणताच फायदा न पाहता आजपर्यंत करुन दिली आहेत. अशा या लोकप्रिय कवीचा हा पहिला काव्य संग्रह रसिकमान्य होईल यात शंका ती कोणती?

रमेश वैद्य

# काव्य परिशीलन

सत्तरीचा उंबरठा ओलांडलेल्या कवी पी. सावळाराम यांचा 'गंगा जमुना हा काव्यसंग्रह आज प्रकाशित होत आहे, ह्या गोष्टीचा आनंद केवळ महाराष्ट्र तील नव्हे तर मराठी भाषा लिहिता, बोलता येणाऱ्या प्रत्येक माणसाला खचितच होईल.

प्रत्येक मराठी भाषिकाच्या हृदयात तर 'गंगा जमुना डोळयात उभ्या का,. जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा' ह्या गीताने अमरत्त्व गाठलेले आहे.

पी. सावळारामानी आपली गीत रचना बहुतांशी चित्रपटांमधून केलेली आहे. त्यात भावगीत, लावणी, गौळण, भक्तिगीत इ. अनेक काव्यप्रकार त्यांनी मोठ्या कौशल्याने हाताळलेले दिसतात.

चित्रपट गीत रचना करणे हे तारेवरच्या कसरतीपेक्षाही अवघड होय. चित्रपट गीत रचनेसाठी 'माणूस' ह्या संज्ञेचा अभ्यास काटेकोर हवा. विशिष्ट माणूस कोणत्या संस्कृतीत वाढलेला आहे ? त्याची भाषा कोणती ? त्या भाषेतील वाक्प्रचार कोणते ? हे सर्व जाणून घेऊन नेमका आशय व्यक्त करणारे शब्द फार चलाखीने पण सहजगत्या गुंफावे लागतात.

उदा. 'पाहुणा म्हणूनी आला जरा घरात थारा दिला
दांडगाई करूनी ग बाई, चार दिसात घरधनी झाला'

वरील ओळींमधील 'जरा' हा शब्द किती हेतुपुरस्कर पण अगदी सहजगत्या कवीने वापरलेला आहे. शब्द सौंदर्य म्हणतात ते येथे दिसून येते. प्रस्तुत शब्दा-ऐवजी कोणताही समानार्थी शब्द येथे लिहिला तरी ते गीत कोलमडून पडेल.

वरील गीत हे 'राम राम पाव्हणं' ह्या चित्रपटातील आहे. तर त्याच चित्रपटातील 'शपथ दुधाची' हे गीत वाचले तर लगेच आपल्याला असे दिसून येते की ; सर्व देखावा बदलला, नव्हे तर समोरचा माणूस बदलला की गीत, त्यातले शब्दप्रयोग, त्या गीताचा ढंग आणि दोन व्यक्तींमधील परस्पर प्रेमाची पातळीही बदलते. उदा. "शपथ दुधाची या आईच्या फिर माघारी पोरी डोळयामधुनी पाजिल पाणी गंगा राजापुरी" इ.

ज्या त्या व्यक्तीप्रमाणे शब्द तर बदलतातच पण प्रतिमा देखील बदलतात. 'पाटलाचा पोर' मधील 'बंदा रुपाया बाई' ह्या लावणीत 'पिकलं लिंबू तसं माझं अंग, गुलमुशी गालाचा रंग' इ.

चित्रपट बदलला की आशय देखील बदलला. कवीला देखील बदलणे— ते देखील मानसिक आणि भावनिक पातळीवर बदलणे अत्यावश्यक ठरते. अन्यथा अनेक चांगले चित्रपट हातातून निघून जातात. पी सावळारामांनी अने विषयांच्या चित्रपटात यशस्वी गीत रचना केली. उदा. 'छत्रपती शिवाजी' चित्रपट. प्रस्तुत चित्रपटातील पाळणा बघा.—

'महाराष्ट्राचे भाग्य उद्याचे मुठीत नाचवतो' ह्या एकाच ओळीत संपूर्ण शिवचरित्र आपल्या डोळयासमोर उभे रहाते.

'कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या' मधील शेवटची ओळ पहा 'युगा-युगाचा सारंग घ्या, क्रांतिचा हा आरंभ घ्या.' हा पाळणा 'छत्रपती शिवाजी' हा चित्रपट जरी संपला तरी जिवंत रहातो तो त्यातील शब्दसामर्थ्यामुळेच.

संगीतकार संगीत, चाल बांधित असला तरी कवीला शब्दांचे नादसामर्थ्य माहित असणे हे यशस्वी गीताच्या दृष्टीने पोषकच ठरत असते. उदा. 'सुंदरा मनामध्ये भरली' मधील खालील दोन ध्रुपदाच्या ओळी—

'माझ्या संग राया तुम्ही भांडणार कधी?

तण तण तण तण तंडणार कधी?'

शब्दांची पुनरुक्ती, त्यातून निर्माण झालेला नाद हे सर्व गीतकार कवीच्या सामर्थ्याचेच लक्षण होय.

अपवादानेच सिद्ध होणारा अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजे कवी पी. सावळारामांच्या काही गीतांना मुळातच शास्त्रीय संगीताच्या बैठकीचा नैसर्गिक पाया लाभलेला आहे. ही त्यांना मिळालेली दैवी देणगीच होय. जो पर्यंत मराठी भाषा आहे, जो पर्यंत संगीत ह्या अभ्यास विषयाचे क्लासेस चालू रहाणार आहेत तो पर्यंत संगीताच्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पान—

'कोकिळा गा, गा गा रे

कोकीळा गा SSSSSS'

भूलोकीच्या गंधर्वा तू अमृत संगीत गा SS' ह्या अप्रतिम गीता वाचून यत्किंचीतही हालू शकणार नाही. कोणी काहीही म्हणो पण हे सत्य म्हणजे काळया दगडावरची एक ठसठशीत रेघ आहे. भारतीय संगीत कलेला पी. सावळारामांनी दिलेली

हा एक अमूर्त ठेवा आहे. तिला कवीने कायमचे ऋणी करुन ठेवलेले आहे.

वरील गीत हे 'बायकोचा भाऊ' ह्या चित्रपटातील आहे हे अनेकांना सांगून देखील खरे वाटत नाही. किंबहुना, 'हे सावळारामांचे गीत आहे' हेही अनेकांना माहित नाही. एका अर्थाने हे चांगले म्हणावे लागेल. कारण अमरत्व गाठलेल्या ह्या गीताच्या कवीचा शोध घेताना 'पी. सावळाराम' हे नांव शेवटी तोंडपाठ करावे लागत नाही ! कवीकडून त्याच्या रचनांकडे पोहोचण्यापेक्षा, उत्कृष्ट रचनांकडून—गीतांकडून कवीकडे पोहोचणे ह्या सारखे दुर्मिळ असे महद्‌भाग्य कोणते ?

अशा वेळी, 'हा गीतकार की कवी ?' अशा अक्षरशः पोचट वादामध्ये शिरलेल्या आढ्यताखोराना स्वतःच्या दृष्टिदोषामुळे लालभडक गुलमोहोराचा त्रास अपरिहार्यपणे होणारच ! मग तांबे, माडगूळकरां सकट एक वेगळीच जातकुळी निर्माण करावी लागेल, त्याचे काय ?

'कोकिळा गा' प्रमाणेच 'तुजसाठी शंकरा' (चिमुकला पाहुणा), 'खरा ब्राह्मण नाथची झाला, जो महारा घरी जेवला (मायमाऊली), 'आली हासत पहिली रात' (शिकलेली बायको), 'गोड गोजरी लाज लाजरी' (धर्मकन्या), 'चंपक गोरा कर कोमल हा, करात तुझिया देते । नेशील तेथे येते' (लक्ष्मी आली घरा), 'प्रेमा, काय देऊ तुला ?' (शिकलेली बायको) आणि 'कन्यादान' चित्रपटामधील 'मानसीचा चित्रकार तो' 'माझिया नयनांच्या कोंदणी' कोकिळ 'कुहुकुहु बोले' लेक लाडकी या घरची' इ. भावगीते आणि 'राधा गौळण करिते मंथन', 'आम्ही गोकुळच्या नारी' इ. गौळणी ह्या मुळात स्वतःच्या चाली घेऊनच येतात. केवळ चांगल्या चालींमुळे—संगीतामुळे गाणी चांगली होतात असे नाही तर चांगल्या रचनांमुळे देखील चांगले किंबहुना मोहक संगीत निर्माण होते. ज्या रचना मुळातूनच स्वतःच्या अगदी स्वतंत्र चाली बांधित अवतरतात तेथे अलौकिकत्वाला नाकारून कसे चालेल ? नाहीतर सर्वच रचना उत्कृष्ट झाल्या असत्या की !

पी. सावळारामांनी 'लावणी' ह्या अ-नागरी काव्यप्रकाराला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त करून दिलेले आढळते.

'लावणी' म्हणजे अश्लीलता नव्हे, लावणी भरदार हवी, तिला स्वतःचा दिमाख हवा, तोरा हवा आणि स्वाभिमान हवा. आणि यामुळेच 'लावणी' मधील खटक्याला अपरंपार महत्त्व. खटक्यासाठी केवळ शब्दभांडाराची आवश्यकता नसते तर शब्दांना वाकविण्याचे सामर्थ्य, तसेच शब्दांची मृदुता आणि त्यांचा वेग यांची योग्य सांगड घालण्याचे कसब असावे लागते. अर्थात हे कसब कमवावे लागते. जसे

'परनार, नंगी तलवार, जिव्हारी वार करील मनरमणा

लडीगोडी कशापायी सजण।

नयन कमलकोषात, लपुनि दिनरात, प्रीत दिवाणा
छंदीफंदी, मधुमकरंदी, जाह्‌ला बंदी, भृंग रसराणा इ.

(सून लाडकी या घरची)

'लावणी'तील प्रीतभावना बेछूट असता कामा नये. स्त्री सौंदर्य ही एक समाधी असते. ही समाधी म्हणजेच सौंदर्य भंग पावता कामा नये. ही समाधी जर भंग पावली तर केवळ अश्लीलतेची आरासच उभी रहात नाही तर त्यातून कीळसता निर्माण होते. म्हणून लावणी लिहणे ही तारेवरची कसरत आहे.

'जिथं बघाल तिथं मी घरते मुखाचा ऐना' एवढेच सांगून लटकी प्रीत व्यक्त झाली तर 'लावणी' मरगळते. लावणीला मरगळतेची पुटं चढू नयेत म्हणून 'मखमली सारुनी पडदा चला हृदयात' अशी अर्पणता दोघांच्याही ठायी अत्यावश्यक असते.

'लावणी'त वाच्यार्थापेक्षा लक्ष्यार्थ उठाव आणतो. उदा.– 'माझ्या पदराचा वंगाळ वारा' मध्ये 'माझ्या पदराला माठी सतरा' इत्यादी ओळी.

'लाज वयात येणं' (तुला बघून पदर माझा पडतो) इ. सारखे शब्दप्रयोग देखील 'लावणी' ला खुलवितात.

नाईलाजाने का होईना पण अगदी प्रकर्षाने आम्हा दोघा संपादकांच्या वतीने मला एक गोष्ट सांगावीशी वाटते ती ही की, 'गंगा जमुनाचे काम करीत असताना पी. सावळारामांच्या भक्तिगीतांनी आम्ही अक्षरशः न्हाऊन निघालो, तल्लीन झाले मुख्य म्हणजे 'समाविस्त' झालो. ही लाखाची कृतार्थता मिळाली ती सावळारामांच्या भक्तिगीतांमुळेच. 'मी' पणाचा दोष पत्करून देखील मला एक सांगावेसे वाटते की, माझ्या अठ्ठाविशीच्या वयात (आणि रमेश वैद्यांच्या त्रेपन्नाव्यात) ही तल्लीनता म्हणजे एक देणगीच वाटली.

पी. सावळारामांच्या भक्तिगीतांचे पहिले महत्वाचे वैशिष्टय असे क भक्तिगीतांमध्ये कवीने देवांचे मानवीकरण केलेले आहे. त्यातूनच समाजावर प्रकाश पडतो. उदा. 'विक्रयचाले देवपणाचा, रहायचे मग इथे कशाला? पंढरी सोडून चला, विनविते रखुमाई विठ्ठला?

'

देवांचे जसे मानवीकरण केलेले आहे तसे केवळ देवांनाच देवत्व न देता– आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी, कशाला जाऊ मी पंढरपुरी?' असा विचार प्रकर्षाने मांडलेला आहे.

मनात ईश्वर आहे, हृदयात ईश्वर आहे ह्या भूमिकेमधूनच 'विठ्ठल तो आला

आला मला भेटण्याला' हे भक्तिगीत साकार होते.

'धागा धागा अखंड विणू या' सारख्या भक्तिगीतामधून केवळ तत्वज्ञान नाही उपमेमधून रचलेला, 'विश्वंभर तो विणकर' हा प्रास काव्यात्मकता वाढवितो.

'देऊळ आणि मूर्ती तूच आहेस' हा अद्वैत सिद्धाना देखील कवी मांडतो.(शरण तुला भगवंता.) शिवाय 'मागायाचे काय अनंता ?' अशी तृप्त कवी-वृत्ती देखील आढळते.

आणखी एक, सर्व भक्तिगीतांचे वैशिष्टय असे की, ह्या भक्तिगीतांमधून देवावरचा भक्तांचा हक्क फारच मोठा आहे, हे दृष्टोत्पत्तीस येते.

अति सोप्या ओळींमुळे 'देव जरी मज कधी भेटला' (मोलकरीण), 'सारी भगवंताची करणी' (सुखी संसार) अशी पी. सावळारामांची सर्व भक्तिगीते अगदी बेफाट गाजली. चित्रपट दृष्टिआड झाले. पण गाणी टिकली. एवढे सत्त्व असल्या-नंतर चिरंतना साठी आणखी काय हवे ?

जेथे शब्दच 'चाकर' होऊन सेवेला येतात, तेथे काव्य चिरंतन होते. 'शब्दांनो मागुते या' चा खरा अर्थ येथे फलद्रुप होतो.

**श्री प्रदीप गुजर.**

# थोडे प्रकाशकीय

माझ्या प्रेमळ वडिलांचा गीतसंग्रह प्रकाशित करण्याचे सद्‌भाग्य मला लाभलं याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजते आहे. यातील बहुतेक गीतं ध्वनिमुद्रित झालेली आहेत. शाहीर साबळे व त्यांच्या कन्यका वसु व चारु यांनी माझ्या वडिलांच्यावरील प्रेमाचे प्रतीक म्हणून त्या सर्व ध्वनिमुद्रिका कॅसेटसवर उतरवून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणे क्रमप्राप्तच आहे. त्याचप्रमाणे माझ्या वडिलांच्या मित्रांनी जवळ जवळ ५०० गीतांची हस्तलिखीतं लिहून काढून आमच्यावर अनंत उपकार केले. तसेच श्री. मोहन वाघ व श्री. कमल शडगे यांनी आकर्षक मुखपृष्ठ करुन दिल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तद्वत् श्री. प्रदीप गुजर यांनी मुद्रिते तपासून गीतांचे रसिक मनानें परिशीलन केले व संपादनात मदत केली याबद्दल यांचीही मी ऋणी आहे.

" गंगा–जमुना " हा गीत संग्रह जणू आपलाच आहे असे समजून, त्याच्या संपादनाची व परोपरीनें सर्वच जबाबदारी स्नेहपूर्णतेनें स्वत:च्या शिरावर घेऊन अखेरपर्यंत बंधुतुल्य प्रेमानें राहिलेले श्री. रमेश वैद्य यांच्यामुळेंच हा गीत संग्रह रसिक चरणी अर्पण करू शकते. त्या रमेश वैद्यांचे, म्हणजेच वडील बंधुचे आभार ते कसले मानायचे? त्यांचे चरण रज भाली लावून मी मिरवते आहे. चि. आल्हाद वैद्य याने माझ्या वडिलांची व श्री. वि. वा. शिरवाडकरांची उत्कृष्ट छाया चित्रे घेऊन मलपृष्ठाला विषेश शोभा आणली याबद्दल त्याचे आभार मानणे स्वाभाविकच आहे.

अखेर, हे पुस्तक, उत्तम रितीनें मुद्रीत करून वसुंधरा आर्ट प्रिंटर्सचे मालक श्री. जयराम बाबुराव नाईक व त्यांचा कामगारवर्ग यांनी रात्रंदीन कष्ट घेऊन ही पाहिली आवृती माझ्या हाती वेळेवर दिल्याबद्दल चांदुली प्रकाशन-तर्फे मी त्यांचे आभार मानते.

शेवटी, दादा ! जो कल्पवृक्ष कन्येसाठी तुम्ही लावला, तो बहरलेला तुम्ही पाहिला. त्या कल्पवृक्षाच्या फुलांची माळ तुमच्या कंठात घालताना, सारा तुमचा कुटुंब परिवार पाहातो आहे. हे पाहाताना सर्वांच्या डोळयांत "गंगा-जमुना" पाझरल्यात.

रसिकहो, अधिक काय लिहू ?

**डॉ. (सौ.) कल्पना पाठारे.**

# अनुक्रमणिका

## भक्तिगीते

ज्ञानदेव बाळ माझा ३
पंढरीनाथा झडकरी आता ४
विठ्ठल तो आला आला ५
कशाला जाऊ मी पंढरपुरी ६
विठ्ठला, समचरण तुझे धरिते ७
धागा धागा अखंड विणुया ८
विठ्ठलाचे नाव घ्या हो ९
मूर्त रूप जेथं १०
श्रीरामा घनश्यामा ११
रघुपति राघव गजरी गजरी १२
रघुनंदन आले आले १३
मखू आली पंढरपुरा १४
म्हणे यशोदा माझा कान्हा १५
ये गोविंदा ये गोपाळा १६
चित्त माझे देवा संसारी न लागे १७
देव जरी मज कधी भेटला १८
जो आवडतो सर्वाला १९
शरण तुला भगवंता २०
सारी भगवंताची करणी २१

## भावगीते

हसले ग बाई हसले २५
लिंबलोण उतरता २६
सप्तपदी मी रोज चालते २७
बाळा होऊ कशी उतराई २८
तुझे डोळे पाण्याने भरले २९

गळ्यात माझ्या तूच जिवलगा ३०
कृष्णा मिळाली कोयनेला ३१
हरवले ते गवसले का? ३२
हृदयी जागी तू अनुरागा ३३
प्रेम तुझ्यावर करिते मी रे ३४
नसता माझ्या मनात काही ३५
प्रिया मी येऊ कशी रे आत? ३६
आरे माझे स्वप्न राहिले ३७
मागता न जिथे मिळते ३८
दिलवर माझा नाही आला ३९
कितीकदा मी तुला भेटते ४०
मी हसले मनी रमले ४१
गाव तुझा तो पैलतिरी ४२
मनात नसता तुझ्या गडे ४३
राघूबोले मैनेच्या कानात ग ४४
घट डोईवर घट कमरेवर ४५
देवरूप होऊ सगळे ४६
काय करू मी बोला ४७
करू नका गलबला कुणी ४८
तुझी न माझी ओळख नसता ४९
ओळख पहिली गाली हसते ५०
कोणास ना कुणाची ५१
निराळीच मी दिसू लागले ५२
मानसकन्या काण्वनीची ५३
रामा हृदयी राम नाही ५४
सांजवात लाविते ५५
घरोघरीं बालदिन माझ्या वडिलांचा आला ५६
असावे घरटे आपुले छान ५७
कल्पवृक्ष कन्येसाठी ५८

**गवळण**

उठी गोविंदा उठी गोपाळा ६१
राधा गौळण करिते मंथन ६२

मजवरी माधव रूसला बाई ६३
दर्पणी बघते मी गोपाळा ६४
राधा कृष्णावरी भाळली ६५
वेड लागले त्या राधेला ६६
हसुनि एकदा मला मुकुंदा ६७
चालल्या गौळणी मथुरेकडे ६८
उधळित नवरस रंग ६९
चला बाई चला ७०
कलेकलेने चंद्र वाढतो ७१
रुसता रागे मी कृष्णावर ७२
रिमझिम पाऊस पडे सारखा! ७३

## लावणी

मला हेरुन फाकडी ७७
तुला बघून पदर माझा ढळला ७८
काल राती सपान पडलं ७९
लाडी गोडी कशापायी सजणा ८०
गुटर्घूम गुटर्घूम ८१
टाकुन बघते खडा ८२
माझ्या पदराचा वंगाळ वारा ८३
तुला बघून पदर माझा पडतो ८४

## अप्रकाशीत गीते

श्री सद्गुरू श्री गजानन महाराज ८७
देहूला कळस पाया आळंदीला ८८
घडले नसते ते रामायण ८९–९०
संत नामदेव ९१
शोधित गोविंदा ९२
माग हवे ते देव म्हणाला ९३
नयना आज पुन्हा दिसले बालपण ९४
मेनका भूवरी उतरे ९५
जय जय शंकर ९६
उठा जागे व्हा लोकनाथा ९७

सारस्वत मंदिरात ९८
सोडू नको देऊळ ९९
तुझी देवदास १००
हले डुले ऽऽ हले डुले १०१
मूर्तिमंत रे मालकस तू १०२
चंद्र तोच आन् तेच तारे १०३
हसता मी हसली का १०४
चांदणी एकटी गगनी १०५
दुःखात सुख मी मानु किती १०६
जगी या कुणी कुणाचे नाही १०७
कृष्ण माझा जीव १०८
डोळ्यांच्या मिठीत प्रीत ही झिंगली १०९
मंगल गीत ११०
माझा हिमालय माझी गंगा १११
राष्ट्रस्वामिनी प्रियदर्शनी ११२
नमो नमो नमो नमः ११३
मुशाफिरा चल माझ्यासाठी ११४
थांब अर्जुना ११५
मंदार तरू सिध्द गजानन राहतो ११६

## चित्रपटातील गीते

शपथ दुधाची ११९
माझ्या शेतात सोनच पिकतय १२०
पाहुणा म्हणूनी आला १२१
प्रीत जिंकुनी अजिंक्य झाले १२२
बंदा रुपाया बाई १२३
नशीब सिकंदर माझे १२४
जीव जडला ज्याच्यावरती १२५
माझं नांव शोभल मैना १२६
रावणाने सीता नेली १२७
ओळखले मी ओळखले १२८
लखलखले आभाळ निळे १२९
सीतामाई पती तुझा १३०

बोललीस तू काल उद्या १३१
आळीमिळी गोमचिळी १३२
पाहत नाही तुला १३३
तुझी न माझी ओळख नसता १३४
कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या १३५
गावात गाव माझं माहेरगाव १३६
सात जन्मीची सोन पाउले १३७
आज शिवाजी राजा झाला १३८
सह्याद्रीच्या वाऱ्या जाउनी सांग १३९
वेलीवरची कळी ही पहिली १४०
भाळी कुंकू गाली लज्जा १४१
मावळता दिन राहून राहून १४२
नसती आली भेट तुझी ती १४३
हिरव्या कुरणी १४४
मन मिळे जिथे दोघांचे १४५
जीवित माझे हवे तुला तर १४६
मनी वसे ते स्वप्नी दिसे १४७
तिन्ही सांजची राधा गौळ्याची १४८
नाजुक ही फुलवेल १४९
नांव तुझे ते येता श्रवणी १५०
वीणावती मी तुझी प्रियकरा १५१
एकदाच येउनि तू रे १५२
प्रसन्न मंगल पहिल्या प्रहरी १५३
स्वप्न उद्याचे आज पडते १५४
बाळ माझं नवसाचं १५५
माणसाचा माणूस वैरी १५६
फुटतो पान्हा पुन्हा पुन्हा १५७
कृष्णाची दृष्ट मला लागली १५८
मी हसू आधी का रुसू ? १५९
भांडखोर प्रीत माझी १६०
दु:खात सुख मी मानू किती १६१
औंदा बाई नवसाला देव माझा पावला १६२
जशी चवथीची कोर ती नभी १६३

प्रकाशून नियमित तुझे चंद्र सूर्य तारे १६४
पुजारिणीला वंदुनी पायी १६५
मल्हारी माझा मल्हारी १६६
सोडिला कायमचा मी गाव १६७
डाव तुम्ही टाका नजर माझी जिंका १६८
सांग पत्रिके निरोप माझा १६९
शंकराचा तिसरा डोळा १७०
पुनवेच्या घरी निळी गोजिरी १७१
गोड तुझ्या त्या स्वप्ना मधली १७२
थांब धावत्या जळा १७३
मलाहि मुकले तुलाहि मुकले १७४
मोट जरा हाक तू जपून १७५
हर्षाचा वर्षाचा दिवाळीसण आला १७६
आली हासत पहिली रात १७७
का चिंता करिशी ? १७८
प्रेमा काय देऊ तुला १७९
✓ लेक लाडकी या घरची १८०
कोकिळ कुहू कुहू बोले १८१
माझिया नयनांच्या कोंदणी १८२
मानसीचा चित्रकार तो १८३
तू असता तर १८४
डोळ्याची सलामी झडली चार चौघात १८५
पहिल्या प्रहरी माझ्या दारी १८६
आली प्रीत भेटीला १८७
ओळख झाली काल १८८
पंख हवे मज पोलादाचे १८९
आई कुणा म्हणू मी १९०
यश हे अमृत झाले १९१
बघता हसूनी तू मला १९२
• जिथे सागरा धरणी मिळते १९३
आज दिवाळी आली १९४
सुख येता माझ्या दारी १९५
शिकवतेस तू १९६

| | |
|---|---|
| कोकिळा गा... | १९७ |
| पाहिलेस तू ऐकलेस तू | १९८ |
| माझ्यासंग राया तुम्ही भांडणार कधी | १९९ |
| छुम छुम बोलतीया हातामधी घाट | २०० |
| पहिल्या प्रहरी देतो दर्शन | २०१ |
| उन्हात घर हे आपुले बाळा | २०२ |
| मीच देवकी मीच यशोदा | २०३ |
| चंपक गोरा कर कोमल हा | २०४ |
| रामाविना एकली सीता वनवासा चालली | २०५ |
| मी नाही कुणाची | २०६ |
| मूर्तिमंत भगवंत भेटला | २०७ |
| जयजय रामकृष्ण हरी | २०८ |
| नांदायला जाते मी नांदायला जाते | २०९ |
| सजु मी कशी ? नटू मी कशी ? | २१० |
| शेत बघा आलंय राखणीला | २११ |
| कुणी न मालक कुणी न सेवक | २१२ |
| खरा ब्राह्मण नाथची झाला | २१३ |
| चंद्रकला रुक्मिणी नेसली | २१४ |
| प्रीत माझी पाण्याला जाते | २१६ |
| टक टक नजर पडतो पदर | २१७ |
| आठवणींनो, उघडा डोळे | २१८ |
| तुजसाठी शंकरा | २१९ |
| भक्तीच्या फुलांचा बोलतो सुवास | २२० |
| गंगेच पाणी पाटाला | २२१ |
| चोच जयाने दिधली बाळा | २२२ |
| गोड गोजरी लाज लाजरी | २२३ |
| सखी ग मुरली मोहन मोही मला | २२४ |
| पैठणी बिलगुनी म्हणते मला | २२५ |
| मी वारकरी आगळा | २२६ |
| इतुकेच विचारु का ? | २२७ |
| मनात नसता काही गडे | २२८ |

गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां?

गंगा जमुना डोळ्यांत उभ्या कां?
जा मुली जा, दिल्या घरी तूं सुखी रहा ॥ ध्रु ॥

कडकडुनी तूं मिठी मारतां वाळे
बालपणा आले, आले घुमारवीत घुंगुरवाळे
आठवले सारे सारे, गहिवरले डोळे
वर मायेने तुला सांगती जा! ॥ १ ॥

दारात उभी राहिली रिकामी जोडी
वधू वीर धरले बसले, खोळंबुन गाडी
पूस ग डोळे या पदराने सावर ही साडी
रूप दर्पणी मला ठेवुनी जा ॥ २ ॥

मोठ्याची तूं सून पाटलीण मानाची
हंसते मुखे गा फिरवे बिलवर नागीनजुडे
वळु नकोस मागे मागे, ओढके वध पुढे
नकोस विसरुं परी आईला जा ॥ ३ ॥

— पी. सावळाराम

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ३५५३४
मुंबई शाखा (स्थळ प्रत)



# भक्तिगीते

# ज्ञानदेव बाळ माझा

ज्ञानदेव बाळ माझा, सांगे गीता, भगवंता
लक्ष द्याहो विनवीते मराठी मी त्याची माता ॥ धृ ॥

गोड माझ्या सोनुल्याचा, लळा लागे बालपणा !
बांधुनीया घुंगुरवाळे, अंगीनाचे थोरपणा !
निरुपण सांगायाला, तुम्ही द्याहो शहाणपणा
बाळमुखी मोठा घांस, भरवाहो जगन्नाथा ॥ १ ॥

निरक्षर लोकासाठी, प्राणांचेही देऊन मोल
अमृताते जिकून पैजा धांवे मराठाची बोल
ज्ञानदीप डोळियांचे तेजाळता तेजोगोल
देवगुरु खाली आले जोडोनिया दोन्ही हाता ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभु

# पंढरीनाथा झडकरी आता

पंढरीनाथा झडकरी आता, पंढरी सोडून चला
विनविते रखुमाई विठ्ठला ॥ धृ ॥

ज्ञानदेवे रचिला पाया, कळस झळके वरि तुकयाचा
याच मंदिरी आलो आपण प्रपंच करण्या भक्तजनांचा
भक्त थोर ते गेले निघुनी, गेला महिमा तव नामाचा
विक्रय चाले देवपणाचा, रहायचे मग इथे कशाला ॥ १ ॥

धरणे धरूनी भेटीसाठी, पायरीला हरिजन मेळा
भाविक भोंदु पूजक म्हणती, केवळ आमुचा देव उरला
कलंक आपुल्या महानतेला, बघवेना हो रखुमाईला
यायचे तर लवकर बोला, ना तर द्या हो निरोप मजला ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# विठ्ठल तो आला आला

विठ्ठल तो आला आला मला भेटण्याला –

तुळसी-माळ घालुनि गळा कधी नाही कुटले टाळ
पंढरीला नाही गेले चुकूनिया एक वेळ
देव्हाऱ्यात माझे देव त्यांनी केला प्रतिपाळ
चरणांची त्यांच्या धूळ रोज लावी कपाळाला ॥ १ ॥

सत्य वाचा माझी होती वाचली न गाथा पोथी
घाली पाणी तुळशीला आगळीच माझी भक्ती
शिकवण जन्माची ती बंधुभाव सर्वांभूती
विसरून धर्म जाति देई घास भुकेल्याला ॥ २ ॥

---

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# कशाला जाऊ मी पंढरपुरी ?

विठ्ठल रखुमाई परी–
आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी
कशाला जाऊ मी पढरपुरी ? ॥ धृ ॥

कैलासाहुनी थोर मन हे माझ्या बाबांचे,
शंकराला विष न पचले प्रपंच दुःखाचे,
पचवुन देती अमृत मजला संत वचनांचे
पुंडलिका परी हात जोडुनी सदैव सामोरी ॥ १ ॥

सात समिंदर भरुनी उरली माया आईची
प्रेमळतेला उपमा नाही वाणी ज्ञानेशाची
मंगल शोभा जिच्या ललाटी कोटी चंद्राची
वत्सलमूर्ति माय माउली मानस-देव्हारी ॥ २ ॥

विटेवरचे जगजेठी हे आले माझ्यासाठी
संसाराचा थाट मांडुनी केली मजला मोठी
करपुष्पांची माला घालुन तुमच्या मी कंठी
चरणांचे हे तीर्थ घेत्ये चंद्रभागेपरी ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# विठ्ठला, समचरण तुझे धरिते

✓ विठ्ठला, समचरण तुझे धरिते
रूप सावळे दिव्य आगळे अंतर्यामी भरते ।।धृ।।

नेत्रकमल तव नित फुललेले
प्रेममरंदे किती भरलेले
तव गुण-गुंजी घालीत रुंजी
मानस-भ्रमरी फिरते ।।१।।

अरुण चंद्र हे जिथे उगवती
प्रसन्न तव त्या अधरावरती
होउन राधा माझी प्रीति
अमृतमंथन करिते ।।२।।

जनी लाडकी नामयाची
गुंफुन माला प्राणफुलांची
अर्पून कंठी मुक्तीसाठी
अविरत दासी झुरते ।।३।।

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# धागा धागा अखंड विणूया

धागा धागा अखंड विणूया
विठ्ठल विठ्ठल मुखे म्हणूया ॥ धृ ॥

अक्षांशाचे रेखांशाचे
उभे आडवे गुंफून, धागे
विविध रंगी वसुंधरेचे
वस्त्र विणिले पांडुरंगे
विश्वंभर तो विणकर पहिला
कार्यारंभी नित्य स्मरूया ॥ १ ॥

करचरणांच्या भागावरती
मनामनांचे तंतू टाका
फेकुन शेला अंगावरती
अर्धिउघडी लाज राखा
बंधुत्त्वाचा फिरवित चरखा
एकत्वाचे सूत्र धरूया ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# विठ्ठलाचे नाव घ्या हो

विठ्ठलाचे नाव घ्या हो,
घ्या हो भक्तिभावे
पंढरीला पायी, कार्तिकीला जावे ॥धृ॥

चंद्रभागेतिरी विष्णुदास मेळा
भजनी, कीर्तनी सदा रंगलेला
हर्षाने बघाया देव कोटी यावे ॥ १ ॥

अबीर गुलाल लावुनिया भाळी
तुळशीमाळ गळा वारकरी होई
भक्त होऊनिया विठ्ठलेई यावे ॥ २ ॥

संगीत, गायक : दशरथ पुजारी

# मूर्त रूप जेथे

मूर्त रूप जेथे ध्यान श्रीपतीचे
पंढरीला लाभे भाग्य वैकुंठीचे ॥ धृ ॥

धुंडीत शोधित सख्या पांडुरंगा
भक्ति होऊनीया आली चंद्रभागा
तीर्थ रोज घेता देवचरणांचे
उजळे पावित्र्य जिच्या जीवनाचे ॥ १ ॥

मायपित्याच्या प्रेमाचा पाईक
पंढरीला येता पुत्र पुंडलीक
वेड लागोनि त्या भक्तदर्शनाचे
वीटेवरी उभे द्वैत विठ्ठलाचे ॥ २ ॥

आषाढीला होतां वैष्णवांची दाटी
नाम प्रलयात बुडे सर्व सृष्टी
युगे अठ्ठावीस बाळ देवकीचे
जोजवीत जेथे पान पिंपळाचे ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# श्रीरामा घनश्यामा

श्रीरामा घनश्यामा बघशिल कधि तू रे ?
तुझी लवांकुश बाळे

वनवासाच्या घरात माझ्या अरुण चंद्र हे सवे जन्मता
विरह प्रीतिचे दुःखही माझे हसले रघुनाथा
विश्वाची मी मंगल माता तुझी लाडकी सीता
तुझ्याविना रे आनंदाला गालबोट लागले ॥ १ ॥

रूप मनोहर तुझी पाहिली यौवनातली कांती
बाळांच्या या रूपे बघते तुझ्याच चिमण्या मूर्ती
पूर्ण पाहिले तुला राघवा तरिही दैवगति
तुझे बालपण तुझ्यापरी का वनवासी झाले ? ॥ २ ॥

बघायचे जर नसेल मजला बाळासाठी
चार करांचा कोमल विळखा पडु दे शामलकंठी
ताटातुटीच्या भेटी घडता झरझर अमृत ओठी
मिटुनि डोळे म्हणेन माझे रामायण संपले ॥ ३ ॥

---

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# रघुपति राघव गजरी गजरी

रघुपति राघव गजरी गजरी
तोडित बोरे शबरी ॥ धृ ॥

ध्यानी जपली मनी पूजिली
रघुनाथाची मूर्त सावळी
बघावयाला याच डोळी
आतुरलेली किती अंतरी ॥ १ ॥

रामनाम हे वदता वाचे
अमृत लाघव अधरी नाचे
हाती येता फळ भक्तीचे
चाखित होती नाम माधुरी ॥ २ ॥

भजनी रमुनी भिल्लिण शामा
म्हणते लवकर ये रे रामा
आलिंगुनीया भक्ति प्रेमा
स्वर्ग बघू दे मला भूवरी ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# रघुनंदन आले आले

रघुनंदन आले आले, धरणीमाता कानी बोले ॥ धृ ॥

शिरीष कुसुमाहुनीही कोमल, कोमेजुन ही काया जाईल
सप्तस्वर्ग तो लवुनी खाली, धरूनि चालला छत्र साउली
रविचा रथ हळुहळु चाले ॥ १ ॥

वृक्षलतांनो हृदय फुलांच्या, चरणाखाली रघुरायाच्या
पायघड्या या लवकर घाला, माझ्यासाठी सांगा त्याला
शिळा अहिल्या हो झाले ॥ २ ॥

पाउलातली धूळ होउनी, बसली होती ती संजिवनी
भाळी लावता होइन पावन, आणिक रामा तुझेच दर्शन
धन्य मी पतिता झाले ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# सखू आली पंढरपुरा

आलिंगुनी अंगिकारा, बाप रखुमाईच्या वरा
सोडूनिया घरदारा, सखू आली पंढरपुरा ॥ धृ ॥

अनवाणी पायपिटी, किती केली आटाआटी
सगुणरूप भेटीसाठी, तोडिल्या मी बंधनगाठी
तुळशी हार घाली कंठी, विटूनिया संसारा ॥ १ ॥

संत तुकोबाची वाणी, भक्तिची ती शिकवणी
लागता मी तुझ्या भजनी, छळिली ही सुवासिनी
सर्वसाक्षी सर्वज्ञानी, तुला ठावे परमेश्वरा ॥ २ ॥

साऱ्या इंद्रियांचे प्राण, डोळियात व्याकळुन
मायबाप तुला शरण, मागते मी विनवून
दिला जन्म देई मरण, लेकिला या विश्वंभरा ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# म्हणे यशोदा माझा कान्हा

म्हणे यशोदा माझा कान्हा, म्हणे देवकी माझा तान्हा
तो तर होता बाळरूप हरी, वैकुंठीचा राणा ॥ धृ ॥

सूर्यचंद्रही कधि न मावळे, आनंदाचे इकडे गोकुळ
सुखदु:खाचा पाऊस जेथे, मथुरा तिकडें वत्सल व्याकुळ
मधुनी वाहत भरुनी प्रेमळ, ती मायेची जमुना ॥ १ ॥

देठावरची दोन फुले, तशी मायेची ती दोन मने
दों आईच्या या बाळाला, काय कमी हो काय उणे ?
विश्वमाऊली घेत चुंबने, पाजित अमृत पान्हा ॥ २ ॥

नक्षत्रांचे राघुमोर ते, झुले पाळणा स्वर्गधरेचा
घुंगुरवाळा वाजत पायी, मेळा नाचत गौळणींचा
झोका आला तो मथुरेचा, नांव ठेवा कृष्ण म्हणा ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# ये गोविंदा, ये गोपाळा

ये गोविंदा ये गोपाळा !
दर्शन देरे या राधेला ॥ धृ ॥

जिने कडेवर तुजला घेऊन
रोज दाविले गोकुळ मिरवून
दहिभाताचा घासही चारून
लहानाचा तुज मोठा केला ॥ १ ॥

यौवन फुलतां, तुझियावरती
जिने उधळली पुष्पक प्रीती
जनलज्जेची टाकून भीति
तुझ्या संगती काळ वेचिला ॥ २ ॥

तूच जाता गोकूळ सोडून
मोह पाश हे अवघे तोडून
प्रपंच, घरही आले मोडून
जोगिण होऊन प्रभुपदाला ॥ ३ ॥

# चित्त माझे देवा संसारी न लागे

चित्त माझे देवा संसारी न लागे
सर्व सोडूनिया आलो तुझ्यामागे ॥ धृ ॥

आईबाप तूच, तूच सखा भाऊ
तुझ्यावीण आता सांग कोठे जाऊ ?
धरी पोटी माते रागे अनुरागे ॥ १ ॥

तुझ्या देउळीचा घडो मला वास
तुझ्या संगतीचा घडो सहवास
अंतरीचे माझे पंचप्राण जागे ॥ २ ॥

संगीत – गायक : दशरथ पुजारी

# देव जरी मज कधी भेटला

देव जरी मज कधी भेटला, माग हवे ते माग म्हणाला
म्हणेन प्रभू रे माझे सारे जीवन देई मम बाळाला ॥ धृ ॥

कृष्णा गोदा स्नान घालु दे
रखुमाबाई तीट लावु दे
ज्ञानेशाची गाऊन ओवी
मुक्ताई निजवु दे तुजला ॥ १ ॥

शिवरायाच्या मागिन शौर्या
कर्णाच्या घेइन औदार्या
ध्रुव चिलयाच्या अभंग प्रेमा
लाभु दे चिमण्या राजाला ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत देसाई
चित्रपट : मोलकरीण

# जो आवडतो सर्वांला

जो आवडतो सर्वांला तोचि आवडे देवाला ॥ धृ ॥

दीन भुकेला दिसता कोणी
घास मुखीचा मुखी घालुनी
दुःख नेत्रीचे घेता पिउनी
फोडि पाझर पाषाणाला ॥ १ ॥

घेउनि पंगु आपुल्यापाठी
आंधळ्याची होतो काठी
पायाखाली त्याच्यासाठी
देव अंथरी निज हृदयाला ॥ २ ॥

जनसेवेचे बांधुन कंकण
त्रिभुवन सारे घेई जिंकुण
अर्पुन आपुले हृद्सिंहासन
नित भजती मानवतेला ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# शरण तुला भगवंता

✓

तूच कर्ता आणि करविता
शरण तुला भगवंता
मी शरण तुला भगवंता ॥ धृ ॥

तुझिया श्वासे पान हालते
हर्षे तुझिया फूल फुलते
तेज झळाळत गगनही झुलते
रवि-चंद्राचा तू निर्माता ॥ १ ॥

सुखदु:खाची ऊनसाउली
तुझीच जाणीव वेळोवेळी
तुझ्या कृपेच्या पंखाखाली
जीवदान ते मरणा मिळता ॥ २ ॥

देऊळ तूचि तूच मूर्ती
तूच आरती पूजा-भक्ती
तूच असता माझी पूर्ती
मागायाचे काय अनंता ? ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# सारी भगवंताची करणी

सारी भगवंताची करणी
अधांतरी हे झुले नभांगण शेषफणावर धरणी ॥ धृ ॥

लक्ष्मीसाठी घर गर्वाचे उंच बांधुनि देतो
गरिबासाठी गरीब होउन झोपडीतही रमतो
पतिता संगे पतीतपावन चालतसे अनवाणी ॥ १ ॥

समुद्रात जरी अथांग पाणी तहान शमवि श्रावणधार
अन्न ब्रह्म ते अखंड घेते काळ्या मातीतून अवतार
जगण्यासाठी तरी मानवा लाग प्रभूच्या चरणी ॥ २ ॥

जिथे वाजतो घुंगुरवाळा, बालक होऊन तिथे रांगतो
मायबाप तो सर्व जगाचा आईसाठी जगात येतो
हात जोडुनी देव बोलतो शरण तुला गे जननी ॥ ३ ॥

गायक : सुधीर फडके
संगीत : यशवंत देव
चित्रपट : सुखी संसार



# भावगीते

# हसले ग बाई हसले

हसले ग बाई हसले अन् कायमची मी फसले ॥ धृ ॥

नयनकवडसा टाकुन कुणीतर, दिपवी माझे लबाड डोळे
प्रीत–मधाचे सुंदर पोळे, हृदयी शिरुनी चोरुन नेले ॥ १ ॥

सांगायाची चोरी झाली, आई विचारी काय जहाले
चिडले, रुसले माझ्यावर मी मलाच होते हरवुन बसले ॥ २ ॥

पाळत ठेवुन त्या लुच्च्याला, धरुनी बांधुनी खेचित नेले
वाजत गाजत कैदी केले, शासन करिता घरास मुकले ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# लिंबलोण उतरता

लिंबलोण उतरता अशी का, झालीस ग बावरी
मुली तू, आलीस अपुल्या घरी ॥ धृ ॥

हळदीचे तव पाऊल पडता
घरची लक्ष्मी हरखुन आता
सोन्याहून ग झाली पिवळी
मांडवाला कवळुन चढली, चैत्रवेल ही वरी ॥ १ ॥

भयशंकित का अजुनी डोळे ?
नको लाजवू सारे कळले
लेकीची मी आहे आई
सासुरवाशिण होऊन मीही, आले याच घरी ॥ २ ॥

याच घरावरी छाया धरूनी
लोभ दाविती माय पक्षिणी
हसते घर हे तुझ्या दर्शनी
सुखव मलाही आई म्हणुनी, बिलगुनी माझ्या उरी ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# सप्तपदी मी रोज चालते

सप्तपदी मी रोज चालते
तुझ्यासवे ते, शतजन्माचे, हो माझे नाते ॥ धृ ॥

हळव्या तुझिया करांत देता
करांगुली ही रूप गोजिरी
गोड शिरशिरी उरात फुलता
स्पर्शाने जे मुग्ध बोलते ॥ १ ॥

करकमळांच्या देठांभवती
झिम्मा खेळत प्रीत बिलवरी
दृष्ट लाजरी जरीकाठी तो
तुझ्या लोचने वळुनी बघते ॥ २ ॥

आठवे पाऊल प्रीत मंदिरी
अर्धांगी मी सगुण साजिरी
मूर्त होता तुझ्या शरीरी
अद्वैताचे दैवत होते ॥ ३ ॥

गायीका: लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# बाळा होऊ कशी उतराई ?

बाळा होऊ कशी उतराई ?
तुझ्यामुळे मी झाले आई ॥ धृ ॥

तुझ्या मुखाचे चुंबन घेता, हृदयी भरते अमृत सरिता
तव संजीवन तुला पाजिता, संगम होतो उगमा ठायी
गाई झुरुझुरु तुज अंगाई ॥ १ ॥

माय भुकेला तो जगजेठी, तुझ्या स्वरूपी येऊन पोटी
मंत्र 'आई' जपता ओठी, महान मंगल देवाहुन मी
मातृदैवत तुझेच होई ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# तुझे डोळे पाण्याने भरले

तुझे डोळे पाण्याने भरले, माझे डोळे पाण्याने भरले
डोळे पाण्याने भरले ॥ धृ ॥

काळजातल्या रेशिमगाठी, तोडित असता दोघे मिळुनी
गळचास मारुनि आपुल्या मिठी, प्रीत विचारी कळवळूनी
'कसे कुणाचे सांगा चुकले', सांगा चुकले ॥ १ ॥

अबोल आम्ही दोघे बघुनी, प्रीत म्हणाली, 'जात्ये सोडुनी'
कढ दु:खाचे उरी दाबुनी, हात जोडिता थरथरुनी
तिला वंदण्या कर हे जुळले, कर हे जुळले ॥ २ ॥

मनें भंगली एक होउनी, धावु लागली तिच्या मागुनी
नकोस जाऊ म्हणता थबकुनी, गहिवरुनी ती म्हणे चुंबुनी
'झाले गेले, विसरा सगळे', विसरा सगळे ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# गळ्यात माझ्या तूच जिवलगा

गळ्यात माझ्या तूच जिवलगा मंगलमणी बांधले
जन्मोजन्मीची सुवासीन मी, तुझ्यामुळे जाहले ॥ धृ ॥

दिसायला मी काळी सावळी, मुलखाची लाजरी
नटणे सजणे या भोळीला, ठाऊक नसता परी
तव नयनांचा पाऊस अवचित पडला अंगावरी
वठल्या देही चैत्रपालवी, कणकण मोहरले ॥ १ ॥

प्रीतीची तव खातर होऊन, तुझ्याकडे धावले
जनरूढीच्या लोहशृंखला, झाली जड पाऊले
कुचाळकीची आग पसरुनी, उठता ही वादळे
हात देउनी तूच राजसा, फुलापरी झेलले ॥ २ ॥

पाचूचा हा चुडा भरूनिया, तुजभवती नाचले
आनंदाचे अश्रू उधळित, सप्तपदी चालले
तूच दयाळा सौभाग्याचे लेणे मज अर्पिले
अभागिनीच्या कुंकू कपाळी, सख्या तूवा लाविले ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
सगीत : वसंत प्रभू

# कृष्णा मिळाली कोयनेला

कृष्णा मिळाली कोयनेला, तसंच माझं माहेर बाई
येऊन मिळालं सासरला, सासरला ॥ धृ ॥

कृष्णेचं पाणी, कोयनेचं पाणी, एकरूप झालं
आलिंगनी, बाई आलिंगनी, ओळखायचं सांगा, कसं कुणी ?
संसाराचं तीर्थं बांधलं, लक्ष पायऱ्या घाटाला, घाटाला ॥ १ ॥

एका आईच्या पोटी येऊनि, ताटातुटी जन्मापासुनि
सासर माहेर नाव सांगुनि, नयनी नातं गहिवरुनि
बहिण भेटली बहिणीला ॥ २ ॥

शतजन्माची ही पुण्याई, घेऊनि आली कृष्णा माई
कोयना येई झुलवित डोई, मंगल घट ते न्हाऊ घालण्या
सुवासिनीच्या प्रीतीला, प्रीतीला ॥ ३ ॥

---

गायीका – लता मंगेशकर
संगीत – वसंत प्रभू

# हरवले ते गवसले का ?

हरवले ते गवसले का ? गवसले ते हरवले का ? ॥ धृ ॥

मीलनाचा परिमल तोचि, फूल तेचि त्या स्वरूपी
पाकळयांच्या उघडझापी, हास्य उमले वेगळे का ? ॥ १ ॥

पावसाळी ग्रीष्म सरिता, सागराला फिरुनी मिळता
जलाशयाची सृष्टी आता, मृगजळे ही व्यापिली का ? ॥ २ ॥

दूर असता जवळ आले, जवळ येता दूर गेले
जो न माझे दु:ख हसले, तोचि सुखहि दुखविले ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# हृदयी जागा तू अनुरागा

हृदयी जागा, तू अनुरागा, प्रीतीला या देशील का ? ॥ धृ ॥

बांधिन येथे घरकुल चिमणे, स्वर्गाचे ते रूप ठेंगणे
शृंगाराचे कोरीव लेणे, रहावयाला येशील का ? ॥ १ ॥

दोन मनांची उघडी दारे, आत खेळते वसंत वारे
दीप लोचनी सदैव तू रे, संध्यातारक होशील का ? ॥ २ ॥

घराभोवती निर्झर नाचे, जाणुन आपुल्या गूढ मनाचे
झाकुन डोळे एकांताचे, जवळी मजला घेशील का ? ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# प्रेम तुझ्यावर करिते मी रे

प्रेम तुझ्यावर करिते मी रे,
सांगितल्याविण ओळख तू रे ॥ धृ ॥

चंद्र झळकला तुझिया नयनी,
या डोळ्यातील प्रीत-रोहिणी
ओढुन किंचित निळी ओढणी,
हासत खुदुखुदु लाजत का रे? ॥ १ ॥

पल्लवतो बघ तनुलतिकेवर,
स्पर्श सुखाचा तो गुलमोहर
चैत्र-प्रीतीच्या आम्रतरुवर,
बोलत कुहुकुहु कोकिळ का रे? ॥ २ ॥

तुझ्या दिशेला वळता मोहुन,
सूर्यफुलापरी फुलते यौवन
भ्रमर मनाचा हृदयी रंगुन,
गुंजत हितगुज तुझेच का रे? ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# नसता माझ्या मनांत काही

नसता माझ्या मनात काही, पाठलाग हा उगाच बाई ॥ धृ ॥

झाली नजरानजर जराशी, हसलां तुम्ही हसले मीही हसले
यात वावगे झाले काही ? ॥ १ ॥

बघत सारखे येता पुढुनी, ओठ चावुनी मनात गढुनी
मान खालती घालुनि जाई ॥ २ ॥

जाता जाता मागे वळुनी तुम्हीच बघता आले कळुनी
सहज जेधवा पाही मीहि ॥ ३ ॥

स्वाभाविक ही उसळुनि आली, लाज रंगुनी खेळत गाली
अर्थ तयाचा भलता होई ॥ ४ ॥

पदराचा हा लागुनि वारा, कोट छातिचा तुमच्या सारा
कोसळून हा सदैव राही ॥ ५ ॥

गायीका : नलिनी मुळगांवकर
संगीत : वसंत प्रभू

# प्रिया मी येऊ कशी रे आत ?

प्रिया मी येऊ कशी रे आत ? पाऊले घुटमळती दारात ।। धृ ।।

तुझ्या बंधनासाठी, बंधने, लाख तोडिता जगी निंदणे
कधि न थांबते, का थांबणे, धांवत मन क्रान्ती ओघात ।। १ ।।

लाथाडून जग हे तुडवून, भयद, पेटत्या खाईतून
जगण्यासाठी मरणातून, इथवर आल्ये, माझ्या नादात ।। २ ।।

आत पाउले येतील राया, उठेल जग हे तुजसी खाया
निशिदिनि भरल्या नयनी पहाया, वेडी माया उंबरठ्यात ।। ३ ।।

गायीका : नलिनी मुळगांवकर
संगीत : वसंत प्रभू

# अपुरे माझे स्वप्न राहिले

अपुरे माझे स्वप्न राहिले
का नयनांनो जागे केले ? ॥ धृ ॥

ओळख तुमची सांगुन स्वारी
आली होती माझ्या दारी
कोण हवे हो म्हणता त्यांना
दटावून मज घरात नेले ॥ १ ॥

बोलत बसता वगळुन मजला
गुपित चोरटे ऐकू कशाला ?
जाण्याचा ते करुनी बहाणा
गुपचुप माझ्या मनात लपले ॥ २ ॥

नीज सुखाची तुम्हा लागली
मंद पाऊली स्वारी आली
गोड खळीने चहाडी केली
अधरासी नच बोलू दिले ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# मागता न जेथे मिळते

मागता न जेथे मिळते
बोलता न सारे कळते
त्या नगरीची राणी सखया
प्रीत तुझी रे करिते किमया ॥ धृ ॥

सौंदर्याला रूप न जेथे
सुगंध मोहक फूल न दिसते
चंद्राविण त्या चांदराती
वसंत नसता कोकिळ गाती
वृक्षाविण रे जेथे छाया ॥ १ ॥

मंदिर आहे मूर्ति न दिसते
भक्ताविण ती भक्ती वसते
तिलोत्तमेची माया तेथे
मच्छिंद्र सारे जिंकुन नेते
मायावतीला त्या जाऊ या ॥ २ ॥

# दिलवर माझा नाही आला

दिलवर माझा नाही आला,
चांद चवथीचा मावळला ॥ धृ ॥

किति समजावू विकल मनाला
मन समजावी फिरुनी मजला
आणि घालुनी गळचात गळा
अश्रुफुलांच्या गुंफित माला
दिलवर माझा नाही आला,
चांद चवथीचा मावळला ॥ १ ॥

उभी लोचनी व्याकुळलेली
अधिरता ही शिणली थकली
वाट बघुनिया नीज नीजली
पापणीच्या पायतळाला
दिलवर माझा नाही आला,
चांद चवथीचा मावळला ॥ २ ॥

नयनकवाडे उघडी अजुनी
कशी घेऊ मी बंद करूनी ?
त्रिभुवन धुंडुनी नजरा परतुनी
येतिल घेउन जर का त्याला
दिलवर माझा नाही आला,
चांद चवथीचा मावळला ॥ ३ ॥

---

गायीका : माणिक वर्मा
संगीत : वसंत प्रभू

# कितीकदा मी तुला भेटते

कितीकदा मी तुला भेटते,
बोलायचे राहून जाते
सखया बोलायचे राहून जाते ॥धृ॥
अवखळ आपुल्या डोळस भेटी
नजरा बांधीत त्या खुणगाठी
कर हळवा तो ठेवून ओठी
कुणावरी लज्जा म्हणते
सखया बोलायचे राहून जाते ॥ १ ॥
परिचय दुरुनी झाला पुरता
बोलायाचे ठरवून जाता
अवचित परि तू समोर दिसता
पदरच नुसता मी सावरते
सखया बोलायचे राहून जाते ॥ २ ॥
मुग्ध मनाची भाषा कळली
हृदये आली हृदया जवळी
मीलनाच्या अंतरवेळी
बोलायला काही न सुचते
सखया बोलायचे राहून जाते ॥ ३ ॥

गायीका : मीनल वाघ
संगीत : वसंत प्रभू

# मी हसले मनी रमले

मी हसले, मनी रमले
प्राणप्रियाला भेटावयाला, आतुरले डोळे ॥ धृ ॥

जीव माझा रंगुनी गेला
तुझ्या चिंतनी राया
मधुर अधर हे फूल उमलले
प्रीत रसाने रसरसलेले ॥ १ ॥

साज साजिरी मोहक नटले
बकुळ फुलांची वेणी माळली
नाव घेउनि, कुंकू लावता
लख लख दारी कनक पाऊले ॥ २ ॥

गायीका : नलिनी मुळगावकर
संगीत : वसंत प्रभू

# गाव तुझा तो पैलतिरी

गाव तुझा तो पैलतिरी गाव माझा ऐलतिरी ॥ धृ ॥

रोज अपुल्या त्या नजरांचा
संगम सेतू बांधायाचा
सप्त सुरंगी इंद्रधनूपरी
पाण्यावरती अधांतरी
गाव तुझा तो पैलतिरी गाव माझा ऐलतिरी ॥ १ ॥

लाल बदामी नवखे पाणी
हुरळुन चुंबित हिरवी धरणी
मन विरघळता कणाकणांनी,
प्रीत नाहली महापुरी
गाव तुझा तो पैलतिरी गाव माझा ऐलतिरी ॥ २ ॥

शब्द थांबला कवितेसाठी
आली कविता शब्दासाठी
अर्थ रंगता अपुल्या ओठी
गुंजत राहू एकसुरी
गाव तुझा तो पैलतिरी गाव माझा ऐलतिरी ॥ ३ ॥

# मनात नसता तुझ्या गडे

मनात नसता तुझ्या गडे
नकळत का मग असे घडे ॥ धृ ॥

डोळ्यातल्या किलबिलल्या
निळसर मैना इवलाल्या
गालावरी सरसरली कमलदलांची पखरण ही
नजर लावता तुझ्याकडे ॥ १ ॥

खट्याळ वारा पिसाळला
मादक दर्या उफाळला
देहावरी थयथयुनी मणीमोत्यांचे कणकणही
दिव्य साज हा कसा चढे ॥ २ ॥

विजय मिळवुनी तुझ्यावर
पदर चालला वाऱ्यावर
लज्जाभये फिरुनी सये, आवरसी कां मन अवखळ हे
मनात नसता प्रीत जडे ॥ ३ ॥

# राघू बोले मैनेच्या कानात ग

राघू बोले मैनेच्या कानात ग,
चल सखे आंब्याच्या बनात ग ॥ धृ ॥

तुझ्या चोचीत चोच
माझ्या चोचीत चोच
पानाआड शीळ घुमे दचकून तोच,
प्रीतीचा खेळ खेळे संकोच ग ॥ १ ॥

वळीव पाऊस तुझ्या डोळ्यातला
अन् गुलाबी गोडवा झुरणीतला
वेड लावी नखरा रूपातला,
मोहरून गेला हिरव्या पानात ग ॥ २ ॥

शुक् शुक् सगळं चांदणीरात
अमृत भरलं चराचरात
आळिमिळी गुपचिळी बाहुपाशात,
गुपित बोलुया श्वासात ग ॥ ३ ॥

गायीका : नलिनी मुळगावकर
संगीत : वसंत प्रभू

# घट डोईवर घट कमरेवर

घट डोईवर घट कमरेवर,
सोडी पदरा नंदलाला ॥ धृ ॥

कुणीतरी येईल, अवचित पाहिल
जाता जाता आगही लावील,
सर्व सुखाच्या संसाराला ॥ १ ॥

हलता कलता, घट हिंदळता
लज्जेवरती पाणी उडता
नकोच होईन मीच मला ॥ २ ॥

केलीस खोडी, पुरे एवढी
जोवर हसते मनात गोडी
हसुनी तूही हो बाजूला ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

## देवरूप होऊ सगळे

देवरूप होऊ सगळे आम्ही एकियाच्या बळे ॥ धृ॥

सप्तसागराला शक्ती, बिन्दु बिन्दु मिळता पाणी
एकजीवी अणुरेणुची, युगे युगे फिरते धरणी
प्रेमभाव स्वप्नी वचनी पांचामुखी ईश्वर बोले ॥ १ ॥

भूकवळी पक्षी धरता, पारध्याने टाकुन जाळे
पंख गुंतवून पंखी, एकरूप पक्षी झाले
गळ्यामधे घालुनी गळे, मृत्युलाच मारूनी गेले ॥ २ ॥

वाढवीत भेदभावा, दुष्टतेचा फिरतो कावा
गाठुनिया भोळ्या जिवा, अंधारात घालित घावा
चित्त नित्य सावध ठेवा, एकलक्षी लावुनी डोळे ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# काय करु मी बोला

काय करू मी बोला, घरी पाळणा सुना
नवनवसाचा बाळ माझा येइल का हो पुन्हा ? ॥ धृ ॥

जिवापाड मी होते जपले, हसऱ्या मुखीचे अमृत प्याले
चिमणे अश्रु पटपट टिपले, चुकुनि स्वप्नी कधि न बोलले
एकही शब्द उणा ॥ १ ॥

काळजात या घरे पाडुनी, घरभर फिरती गोड अठवणी
व्याकुळ होउनि उरी कवळुनी, चुंबित माया खेळ खेळणी
फुटतो मज पान्हा ॥ २ ॥

सुख माझे ते मुठीत इवले, देवा का रे नाही बघवले
पोटी घालुनि तुवाच नेले, जन्मीचे मज शासन घडले
माझा काय गुन्हा ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# करु नका गलबला कुणी

करू नका गलबला कुणी, बुलबुल माझा गुणी
झोपला सोन्याच्या पाळणी ॥ धृ ॥

रेशमाची दोरी सुंदर,
ओढित माया जोडित अंतर
झोका देई द्रिष्ट निरंतर
अंगाई गाउनी ॥ १ ॥

नकळे आली चोर पावली
नीज नयनी रिझवित बसली
पापणीचा मृदु मखमाली
फुलपडदा ओढुनी ॥ २ ॥

क्षणात हसतो, क्षणात रडतो
ऊन पाऊस घरात पडतो
बोबड मोती ओठी फुटतो
साठविला चुंबनी ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# तुझी न् माझी ओळख नसता

तुझी न् माझी ओळख नसता
हसले का रे बघता बघता ? ॥ धृ ॥

नयनही मिळता त्या नयनाला
बघण्याचा तो अन्वय जुळला
हसण्याचा परि अर्थ न कळला
अर्थाविण का हसते सरिता ? ॥ १ ॥

हसायचे ना मनात म्हटले
पुन्हा कधी जर तुला भेटले
अवचित दिसता भान हरपले
हसले काही मनात नसता ॥ २ ॥

माझ्यावर मी होते चिडले
जागेपणी ते स्वप्न पाहिले
अधर कुणाचे अधरी भिडले
अर्थही कळला डोळे मिटता ! ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# ओळख पहिली गाली हसते

ओळख पहिली गाली हसते
सांग दर्पणा कशी मी दिसते ॥ धृ ॥

आषाढीच्या तिन्हीसांजेला
पैलतिरी त्या पाणवठयाला
बघुनी ज्याला जीव लाजला
आठवण त्याची हृदयी ठसते ॥ १ ॥

नाव जयाचे घुमता कानी
चित्र रंगते मिटल्या नयनी
बाहुपाशी जाता विरुनी
माझ्यावर मी जेव्हा रुसते ॥ २ ॥

करी बांगडी राजवारखी
नथणी बुगडी तुझ्यासारखी
तुझ्यापरी तो रत्नपारखी
म्हणूनी तुजला घडी घडी पुसते ॥ ३ ॥

# कोणास ना कुणाची

कोणास ना कुणाची जाणीव ही पुरिशी
वाटे तुलाच का मी, मजलाच तू हवीशी ॥ धृ ॥

मी कोण तू कुणाची नाही कुणास ठावे
माझ्या मनातले का तू गीत गोड गावे
ना बोललो कधीही चुकुनी परस्पराशी
डोळेच बोलके हे बोलू न दे आम्हाशी ॥ १ ॥

किती मित्र-मैत्रिणींच्या, मेळ्यात बोलकी तू
होतेस का अबोल येताच मी परंतु
बघता तुला न माझ्या वाणीस ओघ यावा
हसुनी लगेच जाता ओठात ओसरावा ॥२ ॥

अवचित मीच दिसता थबकून बावरून
झणि घेतलेस ढळत्या पदरास सावरून
राजापुरीच गंगा उसळे तुझ्या उरात
नजरा हसून माझ्या न्हाल्या महापुरात ॥ ३ ॥

मराठी ग्रं… संग्रहालय ठाणे
दा. क्र. २६४३४

# निराळीच मी दिसू लागले

निराळीच मी दिसू लागले बघा निरखुनी जरा
प्रियकरा, ओळखले का ओळखले ॥ धृ ॥

नयनाभवती काजळवेली
प्रणयसरिता संथ जाहली
मला बघुनी का परसामधली, हसली सारी केळफुले ॥ १ ॥

गाय माउली घास चारता
हंबरली ती मला पहाता
तिचे लेकरु उरी कवळिता, रूप गोरटे माझे प्याले ॥ २ ॥

मणी मनगटी बघा खुळखुळा
घुमेल घरी या घुंगुरवाळा
वंशवेलीला अंकुर फुटला, जवळी घ्याहो, लाजुन गेले ॥ ३ ॥

गायीका : शैला मोहिले
संगीत : वसंत प्रभू

# मानसकन्या कण्वमुनीची

मानसकन्या कण्वमुनीची,
बसुनी वनी एकान्ती
गुंफिते माळ बकुळफुलांची ॥ धृ ॥

शारद नयनी उमलत होता
अनुरागाचा रम्य नीलिमा
अरुण कपोली गोड लालिमा,
फुलवित लाज तियेची ॥ १ ॥

यौवन सौरभ पुसतो तिजला
कोण यायचा सखे पाहुणा ?
नावाविणही घेत उखाणा,
प्रीत तिच्या हृदयीची ॥ २ ॥

आठवणींची करिता मृगया
हसते खुदुखुदु मनी आतुरता
सखया येता; मंगल घटिका,
आली स्वयंवराची ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# रामा हृदयी राम नाही

पतिव्रते चारुते, सीते, का रडसी धायी धायी ?
रामा हृदयी राम नाही ॥ धृ ॥

राहिलीस तू रावण सदनी, शंकित होता ती जनवाणी
त्यजिता तुजला याच कारणी, सर्वसाक्षी सर्वज्ञानी
राम तुझा तो उरला नाही ॥ १ ॥

पावित्र्याला कलंक लावुन, पतितची झाला पतितपावन
पवित्र करण्या श्री रघुनंदन, पतिव्रते तू लावी पणाला
शत जन्माची तव पुण्याई ॥ २ ॥

लोकाग्रणी त्या रामाहृदयी, जनता रूपी तूची सीता
तुला कलंकित तूच म्हणता, व्याकुळ झाला तव हृदयीचा
करुणाकर प्रभु रामचंद्रही ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू

# सांजवात लाविते

सांजवात लाविते
आई, स्मरण तुझे होते ॥धृ॥

मिटल्या नयनी तुझीच मूर्ती
येऊन सांगे शुभंकरोती
गहिवरूनी अश्रू म्हणती
भरचुड्याचे कर जोडिते ॥१॥

सुखी संसारी, तुझ्या कृपेने
कौतुक करण्या नाहीस तू पण,
पोरकीच ना आता तुजविण
लेक लाडकी हाक मारिते ॥२॥

बघण्या तुजला एकदाच ते
माहेराला चालत येते
कुशीत शिरुनी आई म्हणते
भीक घाल तू मातृदेवते ॥३॥

गायीका : माणिक दादरकर (वर्मा)
संगीत . वसंत प्रभू

# घरोघरी वाढदीन माझ्या वडिलांचा आला

घरोघरी वाढदीन माझ्या वडिलांचा आला
बारा मास सहा ऋतु अर्पिती वर्षमाला ॥ धृ ॥

देह चंदनाची काठी झिजे ज्यांची लेकीसाठी
सेवा साफल्याची उटी, लावलीत पितृत्त्वाला ॥ १ ॥

डोळियांच्या ओंजळीत तुडुंबलेली पाणगंगा
प्रेमाच्या तू पांडुरंगा चला उठा आंघोळीला ॥ २ ॥

सोडा आता उपवास लेक झाली मिळवती
घ्या हो घास माझे हाती वर्षाच्या या दिवाळीला ॥ ३ ॥

# असावे घरटे अपुले छान

असावे घरटे अपुले छान ॥ धृ ॥

पुढें असावा बागबगीचा
वेल मंडपी जाई जुईचा
आम्रतरूवर मधुमासाचा
फुलावा मोहर पानोपान ॥ १ ॥

संगमरवरी ती पुष्करणी
त्यात असावे गुलाबपाणी
पाण्यामधुनी कारंजाची
फुटावी सुरेल सुंदर तान ॥ २ ॥

फुलासारखे मूल असावे
नित्य चांदणे घरी हसावे
तीर्थरूपे ओवाळावे
अपुले जीवन पंचप्राण ॥ ३ ॥

गाईका : सुमन कल्याणपूरकर
संगीत : दशरथ पुजारी

# कल्पवृक्ष कन्येसाठी

कल्पवृक्ष कन्येसाठी लावुनिया बाबा गेला
वैभवाने बहरून आला, याल काहो बघायाला ॥ धृ ॥

तुम्ही गेला आणिक, तुमच्या देवपण नावा आले
सप्तस्वर्ग चालत येता, थोरपण तुमचे कळले
गंगेकाठी घर हे आपुले, तीर्थक्षेत्र काशी झाले !
तुम्हावीण शोभा नाही, वैभवाच्या देऊळाला ॥ १ ॥

सूर्य चंद्र तुमचे डोळे दुरूनीच हो बघतात
कमी नाही आम्हा काही, कृपादृष्टीची बरसात
पाच बोटे अमृताची, पंचप्राण तुमचे त्यात
पाठीवरी फिरवा हात, याहो बाबा एकच वेळा ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू


गौळण

# उठी गोविंदा उठी गोपाळा

उठी गोविंदा, उठी गोपाळा उषःकाल झाला
हलके हलके उघड राजीवा नील नेत्रकमला ॥ धृ ॥

तुझ्यापरी बघ जीवन-वारा, मिठी मारतां प्राजक्ताला
धवल केशरी मृदुल सुमांचा, पाऊस अंगणी झिमझिमला ॥ १ ॥

पर्ण पोपटी हिंदोळ्यावर, कंठ फुटतो आनंदाला
तुज भूपाळी आळवित सुंदर, चढली गगनी विहंगमाला ॥ २ ॥

गोठ्यामधले मुके लेकरू, पीत झुरुझुरु कामधेनुला
भरला पान्हा किती आवरू, हासवी अरुणा तव आईला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# राधा गौळण करिते मंथन

राधा गौळण करिते मंथन-
अविरत हरीचे मनात चिंतन

सुवर्ण चंपक यौवन कांती–
हिन्दोलत ती मागे पुढती
उजव्या डाव्या झुलत्या हाती–
कृष्ण कृष्ण ते बोलत कंकण ॥ १ ॥

नाद मुरलीचा पडता कानी–
बावरली ती गोकुळ हरिणी
छुमछुम छंदी घुंगूर चरणी–
गुणगोविंदी गेली रंगून ॥ २ ॥

राधेविण ते मंथन चाले–
नवल बघाया नवनित आले
ध्यान तियेचे उघडी डोळे–
दृष्टी पुढती देवकी नंदन ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# मजवरी माधव रुसला बाई

मजवरी माधव रुसला बाई, काही केल्या बोलत नाही ॥ धृ ॥

सोनपाऊले मी आसवांनी, न्हाऊ घातली करकमलांनी
पूजा बांधिली भावफुलांनी, उधळुनी मजला लोटुन देई ॥ १ ॥

लगटुनि अंगा किती विनविले, बोल नाही तर मी पण रुसले
रुसता रुसता मधेच हसले हरी गोजिरा– हसला नाही ॥ २ ॥

तव हृदयाची चोरी केली, राधेची का आगळिक झाली
अनंत हृदये तुवा चोरिली, राग कधी कुणी धरला नाही ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# दर्पणी बघते मी गोपाळा

दर्पणी बघते मी गोपाळा
साज सुगंधी करू कशाला ?          ॥ धृ ॥

कोमल माझ्या प्रतिबिंबातुन,
बिंब तयाचे बघते न्याहळुन
नेत्र फुलांची होतां पखरण,
फुलवेणी ही घालु कशाला ?          ॥ १ ॥

स्वैर अजाणु पाठीवरती,
श्यामल कुरळे कुंतल रुळती
सुंदरतेला मिळता मुक्ति,
मोहबंधनी बांधु कशाला ?          ॥ २ ॥

भरता चिंतन नयनी अंजन,
गोविंदाचे घडता दर्शन
भक्तीचे हे बांधुन पैंजण,
लोकरंजनी नाचु कशाला ?          ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू

# राधा कृष्णावरी भाळली

राधा कृष्णावरी भाळली
गुजगुज उठली गोकुळी ॥ धृ ॥

अमृत वृक्षी फुलला मोहर
कोकिळकंठी फुटला सुस्वर
कुंजवनातून फुलाफुलातून
नवलकथा दरवळली ॥ १ ॥

वायुवेगे सुगंध वार्ता
कालिंदीच्या कानी पडता
हरिभक्तीची ओढ तियेची
नीळजळी थयथयली ॥ २ ॥

अमरप्रीतीचे गीत लाघवी
हरी अधरीची वेणू वाजवी
राधामोहन बघण्या मीलन
इंद्रपुरी अवतरली ॥ ३ ॥

# वेड लागले त्या राधेला

जो तो सांगे ज्याला त्याला
वेड लागले त्या राधेला ॥ धृ ॥

पितांबराची साडी ल्याली
मोरपिसांची करी काचोळी
वेळी अवेळी काजळकाळी
उटी लाविते मुखचंद्राला ॥ १ ॥

विळखा सुंदर कचश्रेणीचा
मुकुट चढविते फुलवेणीचा
हार अर्पिता मुक्तामणिचा
मोडीत डोळे प्रतिबिंबाला ॥ २ ॥

डुंबत अविरत यमुना डोही
राधेची ती कृष्णा होई
मिठी मारते ओलेतीही
शेषशाही भगवंताला ॥ ३ ॥

# हसुनि एकदा मला मुकुंदा

हसुनि एकदा मला मुकुंदा, केलीस का रे वेडी ?
चित्र तुझे रे नेत्र काढते, बघ ना माझ्याकडे

मोरमुगुट तो तुला शोभला
चंद्र केशरी भाली रेखिला
नकळत जुळले कर गोपाळा
नको मिटु तू नेत्रकमळा, प्रीत भृंग सापडे ॥ १ ॥

अधर चुंबनी मधुरा रमली
नको श्रीधरा घुमवु मुरली
ढळे पापणी गळे कुंचली
सुरासंगती अंतराळी, चित्तपाखरू उडे ॥ २ ॥

कुणी अपुरे ते पूर्ण केले
चित्र तुझे रे मीच झाले
हसलासी तू विश्व हासले
चंद्र काळा नवल घडले, लख्ख चांदणे पडे ॥ ३ ॥

# चालल्या गौळणी मथुरेकडे

चालल्या गौळणी मथुरेकडे,
झुलत शिरी दह्यादुधाचे घडे ॥धृ॥

कुणी कामिनी, कुणी भामिनी,
रुप देखणी त्यात पद्मिनी,
राधा गौळण पूढें ॥१॥

मृग नयना कुणी भरूनी अंजन,
रुणझुणु रुणुझुणु बोलत पैंजण
सांगत मुखिचे ते गुणगुणन,
प्रीत हरिवर जडे ॥२॥

स्वप्न सुरांची, मोहन मुरली,
अवचित त्यांच्या कानी घुमली,
दचकता गौळणी राधा हसली,
बघुन कृष्ण कृष्ण चंहुकडे ॥३॥

# उधळित नवरस रंग

उधळित नवरस रंग
    आला ग आला गोकुळीचा श्रीरंग ॥ धृ ॥

रंगपंचमीच्या गोड सणी
जमल्या होत्या गोप गौळणी
धरुनी फेरा नृत्यनर्तनी
    जाहल्या गीत गायनी दंग ॥ १ ॥

करी घेऊनी ती पिचकारी
हर्षे उडवित शाम मुरारी
भिजता भरजरी वस्त्रे सारी
    भिजवी अंगामधले अंग ॥ २ ॥

राधेला हरी मिठी मारता
गोरी गौळण शामल होता
म्हणते राधा गोपी हसता
    भोवला निस्संगाचा संग ॥ ३ ॥

# चला बाई चला

आला बाई आला, दिवाळी सण हा आला
मथुरेच्या बाजाराला चला
चला बाई चला
दिवाळी सण हा आला ॥ ध्रु ॥

सण हा मोठा, बाजार खोटा
कशाला बघताय फायदा तोटा
लोणकडी तुपाचा घेतलाय साठा
चढत्या भावात विकू या चला ॥ १ ॥

एकमेकी जाऊ या नटून थटून
गाठीचा पैसा संभाळा जपून
मोलाची अब्रू नेतील लुटून
नका करु कुठं वाकडा डोळा ॥ २ ॥

# कलेकलेने चंद्र वाढतो

कलेकलेने चंद्र वाढतो, चिमणा नंदाघरी
पाजळल्या या अमृतज्योती, देवकिच्या अंतरी ॥ धृ ॥

प्रतिबिंबाचे लखलख आता घरोघरी हे दिवे
देवकिच्या या आनंदाने विश्व उजळले नवे
सुरांगणांच्या सवे उतरले नक्षत्रांचे थवे
त्रैलोक्याची आज दिवाळी करावया साजरी ॥ १ ॥

हर्षपुराने चढू लागले यमुनेचे पाणी
देवकिच्या या नयनामधुनी यशोदेच्या नयनी
घडे भरुनिया बघा चालल्या गोकुळच्या गौळणी
झडत चौघडे माया येता मथुरा गोकुळपुरी ॥ २ ॥

चंदन चर्चुनी हर्षजलाने न्हाऊ घातले बाळा
नांव ठेवण्या जमला होता सुवासिनींचा मेळा
घ्या गोविंदा, घ्या गोपाळा, अनंत नामे बोला
जगदोद्धारा धरी यशोदा पाळण्याची दोरी ॥ ३ ॥

# रुसता रागे मी कृष्णावर

रुसता रागे मी कृष्णावर, रुसले मजवर सर्व चराचर ॥ धृ ॥

आटले जल ते निर्झरांचे सुकले कुंजही रानकुलांचे
जळले मोहर तरुवरांचे, दिंडीर वन हे उदास भेसूर ॥ १ ॥

रागावुन तो रवि आभाळी, दाहक तेजे अवनी जाळी
चंपक गोरी भिमक बाळी, पडली काळी काजळ कातर ॥ २ ॥

असेन नाथा उगाच रुसले, म्हणेन मी रे बळेच चुकले
विसरून आता झाले गेले, व्याकुळ जीवा हसवी क्षणभर ॥ ३ ॥

# रिम झिम पाऊस पडे सारखा!

रिम झिम पाऊस पडे सारखा,
यमुनेलाही पूर चढे!
पाणीच पाणी चहूकडे, ग बाई
गेला मोहन कुणीकडे ॥ धृ ॥

तरुवर भिजले भिजल्या वेली
ओली चिंब राधा झाली
चमकुन लवता वरती बिजली
दचकुन माझा ऊर उडे
ग बाई गेला मोहन कुणीकडे ॥ १ ॥

हांक धावली कृष्णा म्हणुनी
रोखुनी धरली दाही दिशानी
खुणविता तुज कर उंचावुनी,
गुंजत मंजुळ मुग्ध चुडे
ग बाई गेला मोहन कुणीकडे ॥ २ ॥

जलाशयाच्या लक्ष दर्पणी
तुझेच हसरे बिंब पडे
हसता राधा हिरव्या रानीं
पावसातही ऊन पडे
ग बाई गेला मोहन कुणीकडे ॥ ३ ॥


लावणी

# मला हेरून फाकडी

मला हेरुन फाकडी गालात खुदकन हसली
गो-या दंडात चोळी कशी रुतली ॥ धृ ॥

भरल्या बाजारपेठी झाल्या नजरा भेटी
गहि-या डोळ्यात काळी मैना छुमछुमली
आली कवळी लाली कुसुंबाची कळी
तिच्या ओठात चटकन फुलली ॥ १ ॥

जसा चालण्याचा झोक तसा बघण्याचा रोख
दाती पदराचं टोक वावडी पिरतीची उडवीत चालली
नाकी नथनी झुले कानी कुंडल डुले
मागे बघताच ठेच तिला लागली ॥ २ ॥

गायक : परशराम
संगीत : राम कदम
सिनेमा : पुरुषाची जात

# तुला बघुन पदर माझा पडला

तुला बघुन पदर माझा पडला
तुझ्या पिरतीचा रोग मला जडला

जरा डोळा होता माझा लागला
राती सपनामधि तुमि माझ्या आला
बागेमधला गुलाब तुम्ही खुडला ॥ १ ॥

डोळा बांधुन लागली पाठी
कशी मारु तुला रे राया मिठी
डोळं सोडुन गेली रे माझी दिठी
कुठं मनाच्या कोपऱ्यात दडला ॥ २ ॥

कुठवर करु तुझी मनधरणी
जीव मैनेस लावलीस झुरणी
कशी म्हणू मी प्रीत वरकरणी
माझ्या डोळ्याला डोळा तुझा भिडला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम

# काल राती सपान पडलं

काल राती सपान मला पडलं
घडु नये ते सपनामधी घडलं

राया पीरतीनं पाडलं फसी
चार चौघात बोलू कशी ? ॥ धृ ॥

काळोखात पडलं डोळ्याचं चांदणं
लालबुंद ओठाखाली दिसलं गोंदणं
लाजून हसता थांबलं बोलणं
गोऱ्या पान हाताची केली मी उशी ॥ १ ॥

पंखाचा घोडा कळ त्यानं दाबली
प्रीत माझी कवळी उचलून घेतली
सुखाच्या सर्गाची लांबी रुंदी मोजली
करमेना राया जवळी घ्या कुशी
चार चौघात बोलू कशी ? ॥ २ ॥

# लाडी गोडी कशापायी सजणा ?

परनार, नंगी तरवार, जिव्हारी वार करील मनरमणा
लाडीगोडी कशापायी सजणा? ।। धृ ।।

नयन कमलकोषात, लपुनि दिनरात, प्रीत दिवाणा
छंदीफंदी, मधुमकरंदी, जाहला बदी, भृंग रसराणा ।। १ ।।

रूपाचा सोनसळी सर्प, विषारी दर्प, उभारुनी फणा
नका मारू दृष्टिचा खडा, वाजतो चुडा,
डंख जिवघेणा ।। २ ।।

नवतीनं फुलविली काया, सजवली शय्या, जिवलगा येना
दिली आस, लावुनी ध्यास, झुरणीचा फास,
माझिया प्राणा ।। ३ ।।

गायिका – आशा भोसले
संगीत – दत्ता डावजेकर
चित्रपट – सून लाडकी या घरची

# गुटुर्घूम गुटुर्घूम

गुटुर्घूम गुटुर्घूम गुटुर्घूम
अहो कबुतर घुमतंय्, कबुतर घुमतंय्
मन माझं सांगतंय् तुझं जमतंय् ॥ धृ ॥

अहो गळ्यात पेटी, अहो डोईवर फेटा
मिशीचा आकडा दरारा मोठा
डोळ्यापुढं चित्तर दिसतंय खंगतय् ॥ १ ॥

अहो पहिल्या भेटी, अहो बाजारपेठी
प्रीतीनं बांधल्या रेशीमगाठी
पायात जोडवं वाजतंय् बोलतंय् ॥ २ ॥

# टाकुन बघते खडा

टाकुन बघते खडा
तळ लागेना, अंत कळेना
वरिवरि येतो फुटूनी विरतो
पाण्याचा बुडबुडा ॥ धृ ॥

लाल चोळीला हिरवी साडी
गाली गुलाबी लाडी गोडी
गोऱ्या हाता शोभत आता
रत्न पाचुचा चुडा ग बाई ॥ १ ॥

ऐकुन आपल्या नावा
आले तुमच्या गावा
निमित्त केले, पाण्या आले;
रिकामा अजुनी घडा ग बाई ॥ २ ॥

नजरेला लागेना नजर
पडली पापणी, पडला पदर
बांधा डोळे, टाका जाळे
हरिण बावरी पकडा ग बाई ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : सलामी

# माझ्या पदराचा वंगाळ वारा

माझ्या पदराचा वंगाळ वारा
नको लागू तू नादाला पोरा

नाही मिसरुड फुटली ओठी
ग बाई बाई ओठी
नको लागूस माझ्या पाठी
ग बाई बाई पाठी
मी न माझी न कुणासाठी न कुणासाठी
माझ्या पदराला गाठी सतरा ॥ १ ॥

धुंद शिकारी तांबूस डोळं
तांबूस डोळं
किरण साधून टपून बसलं
आलं गेलं जिवास मुकलं
नको जिवास गमावू कोकरा ॥ २ ॥

गायिका : मधुबाला चावला
संगीत : मधुकर फाटक

# तुला बघुन पदर माझा पडतो

तुला बघुन पदर माझा पडतो
डोळ्याचा पारवा उडतो ॥ धृ ॥

शालू हिरवा फुलांचा साज
तुझ्यासाठी केला मी आज
आली वयात पहिली लाज
रंग गुलाबी गाली चढतो ॥ १ ॥

अडविता प्रीतीनं वाटा
गोऱ्या अंगी कोवळा काटा
जाता गळून मनाचा ताठा
रूप गुगाचा उजेड पडतो ॥ २ ॥

तुझ्या नयनाचा घेऊन ऐना
आली जिवाची हासत मैना
नाचता बांधुनी पैना
देहाचा मोर बाई डुलतो ॥ ३ ॥

# अ प्र का शि त
# गी ते

# श्री सद्‌गुरु श्री गजानन महाराज

जयजय सद्‌गुरु श्री माऊली
अविरत धरते आमुच्यावरती
करुणाघन साऊली ।। धृ ।।

जय जय सद्‌गुरु श्री माऊली
सहस्र दलांचे सूर्यकमल ते,
आत्मतेज ते उधळित येता,
गुरुमायेला न्हाऊ घालता,
भावभक्तीने उटी चर्चिता,
प्राणफुले वाहिली ।। १ ।।

जय जय सद्‌गुरु श्री माऊली
अष्टसिद्धी जमल्या भवती
पंचत्वाची पंचारती ती
घेऊन हाती आदिशक्ती
जय जय गर्जत गात आरती
ओवाळित राहिली ।। २ ।।

जय जय सद्‌गुरु श्री माऊली
रामप्रभु तो पंचवटीचा,
हाक मारता धावत येतो,
गुरुमायेचा शब्द झेलतो,
भक्तीच्या त्या भालावरची
विधिलिखिते पुसली ।। ३ ।।

जय जय सद्‌गुरु श्री माऊली
प्रेम चांदणे सदैव फुलते,
गुरुमायेचे घडता दर्शन,
भक्तावरती अमृतसिंचन,
याच देही याच नयनी
माय प्रभू पाहिली ।। ४ ।।

जय जय सद्‌गुरु श्री माऊली
अविरत धरते आमुच्यावरती
करुणाघन साऊली ।। धृ ।।

(श्री. अण्णासाहेब पट्टेकर महाराज, ठाणे)
यांचे पूज्य चरणी समर्पण

# देहूला कळस, पाया आळंदीला

देहूला कळस, पाया आळंदीला
माझ्या मराठीच्या चला माहेराला ।। धृ ।।

सोन्याच्या पिंपळा घाला एक फेरी
दाटता हुंदका बसा क्षणभरी
ज्ञानियाची लेक येता ज्ञानेश्वरी
कंठी घाला प्रेमे आसवांच्या माळा ।। १ ।।

ज्ञानियाचा राजा आला जिच्या पोटी
अमृताते पैजा बांधुनिया गाठी
बैसली मंदिरी माऊली मराठी
दंडवत घाला देव माऊलीला ।। २ ।।

ज्ञानेशाची ओवी होता ती अभंग
देहू गावी झाला तुका पांडुरंग
भक्तीच्या कल्लोळी विठ्ठल तो दंग
इंद्रायणी काठी चला पंढरीला ।। ३ ।।

# घडले नसते ते रामायण

नसती कैकयी, नसता रावण
घडले नसते ते रामायण ॥ धृ ॥

वीरधुरंधर राजा दशरथ
इंद्रासाठी स्वर्गी लढता
रथचक्राचा कणा मोडता
कैकयीने त्या हात घालता
वज्रचुडा तो सौभाग्याचा
गेला असता अवचित भंगुन ॥ १ ॥

वज्रचुडचाची कळली शक्ती
वज्रधारी देवेंद्राला
शुभकल्याणी नसती कारण
प्रबळ दानवा जिंकायाला
राव दशरथे दिधले नसते
दोन वरांचे ते आश्वासन ॥ २ ॥

सावज समजून श्रावणबाळा
रघुवंशाचा बाण लागता
काळासंगे वेळ न येता
मृत्यू परतुन गेला असता
पुत्रवियोगे शाप तेधवा
फुटला नसता ब्रह्ममुखातुन ॥ ३ ॥

(पुढील पानावर)

(मागील पानावरुन)

वरमिश्रित तो शाप अमंगल
सार्थ तेधवा झाला नसता,
कौसल्येच्या उदरी प्रभू तो
राम कधिही आला नसता,
वाल्मिकीने जरि रामाआधी
रचिले असते ते रामायण
घडले नसते हे रामायण ॥ ४ ॥

देवदानवा बंदित टाकी
शूर अलौकिक होता रावण,
शिव चापाला दोर लावता
करी पराभूत सीतेचा 'पण'
पोर चिमुकला, राजसबिंडा
गेला नसता 'पण' तो जिंकून ॥५॥

चतुर शहाणी, त्रिकाल ज्ञानी
पतिव्रता ती कठोर झाली,
पतिदेवाचा मृत्यु बघण्या
नियती होऊन कैकयी आली!
दोन वरांचे स्मरणच नसते
घडले असते राज्यारोहण
घडले नसते ते रामायण ॥ ६ ॥

# संत नामदेव

संत नामदेव आगळाचि संत
ज्याच्यापुढे उभा सदा भगवंत ॥ धृ ॥

घास घेण्यासाठी नामयाच्या हाती
तोंड उघडते पाषाणाची मूर्ती
चोरट्या श्वानाच्या लागूनीया पाठी
घेरे तूपवाटी म्हणोनी धावत ॥ १ ॥

ज्याच्या घरी झाली संत जनी दासी
करी काम धंदा सवे हृषीकेशी
पडता घरात सोनियाच्या राशी
देई फेकुनीया भीमेच्या डोहात ॥ २ ॥

नामा रंगुनीया करीता कीर्तन
वेडावून विठ्ठल करीत नर्तन
बोले तैसा चाले ज्याचे हो वर्तन
जातकुळी त्याची आम्ही भाग्यवंत ॥ ३ ॥

# शोधित गोविंदा

शोधित गोविंदा, निघाली गवळ्याची राधा ॥ धृ ॥

कृष्ण कृष्ण या नामस्मरणी
रोज पहाटे करिता मंथन
दिसायचा तो दृष्टी पुढती
दिसला नाही तो मनमोहन
बावरुनी ती गोकुळहरिणी, धुंडु लागली मुरली मुकुंदा ॥ १ ॥

कुंजवनीच्या तरुवेलींना
मिठी मारुनी पुसते गौळण
सोंग मुक्याचे घेऊन हसते
तालतरुवर कृष्णाकमळण
गंधउटीचा सौरभ येता, पवनापाठी पळते राधा ॥ २ ॥

हरिविण जीवन कंठु कशी मी ?
अश्रू ढाळीत राधा म्हणते;
नदी कालिंदी तिचिया सन्मुख
जलाशयाचे दर्पण धरते
प्रतिबिंबातुन बिंब पाहते शामल सुंदर परमानंदा ॥ ३ ॥

# माग हवे ते देव म्हणाला

माग हवे ते देव म्हणाला
मागितले मी बालपणाला ॥ धृ ॥

हसरा रडवा बोबडकांदा
बाळ होऊनी पुन्हा एकदा
शुभं करोती, अंगाई ती
मायमुखातून ऐकायाला ॥ १ ॥

मऊ मेणाहुनी अंतरी तात
कठोर होता वज्राघात
त्या वडिलांच्या बसुनी स्कंधी
हवे तसे ते मिरवायाला ॥ २ ॥

घुंगुरवाळा बांधुनी पायी
चिरंजीव तू देवा मीही
मायपित्याचे चिरप्रेमाचे
ऋण जन्मीचे फेडायाला ॥ ३ ॥

# नयना आज पुन्हा दिसतो

नयना आज पुन्हा दिसतो बालपणा ॥ धृ ॥

पिंपळ उंच उभा पडका पार तळी
रुसुनी तेथे बसे रडकी पोर खुळी
पुसतो आसू तिचे, चिमणा मित्र जुना-
नयना आज पुन्हा ॥ १ ॥

शाळेमधुनी दुडुदुडु येता दोघेजण संगती
जपुन ठेविला खाऊ भरवी मैत्रिणीला सोबती
वितळे राग तिचा, झाला स्नेह दुणा-
नयना आज पुन्हा ॥ २ ॥

धूर ओकल्या चिमणी पुढती दोघेजण वाचिती
वागण्यातल्या चुका कालच्या दोघांही टोचिती
ओळख ना देती तरीही कोणी कुणा-
नयना आज पुन्हा ॥ ३ ॥

जरी ना आले भाव सांगता त्याला ओठांनी
अलगद केले गाल कोरडे चिमण्या बोटांनी
सरले बाल्य तरी पुसल्या त्या न खुणा-
नयना आज पुन्हा ॥ ४ ॥

# मेनका भूवरी उतरे

मेनका भूवरी उतरे
स्वरुपाचे तुटती तारे तुटतो तारे ॥ धृ ॥

भावना रूपचंद्राची कामना भूप इंद्राची
उधळीत फुले गर्वाची मदनिका रंजना विहरे ॥ १ ॥

चालते रंगढंगात चमकते वीज अंगात
गरगरा रोमरोमात फिरविते चांदणे भवरे ॥ २ ॥

बोलते धुंद डोळ्यात हासते मंद गालात
लाजऱ्या लोभरागात प्रणयिनी जादुही पसरे ॥ ३ ॥

## जय जय शंकर

जय जय शंकर, नामशुभंकर
चल आनंदुन बोल मना,
माझ्यासंगे पुनः पुन्हा ॥ धृ ॥

संकट येता घोर भयंकर
नाम घेता हे करुणाकर
दो बाहूंच्या हिंदोळ्यावर
डुलु लागला नागफणा ॥ १ ॥

कणमातीच्या पिंडपूजनी
बिल्व दलांची रास रचुनी
मुखे अखंडित शिवहर म्हणुनी
प्रसन्न केला तो सुरराणा ॥ २ ॥

नामघोषे उठली भक्ती
अणुरेणूतुन माझ्या भवती
देवपणाची येता प्रचिती
सांग भाविका सर्व जना ॥ ३ ॥

# उठा, जागे व्हा लोकनाथ

उठा, जागे व्हा लोकनाथ !
दिवसा येथे, राज्य करते,
वैऱ्याची ही रात ॥धृ॥

पडली टिपरी वाजे पडघम
नेतेपण हे हरकुच हरदम
मुकुट आपुला घेऊन विक्रम
चालत ये दारात ॥१॥

पार्थापरी ही झाली जनता
जगण्यासाठी वरे भिरूता
कर्तव्याची सांगा गीता
रथ घाला समरात ॥२॥

गाव मराठी, नाव मराठी
बुडे सर्व ते उघडा दृष्टी
बलिदानाच्या घोर संकटी
प्राण भरा प्राणात ॥३॥

# सारस्वत मंदिरात

सारस्वत मंदिरात, माझी मराठी आज येत
जयविजयाची सुमने उधळित
बोला सुस्वागत, सुस्वागत ॥ धृ ॥

मराठमोळी वागेश्वरी
ज्ञानेशाची बंडखोरी
पंचारती घेऊन करी
माऊलीला ओवाळित ॥ १ ॥

नाथांच्या त्या कडेवरले
मूल तान्हुले इथे उतरले
पंचपळिने देऊ लागले
कावडीतले ते पंचामृत ॥ २ ॥

तुकया लावी अबिर गुलाला
समर्थ गुरुच्या श्रीरामाला
शिवरायाच्या रूपगुणाला
समशेरीने अभिवादित ॥ ३ ॥

# सोडू नको देऊळ

जन्मा आधी दोन जिवांचे, घडते स्वर्गी हे शुभमंगल
अशी का झालीस शंकाकुल ? ॥ धृ ॥

भालचंद्र तो भाळी रेखिता
रूपदर्पणी पतिला बघता
फुटता हासू, फुलत कपोली
लाजरीचे ते फूल ॥ १ ॥

कामधाम तू करिता करिता
आलि न स्वारी आठवण म्हणता
कौल न देते जाळून चिंता
फुरफुरुनीया चूल ॥ २ ॥

शतजन्माचे जीवित धागे
बळेच तोडुन तुटत्ति का गे ?
कधि तर दैवत येइल मागे
सोडु नको देऊळ ॥ ३ ॥

# तुझी देवदासी

काया वाचा मने करिते मी सेवा
तुझी देवदासी जन्मजात देवा ॥ धृ ॥

बांधुनिया हात धरी दाती तृण
रूपगर्व माझा तुझ्या पदी लीन
घाली लोटांगण पातकी जीवन
साधिला कुणी रे माझा हेवादावा ॥ १ ॥

मूर्त गोजिरी ही तुझी पाहण्याला
भवतीचे अंजन भरीन मी डोळा
कृष्ण कृष्ण हरी बोलता घुंगरी
नाचता मी नित्य, वाजवी तू पावा ॥ २ ॥

चंद्रमुखी माझ्या तुझी नामावळी
विनाशी सुखाची भूक पार गेली
तुटे भावबंध, लागे तुझा छंद
मिळो ब्रह्मानंद जोगिणीच्या जीवा ॥ ३ ॥

# हले डुले ऽऽ हले डुले ऽऽ

हले डुले ऽऽ हले डुले ऽऽ
माझी ग नौका हलेडुले ॥ धृ ॥

च्हुकडे ग पाणी पाणी
तूं मी दोघं नाही कुणी
नभात हसरी किती फुले ॥ १ ॥

चंद्र वळुनी तुझ्याकडं
तू तर बघसी माझ्याकडं
खुळी चंद्रिका मागे पळे ॥ २ ॥

तिची सांडली ओच्यातली
फुले वेचण्या पाण्यातली
नको वाकू ग होडी कले ॥ ३ ॥

पाण्यात सपसप सुरुसुरु
उरात हळवी झुरुमुरु
थरथर आणखी कशामुळे ॥ ४ ॥



म. १८ ग्रं. ग्रंथालय ठाणे
२५९६
दा. क्र. २८४३८

# मूर्तिमंत रे मालकंस तू

मूर्तिमंत रे मालकंस तू ॥ धृ ॥
प्रीत तुझी मी जयजयवंती

देहतरुवर चैत्र निरंतर
लावण्याचा फुलवी मोहर
अधरपल्लवी स्वर पंचम तो
कोकिळ कंठीं मी रसवंती ॥ १ ॥

हर्ष मानसी दिवसा राती
चंद्र फुलांच्या शय्येवरती
शामल सुंदर नेत्रभृंग तू
पद्मलोचना मी फुलवंती ॥ २ ॥

नवरस राजा शृंगारच तू
जीवजिवांचा जादुगार तू
होऊन येता राजहंस तू
होइन चंचल मी जलवंती ॥ ३ ॥

# चंद्र तोच अन् तेच तारे

चंद्र तोच, तेच तारे तीच चांदणी रात
तू मी होतो, परंतु नव्हती त्या रात्रीची बात ॥ धृ ॥

निशिगंधाचा सुगंध उधळित तसाच आला वारा
अंगाला अंग लागता तसा फुलला शहारा
गळ्यात माझ्या तसाच पडला तुझा गोरटा हात
परंतु नव्हती मादकतेची सळसळ बिजली त्यात ॥ १ ॥

त्याच तरुतळी किरण सावल्या लपंडाव खेळे
तशीच आपूली नजर मिळवणी तसेच हसले डोळे
भावगीत तू तेच गाइले त्याच रंग-रागात
परंतु नव्हते हृदय उतरले तुझ्या गोड गाण्यात ॥ २ ॥

# हसता मी हसशी का

हसता मी हसशी का, सांग चंद्रा सांग रे
अंतरीच्या अंगणी या रातराणी मोहरे ॥ धृ ॥

पुष्पपडदा पापणीचा सरसरा मी ओढुनी
नेत्र माझे राजसाचे चित्र घेता काढुनी
पाहिले ते का कधी तू भाव माझे लाजरे ॥ १ ॥

गुज माझे रंगता हे चंद्रिकेच्या लोचनी
दृष्ट माझी नाचते रे होऊनिया मोहिनी
पोर्णिमेच्या तू कपोली गीत माझे वाच रे ॥ २ ॥

दूर तेथे तरुतळी त्या प्रीत माझी बैसली
मानसीच्या मीलनाला बिलगुनी ती हासली
मूक वाचा, मूक भाषा प्रश्न देई उत्तरे ॥ ३ ॥

# चांदणी एकटी गगनी

चांदणी एकटी गगनी
वेढिली कृष्ण- मेघांनी ॥ धृ ॥

सुरम्य शोभा सायंतनीची
जरा बघावी हौस मनीची
शुध्द न तिजला परतायाची
नादात भाबडी रमुनी ॥ १ ॥

मेंदरलेले चिमणे डोळे
लुकलुक करते काळिज इवले
चुकचुकले मन, बाई फसले
का कुणी येत ना अजुनी ? ॥ २ ॥

उदयगिरीवर झळकत सुंदर
ध्वज चंदेरी चढता वरवर
मेघ स्वागता पळती भुरभुर
हसत चांदणी खिन्न मनी ॥ ३ ॥

# दुःखात सुख मी मानू किती ?

काळोखाचा प्रकाश देवा, एकसारखा पाहू किती ?
दुःखात सुख मी मानू किती ? ॥ धृ ॥

तारामतीची दीक्षा देऊन
सत्त्वपरीक्षा नसता कारण
कठोर शिक्षा अपराधाविण
सांग दयाळा भोगू किती ? ॥ १ ॥

करुणेचा तू अपार सिंधू
एकच अवघा दे जलबिंदू
चोच वासुनी किती आक्रंदू ?
जगण्यासाठी मरू किती ? ॥ २ ॥

# जगी या कुणी कुणाचे नाही

दुःख नको करू, नको रडू तू धायी धायी
जगी या कोण कुणाचे नाही ॥ धृ ॥

आईबाप ते जन्मा कारण
म्हणती जडता प्रीत हे बंधन
तुटता तेही का आक्रंदन
जो तो जगतो स्वर्थापायी ॥ १ ॥

धरणीच्या तू खांद्यावरती
छत्र कृपेचे झुलते वरती
ईश्वर आहै पाठीवरती
जा तू चालत आपुल्या पायी ॥ २ ॥

आवर स्पंदन अश्रू सिंचन
जगण्यासाठी असते जीवन
मरायचे तर दुसऱ्या जगवुन
प्रकाश देऊन रात ही जाई ॥ ३ ॥

# कृष्ण माझा जीव

कृष्ण माझा जीव, कृष्ण माझा भाव
तनमन नाचे घेता कृष्ण कृष्ण नाव ॥धृ॥

कृष्ण माझे डोळे, कृष्ण माझी दृष्टी
अंतरीची सृष्टी देवा, कृष्णा तूच दाव ॥१॥

कृष्ण माझा ताल, कृष्ण माझी चाल
पाय माझे कृष्णा घेती, घेती आता धाव ॥२॥

कृष्ण माझी भूक, कृष्ण माझे मुख
सुखदुःख मुक्तिचा तो गाव ॥३॥

# डोळ्यांच्या मिठीत प्रीत ही झिंगली

डोळ्यांच्या मिठीत प्रीत ही झिंगली
पहिल्या भेटीत रात ही रंगली ॥ धृ ॥

सोनियाचा खडा घुंगुरात बोलतो,
देहाचा मोर हा कमनीय डुलतो,
निरीचा नखरा पायघोळ झुलतो
मासुळीची बोटं मेंदीनं रंगली ॥ १ ॥

चंदेरी पैठण पुनवा नेसली
बोलक्या मनात खुदकन् हसली
पापणीची पिस मोहानं पिसली
गालाच्या खळीत लाज ही रंगली ॥ २ ॥

मदनाची भाषा रतीला पटली
चंद्राला रजनी मध्यान्ही भेटली
खुसुखुसु टाळी ओठानं पिटली
मदभरी लावणी उरात रंगली ॥ ३ ॥

# मंगल गीत

नक्षत्राच्या नील मंडपी
रविचंद्राचे श्रीफल तोरण !
अद्वैताच्या बोहल्यावरती
शिवशक्तीचे होते मीलन ॥ धृ ॥

अवकाशाच्या घुमटाखाली
अनंत कोटी दीप लागले !
सप्त स्वर्गीच्या सुरांगनासह
सुरवर सारे प्रेमे जमले
महन् मंगला उभी शुभांगी
कल्पद्रुमांची माला घेऊन १

राजद्वारी अष्टविनायक
अष्टनायिका करिती स्वागत
अतिथांचे जे, वांछित ते ते
ऋद्धि सिद्धी होत्या पुरवित
शुभ कल्याणी गायत्री ती
समृद्धीचे भरते रांजण २

वधूवरांच्या नेत्रमीलनी
मधुमासाचा मोहर फुलतो
जिवाशिवांच्या चित्त संगमी
सुगंध मोहक दरवळतो
वज्रचुड्यांच्या गीतगुंजनी
विश्वमोहिनी करिते नर्तन ३

दिक्कालाला देत आमंत्रण
वाजत गाजत मुहूर्त आला
शतजन्मीच्या रेशिमगाठी
चिदानंद तो बांधून गेला
अनंत हस्ते रमा श्रीपती
करू लागले अभिष्टचिंतन ४

# माझा हिमालय, माझी गंगा

माझा हिमालय, माझी गंगा माझा भारत सारा
जनशक्तीचा प्राण तिरंगा माझा झेंडा प्यारा ॥ धृ ॥

जननी माझी जन्मभूमी, स्वर्ग तियेवर छाया धरतो
जिच्या मुखाचे दर्शन घ्याया, सूर्य उद्याचा आज उगवतो
पदकमलांचे तीर्थ प्राशुनी, तीर्थरूप तो सागर होतो
जिच्या कुशीला पुत्र जन्मला, अढळ ध्रुवाचा तारा ॥ १ ॥

धारातीर्थी जिथे जन्मली, कर्मयोगिनी भगवद्गीता
'चलेजाव' चा मंत्र पुकारीत उदय पावली स्वतंत्रता
रक्तांकित तो बलिदानाचा टिळा लाविते मानवता
पवित्र पाणी, सुवर्णभूमी, जिथे वाहतो जिवंत वारा ॥ २ ॥

सत्यासाठी जिथे अहिंसा, चक्रसुदर्शन हाती धरते
अनंत हस्ते राष्ट्रस्वामिनी कळिकाळावर प्रहार करते
भारतभूच्या चारित्र्याने मानवतेचे चरित्र घडते
आसेतु हिमाचल भारतभूचा गर्जा जयजयकारा ॥ ३ ॥

# राष्ट्रस्वामिनी प्रियदर्शनी

मराठीचिये नगरी, जनहो,
रत्नकांचनी गुढी उभारा
राष्ट्रस्वामिनी प्रियदर्शनी–
  येत आपुल्या घरा,
  जन हो जयजयकार करा ॥धृ॥

तव सन्माना, तुझाच गौरव
बांधित द्वारी श्रीफल तोरण
शककर्त्याची ही पुण्याई
देते तुजला दृढ आलिंगन
  माय मराठी म्हणते आम्हा
  मुलींनो लिंबलोण उतरा ॥१॥

नव्या युगाचे तव नेतेपण
कर्तव्याचे बांधित कंकण
आक्रंदुन ही जनता दुबळी
तव चरणावर घेते लोळण
  जनतेसाठी बंड पुकारा
  ध्वजा तिरंगी उंच धरा ॥२॥

## नमो नमा नमो नमः

नमो नमा, नमो नमः
श्रीमन्महाराष्ट्र पुरुषोत्तमा ।। धृ ।।

बावनगडची समररागिणी
मराठीयेची कुलस्वामिनी
श्री शिवबाची समशेर भवानी
पूजिते तुझिया पराक्रमा ।। १ ।।

ज्ञानेशाच्या अमृत ओठी
वेद बोलतो तुझी मऱ्हाठी
देहु गावी भक्ती साठी
तुकया बोले विठ्ठलनामा ।। २ ।।

गोदातीरी नाथ जनार्दन
कृष्णेकाठी समर्थ होऊन
महाराष्ट्राचा ध्वज उंचावुन
भीमातीरी तू अभिरामा ।। ३ ।।

सत्ताशासी तुझ्या मुखातून
निर्भय वाणी येता गर्जून
कर्मयोगी ती गेली निर्मून
मृत्यूंजय तू वंद्य हुतात्मा ।। ४ ।।

# मुशाफिरा चल माझ्यासाठी

मुशाफिरा चल माझ्यासाठी
महाराष्ट्राच्या कृष्णेकाठी ॥ धृ ॥

अपूर्व सुंदर मूर्त होऊनी
जिथे नांदते शौर्य मराठी
हरहर गर्जत जरिपटक्याची
जिथे नाचली भगवी काठी ॥ १ ॥

रक्त ठिबकल्या समशेरीचा
टिका शोभतो जिच्या ललाटी
शिवचरणावर जिने उधळली
जलपुष्पे ती अनंतकोटी ॥ २ ॥

तीर्थ रूपले जिच्या तटाकी
दत्त दिगंबर भक्तीसाठी
जिला लाभली समर्थ गुरूची
चैतन्याची शिकवण मोठी ॥ ३ ॥

शीळ घालते नरसिंहाना
जिथे लावणी सुस्वरकंठी
थाप डफावर ऐकून जेथे
उठती प्रेते क्रांतीसाठी ॥ ४ ॥

# थांब अर्जुना !

थांब अर्जुना क्षण अवसर दे
रणभूमीच्या उरी घुसलेले
वज्र रथाचे मज काढू दे ॥ धृ ॥

कुरूक्षेत्राची रणभू आता
तुझी न् माझी एकच माता !
काळ तियेवर घाव घालता–
त्या काळाला मातृवत्सला
मरणा आधी मज मारू दे ! ॥ १ ॥

शस्त्रविहीन या शूरावरती
बाण मारता मरेल नीति !
वीरत्वाची ही अपकीर्ति
कवळिसी का तू धारातीर्थी
शर चापाचा आवरता घे ॥ २ ॥

कवचकुंडले अमरत्वाची
दिली सुरेंद्रा त्या कर्णाची
भिक्षा हवी का पुण्याईची ?
प्राणासंगे देतो तुजला
बाणावरती झेलून घे ! ॥ ३ ॥

# सिद्ध गजानन राहतो

मंदार तरु बोलतो। कानी गुजगुजतो
इथे निरंतर मानवरूपी
सिद्ध गजानन राहतो ॥ धृ ॥

जाता येता सन्मार्गावर
सगुण स्वरूपी या संतावर
धवल चांदणी भावफुलांची
उधळग प्रभू तो करतो ॥ १ ॥

तिमीर मालवी दुरितांचे
पिऊनी अश्रु दु:खितांचे
कवटाळुनी हृदयी पददलितानां
काळिज आपुले देतो ॥ २ ॥

प्रभुनामाची जपतो माला
जरब जपाची निष्ठुर काळा
थांब, बोलता हात जोडुनी
काळही मागे फिरतो ॥ ३ ॥

परम दयाळू परमेशाचे
नाम घेता अधरी वाचे
सगुण गजानन भक्तापायी
सेवक होउन रमतो ॥ ४ ॥

# चित्रपट गीते

## शपथ दुधाची

शपथ दुधाची या आईच्या; फिर माघारी पोरी ।। धृ ।।

तुझे भुकेने व्याकुळलेले बघुनी ग डोळे
उरी मायेच्या काळजाचे पाणी पाणी झाले
चार घास हे तुला भरविते माझ्या ओठावरले
डोळ्यामधली पाजिलं पाणी गंगा राजापुरी ।। १ ।।

जन्मलीस तू अभिमानाच्या थोर मराठ्याकुळी
प्राण देउनी अजवर ज्यांनी अब्रू ही ग जपली
हरिश्चंद्रापरि सत्यकसोटी असेल ग अपुली
दुरुनी बाळे दैव पहाते गरिबी आणून घरी ।। २ ।।

गायीका व संगीत : लता मंगेशकर
चित्रपट . राम राम पाव्हणं

# माझ्या शेतात सोनंच पिकतंय

माझ्या शेतात सोनंच पिकतंय
पाना पानात लखलख करतंय ॥ धृ ॥

साता समिंदराचं माणिक मोती
देवाच्या हातानं आलं रे खालती
झेललं रे झेललं वरच्या वरती
पिकाच्या डोईवर कणसात भरतंय् ॥ १ ॥

कावळ्याच्या डोळ्यागत पाटाचं पाणी
रावाची रंगली मोटंवर लावणी
पांढरिची लक्ष्मी पाजतीया पाणी
मळ्याच्या उरात खळखळ करतंय ॥ २ ॥

गायक : सी रामचंद्र
गायिका : लता मंगेशकर
संगीत : लता मंगेशकर
चित्रपट : राम राम पाव्हणं

## पाहुणा म्हणूनी आला

पाहुणा म्हणूनी आला, जरा घरात थारा दिला
दांडगाई करुनी ग बाई चार दिसात घरधनी झाला ॥ धृ ॥

भोळीस भासला भोळा
साधाच आणि मनमोकळा
परि अंगात नाना कळा
डोळ्यास लावता डोळा, मज पुरता कावा कळला ॥ १ ॥

पचताच पहिली ही खोडी
करी खुशाल लाडीगोडी
हृदयाचे कुलुपही तोडी
भर दिवसा करी घरफोडी, चोरटा घरामधी घुसला ॥ २ ॥

संगीत व गायीका : लता मंगेशकर
चित्रपट : राम राम पाव्हणं

# प्रीत जिंकुनी अजिंक्य झाले

प्रीत जिंकुनी अजिंक्य झाले तलवारीचे पाते
दिपवित डोळे लखलख हसले तुझे न् माझे नाते ॥ धृ ॥

तलवारीचे पिउनी पाणी नजर तुझी खंजिरी
थयथय नाचत आली राया माझ्या अंगावरी
झुंबर लोलक झुलू लागले तेजाचे अंतरी
ओवाळाया तुलाच नयनी लक्षदीप लाविते ॥ १ ॥

दृष्ट लाविता पराक्रमाची तुझी पताका आली
गालावरची फुलवीत लाली कुंकुमतिलक भाली
तुझ्या मूर्तीला माळ घालता मंगल त्या काली
तूच धरावा हात जिवलगा कंकण माझे म्हणते ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पाटलाचा पोर

# बंदा रुपाया बाई

बदा रुपाया वय माझं सोळा
तुझा वंगाळ डावा डोळा
राया कशी नजरेची सावली पडली
फुलत्या फुलाची पाकळी झडली ॥ धृ ॥

पापणी खाली नजर, न्हाई कुणाची कदर
डोई पदर मराठमोळा, डाव्या खांद्यावरी तो आला
तुझी दृष्टच मला रं नडली
लोक म्हणत्यात लाज मी सोडली ॥ १ ॥

भरली ज्वानी, छाती झाली रुंद
लाल बुंदी, डोळ्यामंधी धुंद
छंद न्याराच तुझ्यामुळं लागला
किती कशाला वंगाळ चांगला ॥ २ ॥

पिकलं लिंबू तसं माझं अंग
गुलमुशी गालाचा रंग
नाद माझा तुला जरी लागला
तुझ्या पिरतीचा चाळ बाई बांधला ॥ ३ ॥

गायीका : ललिता पळकर
संगीत : वसंत प्रभू
सिनेमा : पाटलाचा पोर

# नशीब शिकंदर माझे

नशीब शिकंदर माझे, राज्यपद आले
पट्टराणी तुमची मी झाले तुम्ही महाराजे ॥ धृ ॥

कोहिनूर हिऱ्यामधी हिरा, फुलांमध्ये फूल मोगरा
लाखो राजात राजेश्वरा
नवकोट मोत्यांचा तुरा मंदिली साजे ॥ १ ॥

सोन्याचे कळस गोपुरी, झळकती राजमंदिरी
स्वारी आली तुमची दरबारी
पंचखंडात होई ललकारी चौघडा वाजे ॥ २ ॥

रत्नमण्यांच्या सिंहासनी, तुम्ही इंद्र मी इंद्रायणी
कुबेरानं दिली खंडणी
देव उभे हात जोडुनी, मांडलिक राजे ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पाटलाचा पोर

# जीव जडला ज्याच्यावरती

जीव जडला ज्याच्यावरती
सुवासिनी मी त्याची झाले
कुंकवाचा धनी असताना
कुंकू कपाळी नाही लागले ॥ धृ ॥

पापणीचा धरला आम्ही
अंतरपट तो रेशीम काठी
देवादेखत तुम्ही बांधल्या
जन्मोजन्मीच्या गाठी
बोल तुमचे आठवा बाबा
अजुनी असतील तुमच्या ओठी
त्या बोलांचे मोल पृथ्वीचे
या लेकीला होते कळले ॥ १ ॥

कुलवंताची लेक कधी ना
भाळायाची वैभवाला
अयोध्येची राणी लाडकी
गेली वनवासाला
सुखदुःखाची भरती ओहोटी
येते जाते संसाराला
वाण सतीचे मला पाळू द्या
लेक मी तुमची नाही राहिले ॥ २ ॥

---

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पाटलाचा पोर

# माझं नाव शोभलं मैना

माझं नांव शोभलं मैना
तुझ्यावाचून मला करमेना, दिवस जाईना ॥ धृ ॥

लाडीगोडीत लावून लळा, राया सोडून गेला मला
दोन्ही डोळ्यात गहिवर आला –
जीवघेणी, करित ही झुरणी, जिवाची दैना ॥ १ ॥

माझ्या नयनाचा ऐना धरते, तुझ्या रुपाची छाया पडते
माझी मीच मला आवडते–
थयथया नाचते राया बांधुनी पैंना ॥ २ ॥

गायीका : मीना मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पाटलाचा पोर

# रावणाने सीता नेली

रावणाने सीता नेली, सोन्याची ती लंका जळली
तीच कथा रे फिरुनी लिहिली,
कर्मगती ही तुझ्या कपाळी ॥ धृ ॥

द्रौपदीला छळिले ज्यांनी
कीचक गेला कौरव गेले
त्याच कुळीची जात सांगुनी
तुझेच पातक जन्मा आले
परनारीची उडे पापणी
काळाची बघ चाहुल आली ॥ १ ॥

विटंबनेचा शाप दिला का
जन्मीचा तो सुंदरतेला
ध्रुवताऱ्याची प्रीत देते
भाग्य सतीचे कलंकितेला
घटका मोजीत वेळ तुझीही
सावज होऊन अखेर आली ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पाटलाचा पोर

# ओळखले मी ओळखले

ओळखले मी ओळखले
तुझ्या दिलवरा मनातले ॥ धृ ॥

तव नयनांची या नयनांनी
धरली हळवी प्रीत-शिकवणी
नजरेच्या त्या मुळाक्षरांनी
कशि लाजाया नकळत शिकले
हेच नेमके असेल पुसले ॥ १ ॥

शिकता शिकता डोळे खिळले
हात रेशमी गळ्यात रुळले
ओठावरती गीतही जुळले
शब्दाविण ते नव्हते कळले
तेच नेमके असेल लिहिले ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : मायेचा पाझर

# लखलखले आभाळ निळे

लखलखले आभाळ निळे
रोहिणीला चंद्र मिळे ॥ धृ ॥

दोन जिवांची दुनिया आपुली
तरुतळी ही हृदया जवळी
छेडित वीणा युगे चालली
सूर जुळले, तेज उसळे ॥ १ ॥

तुझी प्रकाशा, मी पडछाया
चालत मागुन सदैव राया
माय प्रीतिची हसरी माया
अमृत काया, भाग्य उजळे ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : मायेचा पाझर

# सीतामाई पती तुझा

सीतामाई पती तुझा राम-राजा अयोध्येचा
वाटेना ग वाटायाचा हेवा तुझ्या सौभाग्याचा ॥ धृ ॥

एकनिष्ठ एकपत्नी एकबाणी एकवचनी
डंका ज्याचा लोकी तिन्ही नावरूप लौकिकाचा ॥ १ ॥

पितयाच्या शब्दासाठी, कैकयीच्या हट्टासाठी
ठेवी माय दु:खी कष्टी, पुत्र थोर कौसल्येचा ॥ २ ॥

रामराज्य माझे घरी रिद्धी सिद्धी पाणी भरी
मायबंधु सुखी करी प्रभुराम जानकीचा ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : मायेचा पाझर

# बोललीस तू काल, उद्या

बोललीस तू काल, उद्या
नकोस बोलू आज उद्या ॥ धृ ॥

भल्या पहाटे लज्जा उठली
काजळ कुंकू ल्याली नटली
एकसारखी सांगत सुटली–
आला कालचा तुझा उद्या ॥ १ ॥

हसता हसता नजर मिळवणी
स्पर्श सुखाची मुकी बोलणी
हवी कशाला तीच उजळणी
आजपासुनी रोज उद्या ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : मायबहिणी

# आळीमिळी गोमचिळी

आळीमिळी गोमचिळी डोळ्यांची बात
चांदावर भाळली पुनवेची रात ॥ धृ ॥

चांदाचं हसणं तेच बघा चांदणं
फुलतोय काटा मदनाचं गोंदणं
गार गार वाऱ्याचं अंगाला झोंबणं
गोरामोरा जीव पिचल्यात काकणं
चांदाच्या हातात पुनवेचा हात ॥ १ ॥

सोंगाडी नाचही बिलगुन बसली
मिटून पापणी गालात हसली
उद्याची भिती ग रातीला कसली
म्हणतील म्हणू द्या असली न् तसली
फसायची फसली बायकांची जात ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : मायबहिणी

# पाहत नाही तुला

पाहत नाही तुला, नकोस लाजू मला
माझ्या लाजाळूच्या फुला ।। धृ ।।

टपोर गोरी माझी ज्वाणी, निळी पापणी निळी ओढणी
उडवित शिंपित गुलाबपाणी, तिच्या संगती खुल्या अंगणी
चलही नाचायला ।। १ ।।

एकांती या राज्य आपुले, गुपित सांगते गालावरले
ओठांनी जे लिहिले, पुसले विसरुन मी पण डोळे मिटले
चुकले वाचायला ।। २ ।।

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : मायबहिणी

# तुझी न माझी ओळख नसता ...

तुझी न माझी ओळख नसता
हसले का रे बघता बघता... ॥ धृ ॥

नयनही मिळता त्या नयनाला
बघण्याचा तो अन्वय जुळला
हसण्याचा परि अर्थ न कळला
अर्थाविण का असते कविता ? ॥ १ ॥

हसायचे ना मनात म्हटले
पुन्हा कधी जर तुला भेटले
अवचित दिसता भान हरपले
हसले का मी मनात नसता ॥ २ ॥

माझ्यावर मी होते चिडले
जागेपणी ते स्वप्न पाहिले
अधर कुणाचे अधरी भिडले
अर्थही कळला डोळे मिटता ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : मायबहिणी

# कुणि गोविंद घ्या, कुणि गोपाळ घ्या

कुणि गोविंद घ्या, कुणि गोपाळ घ्या
या ग सयांनो या ग या
अविनाशी हा आनंद घ्या,
चिरंतनाचा सुगंध घ्या ॥ धृ ॥

नभात फुलता गोड चांदण्या, बाळच ग हसतो
महाराष्ट्राचे भाग्य उद्याचे मुठीत नाचवतो
दुश्मनांना हुंकारुनी जो दहशत हा भरतो
राजफुलाचा विकास घ्या,
चैतन्याचा सुहास घ्या ॥ १ ॥

चार दिशांचे चौखुर सुंदर, पृथ्वीच्या पाळणी
नक्षत्रांचे छत्रकमल हे झुलत्या सिंहासनी
हसवा, रिझवा, शिवरायाला जो जो ग गाउनी
युगायुगाचा सारंग घ्या,
क्रांतीचा हा आरंभ घ्या ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर आणि इतर
संगीत : सी. रामचंद्र
चित्रपट : छत्रपती शिवाजी

# गावात गाव माझं माहेरचं गाव

गावात गाव माझं माहेरचं गाव
नावात नाव माझं सासरचं नाव

मायेच्या मंदिरा सोन्याच्या भिंती
स्वर्गीची दौलत इंद्राचा हत्ती
बळीची दानत आईच्या हाती
लाडक्या लेकी तू घेणार किती ?
आईचं भूषण साऱ्यांना दाव ॥ १ ॥

सुखाच्या सासरी माझ्या ग वाणी
रूपानं देखणी नाही ग कोणी
पालखी मेण्यात राजाची राणी
तिकडची प्रीती गंगेचं पाणी
निर्मळ मनाचा लागेना ठाव ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : सी. रामचंद्र
चित्रपट छत्रपति शिवाजी

# सात जन्मीची सोनपाउले

सात जन्मीची सोनपाउले मंदिरी येतील का ?
रंगरूप ते दर्शन आपुले, प्रभू मज देतिल का ? ॥ धृ ॥

सुरेल पंचम वाजती दुमदुम, माझ्या उरी ग नौबत–भेरी
गाऊ लागले किनकिन कंकण, रत्नकांचनी गीत बिलवरी
मूर्तिमंत या अधिरतेला, हसवुनी हसविल का ? ॥ १ ॥

क्रांतीची ती चाल चालुनी, असेल काया शिणली थकली
प्रेमळ माझ्या कल्पतरूच्या, विसावू द्या ती छायेखाली
ओढुनी जवळी गिरजा भोळी, आपली म्हणतिल का ? ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : सी: रामचंद्र
चित्रपट : छत्रपती शिवाजी

# आज शिवाजी राजा झाला

ध्वज तेजाळुनी स्वातंत्र्याचा
सूर्य सांगतो त्रैलोक्याला
युग निर्माता महाराष्ट्राचा
आज शिवाजी राजा झाला, राजा झाला ॥ धृ ॥

महान पहिला छत्रपति, राजदंड तो घेता हाती
घरोघरी समता प्रीती, धर्मक्षेत्री वास्तुशांती
देवही आला देऊळाला,
आज शिवाजी राजा झाला ॥ १ ॥

निर्भयतेची किरिट कुंडले
लेऊन समता वचनी बोले
वंद्य जयाच्या चरणी चाले, चौदा रत्ने उधळित आले
त्रिभुवन अवघे दरबाराला,
आज शिवाजी राजा झाला ॥ २ ॥

शिवरायाचे रूप पहावे
शिवरायाचे चरित्र गावे
शिवकार्याचे सेवक व्हावे,
मुजरा पहिला छत्रपतीला ॥ ३ ॥

गायीका – लता मंगेशकर आणि इतर
संगीत – सी. रामचंद्र
चित्रपट – छत्रपती शिवाजी

# सह्याद्रीच्या वाऱ्या जाऊन सांग

सह्याद्रीच्या वाऱ्या, जाऊन सांग माझ्या रायाला
मराठमोळ्या अब्रूसाठी प्रीत लावी प्राण पणाला ॥ धृ ॥

स्वातंत्र्याचे कंकण ज्याच्या, करी बांधिले शिवरायांनी
रणी रायाच्या तलवारीचे, पिऊनी जाते बिजली पाणी
लढता लढता घात व्हायचा, नकोच सांगू निरोप वाणी
झुंज द्यावया तुझी लाडकी, उभी इथे रे कळीकाळाला ॥ १ ॥

अभिमानाने सांग तयाला, कंठी पडता जयजयमाला
कलंक लागे माझ्यासाठी, तुझ्या जिवलगा पराक्रमाला
खंत सारखी आणते पाणी, वाघिणीच्या या डोळ्याला
झेंड्याची मी शपथ घातली, सांगशील ना अखेरीला
विसर मला तू नकोस विसरू देशाला नि शिवरायाला ॥ २ ॥

संगीत : श्रीधर पार्सेकर
चित्रपट : मर्द मराठा

# वेलीवरची कळी ही पहिली

वेलीवरची कळी ही पहिली, फुलून झाले फुल
तुझे ही पहिले मूळ मांडिते,
आई पहिली चुल ॥ धृ ॥

भातुकलीचा खेळ चिमुकला
तूच दिलेला बाळपणी
तव मायेची पडु दे मजला
अशीच हंसरी भूल ॥ १ ॥

तुझ्या स्वरूपी सरस्वतीही
पूजित आई आरंभीला
तुझी शिकवणी आठविते मी
तुझाच मिरवित पाठ पहिला
तव नेत्रीच्या नंदादीपे
उजळिन हे घरकुल ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : कोण कुणाचं

# भाळी कुंकू गाली लज्जा

भाळी कुंकू गाली लज्जा, मुखी तुझे ते नाव
तुझ्या संगती संसाराचा प्रीत खेळते डाव ।। धृ ।।

तूच झाकता माझे डोळे
आनंदे मी अंध झाले
शोधुन सखया तुजला दमले
तुझ्या न माझ्या हृदयामधला चार हाताचा गाव ।। १ ।।

तुझ्या भोवती घालीत रिंगण
हृदयाचे ते फिरते अंगण
स्पर्शुन जाता करिचे कंकण
रोमांचातुन खुदुखुदु हसला, तुझ्या मनीचा भाव ।। २ ।।

हाती घेसि तू माझा कर
सोडवेना मलाही नंतर
राज्य आले सांग कुणावर ?
पराजयाने जिवास आपुल्या, जिंकायाची हाव ।। ३ ।।

गायिका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : कोण कुणाचं

# मावळता दिन राहुन राहुन

मावळता दिन राहुन राहुन, पाल मनीची चुकचुकते
बाबरलेली प्रीत सारखी, कृष्ण कृष्ण ही का म्हणते ॥ धृ ॥

सायंतनिचा क्षण क्षण टळला
काजळुनी तो प्रकाश ढळला
अजुनि जिवलग नाही आला
हरिण-काळजी उरात भरुनी काळिज का हुरहुरते ॥ १ ॥

वाट बघु मी कुठवर आता
शिणली नयनी ही आतुरता
व्याकुळतेनं हात जोडिता
तेजाळुनी ही सांजवात का. सखया रे मिणमिणते… ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : सुधीर फडके
चित्रपट : कोणं कोणाचं

# नसती झाली भेट तुझी ती

नसती झाली भेट तुझी ती
नसते मी हसले
हसता हसता मनही हुरळून
जिवलगा नसते मी भुलले ॥ धृ ॥

ढळत्या शामल तिसऱ्या प्रहरी
जरी केला तू गनिमी हल्ला
नसती झाली नजर फितुरी
नसता पडला किल्ला
लाल किनारी निशाण तव ते
नसते शिरी चढले ॥ १ ॥

शरणागतीने गालावरती
पत्र गुलाबी जरी ते लिहिले
नसती केलीस कैद प्रीती
नसते नाते जडले
निरोप घेता पाउल माझे
नसते कधी अडले ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : वादळ

# हिरव्या कुरणी

हिरव्या कुरणी घडली कहाणी बाई नवलाची
नाजुक हरिणी गेली करून शिकार वाघाची ॥ धृ ॥

वादळवारा असाच आला
अशीच बिजली लवलवली
हरिणीच्या त्या मोहक नयनी
धुंद कस्तुरी घमघमली
शिकारी नजर वाघाची बघून भुललेली
खेचली धनुकली हसून तिने नयनाची ॥ १ ॥

उरी तयाच्या बाण लागता
तिची जवानी थयथयली
व्याकुळतेने शपथ घालता
चंचल हरिणी हळहळली
माघारी नयन सुंदरी परत वळलेली
हळुहळु जखम ती आली मिळून हृदयाची ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : वादळ

# मन मिळे जिथे दोघांचे

मन मिळे जिथे दोघांचे त्या घरी रोज चैत्राचे
चांदणे गोड प्रेमाचे ॥ धृ ॥

कनकाच्या बांधुनी भिंती, राहता चतुर्भुज प्रीती
हर्षाने उधळित मोती, नक्षत्र आलं बाई स्वाती
कर जुळे पृथ्वी चंद्राचे,
चांदणे गोड प्रेमाचे ॥ १ ॥

दोन जिवांची पुष्पे फुललो, चिरकाली चंद्रमहाली
आनंदे नाचत आली, स्वर्गीची लक्ष्मी खाली
सुख झुले घरी इंद्राचे,
चांदणे गोड प्रेमाचे ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : वादळ

# जीवित माझे हवे तुला तर

जीवित माझे हवे तुला तर, घेऊन जा तू आता
सुवासिनीचे कुंकू हिरावुन नकोस नेऊ नाथा ॥ धृ ॥

संसाराची पूजा जाशी, उधळुन अर्घ्यावरती
मंगल मी रे, रचिले देऊळ तुझ्याच मूर्तिभवती
अश्रुफुलांचा अभिषेक करिते विरहिणीची प्रीति
ढळेल शांती पुजारिणीची कळस गोपुरी नसता ॥ १ ॥

तुझ्यासवे तो हर्षही गेला, खेदही उरला नाही
पतिव्रतेला दर्शनाची खंतही आता नाही
कुंकुमतीलक भूषण भाळी, इतुकेच नाथा देई
मिळेल मजला भाग्य सतीचे, तूही जवळी नसता ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : वादळ

# मनी वसे ते स्वप्नी दिसे

मनी वसे ते स्वप्नी दिसे
ते अवचित बाई असे गवसले कसे ?                ॥ धृ ॥

नील नभाच्या घुमटाखाली
रात्र चांदणी दिवसा फुलली
पानोपानी त्याच तरुतळी तेज तेच कवडसे        ॥ १ ॥

पुष्पकरांचा विळखा घालुनी
जीव जिवाला बसे बिलगुनी
शहारुनी त्या गोड आठवणी मनात मनहीं हसे    ॥ २ ॥

---

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत देसाई
चित्रपट : कांचनगंगा

# तिन्ही सांजची राधा गौळ्याची

तिन्ही सांजची राधा गौळयाची, यमुनेला जाते पाण्याला
काखेला हो कळसा, वळसा घालूनी नंदवाड्याला ।। धृ ।।

अंगकाठी सुबक शेलाटी
भिर भिर नजर चोरटी
देखणी रूप गोरटी
घरोघरी झाली बाई दाटी, तिला बघण्याला ।। १ ।।

वाजती घुंगरु पायी
नंदा घरी कुणाला पाही ?
चंद्र जिवाचा दिसला नाही
लोचनात यमुना येई पाणी भरण्याला ।। २ ।।

गायीका : आशा भोसले
संगीत : दादा चांदेकर
चित्रपट : पुरुषाची जात

# नाजुक ही फुलवेल

नाजुक ही फुलवेल ! सख्या रे,
तू येता, हसुनी बघता, मोहरुनी बहरेल ॥ धृ ॥

थांब जरा तू चंचल भ्रमरा
नकोस लावू मादक नजरा
बावरता हा जीव लाजरा
कळी कळी उमलेल ॥ १ ॥

भार फुलांचा झाला मजला
तशात हृदयी सुगंध भरला
कोमल माझी प्रीती तुजला
सांग कशी बिलगेल ? ॥२॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : तारका

# नांव तुझे ते येता श्रवणी

नांव तुझे ते येता श्रवणी,
एकांती मी जाते लाजुनी ॥ धृ ॥

पांपणीचे ते पंख पसरूनी
नयनांमधले बुलबुल दोन्ही
एक सुराने गाती मिळुनी ॥ १ ॥

फुलतो गाली गोड लालिमा
एका वेळी पूर्व-पश्चिमा
हसते शोभा खळींत लपुनी ॥ २ ॥

तोच पारवा येतो कुठुनी
गढींत उरींच्या घुमतो फिरूनी
निळ्या गढीचें हलते पाणी ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : बसंत प्रभू
चित्रपट : तारका

# वीणावती मी तुझी प्रियकरा

दा. क्र. २८८३८

वीणावती मी तुझी प्रियकरा
सप्तसुरांच्या छेडित तारा रात्रंदिन बसले ॥धृ॥

अमृतकर ते मिळुनी आपुले
नंदनवनिचे रोप लाविले
नवरस गंधे बहरुनी आले
अन् प्रीतीचे अरुण पुष्प हे
हसुनी फुलले, फुलुनि हसले ॥१॥

तुझ्याचसाठी तुझी गायिका
अखंड गाइल भावगीतिका
वाट पाहता राजा रसिका
कितीदा आल्या श्रावण राती
चैत्र चांदणे कितीदा फुलले ॥२॥

---

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : तारका

## एकदाच येउनि तू रे

एकदाच येउनि तू रे सांग मला सांग रे
कशी विसरू मी तुला रे ॥ धृ ॥

प्रेमगीत माझे पहिले
रोमरोमी लिहिले गेले
डोळियात दाटुनि आले
एकदाच वाचुनि जा रे ॥ १ ॥

अंतरात मंथन होई
उफाळून दुःखच येई
सुखे दुःख साहीन मीही
एकदाच जवळी घे रे ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : तारका

# प्रसन्न मंगल पहिल्या प्रहरी

प्रसन्न मंगल पहिल्या प्रहरी सोपा मंत्र जपा हो
जय जय रामकृष्ण हरी ॥ धृ ॥

रामनामे पाषाणांचे, पाण्यावरती तारु तरले,
रामाआधि रामायण ते, कोळियाने सुंदर रचिले
चाखायाला नाममाधुरी मुखी शारदा होई वैखरी ॥ १ ॥

कृष्ण म्हणता, पांचालीची भर दरबारी लाज राखिली
मीरा दासी कृष्णप्रभुची, पिऊन हलाहल अमृत झाली
निजनामाच्या बळे नाचवी, गोवर्धन तो करी श्रीहरी ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बाळ माझं नवसाचं

# स्वप्न उद्यांचे आज पडते

स्वप्न उद्याचे आज पडते, चित्र चिमणे गोजिरवाणे
नयना पुढती दुडदुडते ॥धृ॥

कट्यार चिमणी कटिला साजे, जिरेटोप तो सान विराजे
कुटुलुटु येता हे शिवराजे, शिवनेरीवर वत्सलतेचे
निशाण भगवे फडफडते ॥ १ ॥

चितोडगडचा शूर इमानी, प्रताप राणा बाळ होऊनी
मिठी मारता दोन्ही करांनी अभिमानाचे पंख लावुनी
काळीज माझे नभी उडते ॥ २ ॥

ऊठ म्हणता उठते क्रांति, ज्याच्या मागून फिरते शांती
जवाहिराची राजस मूर्ति लाडे लाडे आई म्हणता
भारत-दर्शन मज घडते ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बाळ माझं नवसाचं

# बाळ माझं नवसाचं

बाळ माझं नवसाचं, बाई बाळ माझं नवसाचं
स्त्री जन्माच्या सार्थकतेला फुल आलं हर्षाचं ॥ धृ ॥

संसाराच्या प्रभातकाळी, चितारतांना मी रांगोळी
रंगरूपलं या करकमळी, गोड स्वप्न ते मायेचं ॥ १ ॥

क्षणाक्षणाला हसता रडता, मणी मोत्यांचा पाऊस पडता
अधर शिंपली टिपते ममता, बिंदू बिंदू अश्रूचं ॥२ ॥

मुग्ध मुठींच्या संदेशानं, रविचंद्राचं येणं जाणं
बिंब चुंबुनी द्या नजराणं, राज्य घरी या शुक्राचं ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बाळ माझं नवसाचं

# माणसाचा माणूस वैरी

मायपिता तो खरा दयाळू
देव कुणाचा नाही वैरी
माणसाचा माणूस वैरी
सुख नांदेल कैसे घरी ॥धृ॥

हरिण-काळजी पतीची लागुन
पतिविण झुरते जिथे अस्तुरी
पतिव्रतेचे छत्र झुगारुन
पती शोधी आसरा दुरी ॥ १ ॥

देवासाठी रोज पुजारीण
नैवेद्याची करी तयारी
देव तियेचा लाचारीने
जीवन जगतों कसा तरी ॥ २ ॥

सजवुनि शय्या वाट बघते
सुवासिनी ही प्रीत मंदिरी
धनी तियेचा अंग टाकितो
उघड्यावरती कुठे तरी ॥ ३ ॥

---

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बाळ माझं नवसाचं

# फुटतो पान्हा पुन्हा पुन्हा

फुटतो पान्हा पुन्हा पुन्हा कुणी तरी माझे बाळ आणा ॥ धृ ॥

रेशमाचे कुंची झबले, या हातांती मी शिवलेले
तसेच हाती राहुन गेले, घालुनी पाहू आता कुणा ? ॥ १ ॥

बाळ निजेची वेळ येते, पाळण्याची दोरी हलते
गहिवरता मी जो जो म्हणते, पाळणा हाले सुना सुना ॥ २ ॥

बाळ कुशीला देण्यासाठी, चिमणे चुंबन घेण्यासाठी
जितुके जीवन असेल गाठी, देईन तुजला दयाघना ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बाळ माझं नवसाचं

# कृष्णाची दृष्ट मला लागली

रातभरी प्रीत माझी जागली
बाई कृष्णाची दृष्ट मला लागली ॥ धृ ॥

उरी नजरेची भडकुनी आग
पहिल्या झोपेला आली जाग
लागे चंद्राला काळा डाग
माझ्या मनाला सांगून भागली ॥ १ ॥

आला स्वप्नात चोर पुन्हा सावळा
दोन्ही हाताच्या मिठीत घावला
गोऱ्या गालाचा तीळ त्यानं चोरला
बाई कृष्णानं लाज सारी सोडली ॥ २ ॥

माझ्या जिवाचं पाखरु भकलं
डाव्या डोळ्याचं पारडं झुकलं
म्हणू कृष्णाचं कसं बाई चुकलं
एका हातानं टाळी कधी वाजली ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# मी हसू आधी, का रुसू ?

मी हसू आधी, का रुसू ?
का पुसे सारखी प्रीती, या पहिल्या मंगल राती ।।धृ।।

रेखिता पौर्णिमा भाळी
मुखचंद्र तिकडचा डोळी
ही मधुर-पापणी उधळी
का, हर्षे माणिक मोती ।।१।।

ही हरिण बावरी लाज
नखशिखांत करुनी साज
परि चंचल होता आज
का, उरी रंगते भीति ।।२।।

चाहुली दार वाजता
मजपुढे पळे आतुरता
मी रुसे फसुनही हसता
का, गोड भास हे होती ।।३।।

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# भांडखोर प्रीत माझी

भाडखोर प्रीत माझी राग धरू नका
बसा राया, माझ्यापाशी, दूर सरू नका ।। धृ ।।

हातामधि हात घ्याहो, बांधा रंगचुडा
नजरेन गुलाबाचा गेंद माझा खुडा
डोळियाच्या पाखराला मारुनिया खडा
मखमाली या पापणीचे पंख तोडू नका ।। १ ।।

लालबुंद ओठांची सैल करा मिठी,
हसुनिया बोला जरा आता माझ्यासाठी
वेडी म्हणा, खुळी म्हणा लागे तुम्हा पाठी
नवतीच्या हो काळजाला पीळ पाडु नका ।। २ ।।

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# दुःखात सुख मी मानू किती ?

काळोखाचा प्रकाश देवा एकसारखा पाहू किती ?
दु:खात सुख मी मानू किती ? ॥ धृ ॥

तारामतीची दीक्षा देऊन
सत्वपरीक्षा नसता कारण
कठोरशिक्षा अपराधाविण
सांग दयाळा भोगू किती ? ॥ १ ॥

करुणेचा तू अपार सिंधू
एकच अवघा दे जलबिंदू
चोच वासुनी किती आक्रंदू ?
जगण्यासाठी मरु किती ? ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# औंदा बाई नवसाला देवं माझा पावला

चालता बोलता माणसामधि धावला
औंदा बाई नवसाला देवं माझा पावला ॥ धृ ॥

माझ्या देहाची तरणीताठी
आले मिरवित सासणकाठी
भरल्या सभेत प्रेमासाठी,
जीव हुरळुन थयथया नाचला ॥ १ ॥

दोन्ही हाताची फुलमाळ ओवली
चारचौघात देवाला वाहिली
लाज माझी मी न्हाळून पाहिली,
एका डोळ्यात देव सारा मावला ॥२॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# जशि चवथिची कोर ती नभी

जशि चवथिची कोर ती नभी
काढा डोळ्यानं माझी छबी
द्या नजरभेट प्रीतीची ॥ धृ ॥

झुरणीचा काटा ग उरी सलतो
स्वरूपाचा ग केवडा फुलतो
देहाचा नाग बाई डुलतो
घाला दुरून शीळ मदनाची ॥ १ ॥

बोला फुलाची गाठ ती पडे
भरजरी कमान शिरी चढे
राग– लोभाची चकमक झडे
म्हणा सुटली दिल्या शपथेची ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कुलदैवत

# प्रकाशून नियमीत तुझे चंद्र सूर्य तारे

प्रकाशून नियमीत तुझे चंद्र सूर्य तारे
आम्ही मात्र अंधारात सदोदित देवा का रे ? ॥ धृ ॥

धनिकांनी बांधिलेल्या सोनियाच्या देऊळात
भुलूनिया वैभवाला मूर्त होशी पाषाणात
पाषाणाला देवकळा भक्तिभावे आम्ही देत
आम्हालाच लाथाडीशी भेटिवीण दूर का रे ? ॥ १ ॥

मायबाप सर्वांचा तू देवा, तुला म्हणतात
तुझ्या ठायी भेदभाव असा का रे पक्षपात ?
वेगळीच केलीस तू ही, आम्हा गरिबांची जात
आमुच्याही मरणात अंत नाही तुझा का रे ? ॥ २ ॥

संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : मूठभर चणे

# पुजारिणीला वंदुनी पायी

पुजारिणीला वंदुनि पायी
देव तियेचा निरोप घेई ॥ धृ ॥

फळास आली भक्ती आता
देवपणा तो अर्पुनी जाता
देवाविण परि देऊळ दिसता
व्याकुळ होई भाविकताही ॥ १ ॥

नंदादीपे तेजोवलयी
मंगलताही अश्रू ढाळी
मूर्तिविण त्या तिन्ही त्रिकाळी
भावफुलांना सुगंध नाही ॥ २ ॥

किरिट कुंडले तव आभरणे
तुला शोभते तुझेच लेणे
हृदयी कवळुन नामस्मरणे
पूजित राहिन देवपणाही ॥ ३ ॥

गायक : हृदयनाथ मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : मूठभर चणे

# मल्हारी माझा मल्हारी

मल्हारी माझा मल्हारी– भर्तार माझा मल्हारी
नांदते गुणी गोजिरी प्रीत जेजुरी ॥धृ॥

बाळपणी लगीन लागलं
सोन्याचं सूप वाजलं
लाखोगणती वऱ्हाडी आलं बघाया नवरी ॥१॥

पंचकल्याणी घोड्यावर
खंडेराव होउनी स्वार
मिरविता मला चौफेर, उठे ललकारी ॥२॥

केतकी सुगंधी काया
वाहुनी देवाच्या पाया
हळदीची कीर्त उधळाया आली सुंदरी ॥३॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
सिनेमा : पावनखिंड

# सोडिला कायमचा मी गांव

तुझ्याचसाठी तुझे घेऊनी नांव
सोडिला कायमचा मी गांव ॥ धृ ॥

गांव-शिवेवर आस थांबली
तुझ्याचसाठी दृष्ट लांबली
अंधारी ही बुडे साउली
तूच प्रकाशा वाट—पुढती दाव ॥ १ ॥

गात गुणांची तुझी आरती
मनात पूजिन तुझीच मूर्ती
संकट येता हाके पुढती
कृष्णापरी तू धाव-सखीला पाव ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पावनखिंड

# डाव तुम्ही टाका, नजर माझी जिंका

गंजिफा नार खेळते, डाव तुम्ही टाका
डाव टाका नजर माझी जिंका ॥ धृ ॥

मदनाच्या रंग दरबारी, या सवती ढाल तलवारी
चला फेका, दूर सरका, पिरतीला रोखा ॥ १ ॥

रूपाचा गुलाबी प्याला, काठोकाठ बघा भरलेला
नका लावू हात अंगा, दुरूनी झोका ॥ २ ॥

थयथयते रंगढंगात कस्तुरी धुंद अंगात
ओढुनी शिरी तांबडी चिरी, पळाला धोका ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पावन खिंड

# सांग पत्रिके निरोप माझा

सांग पत्रिके, निरोप माझा माय- पितयाला
चालली लेक लग्नाला ॥ धृ ॥

देवक पुजिले या प्रतिमांचे
तीर्थ घेतले मी आसवांचे
काय मुलीने मागायाचे ?
आशिर्वच द्या एकुलतीला ॥ १ ॥

नाही मळवट, नाही चुडाही
मंगल सनई वाजत नाही
कशी तुला तर नेऊ भाई ?
झाली घाई शुभ-घटिकेला ॥ २ ॥

दारी तुझ्या मी बांधुन तोरण
तुलाच देवा, देत निमंत्रण
तुलाच केवळ साक्षी ठेवुन
वरिते वधुही पति-देवाला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : देव जागा आहे

# शंकराचा तिसरा डोळा

शंकराचा तिसरा डोळा
अंधारातुन फिरतो आहे
सर्व चराचर निजले तरी तो
देव निरंतर जागा आहे ॥ धृ ॥

दुष्ट घातकी तुझीच करणी
तुलाच छळण्या भूत होउनी
कलेवरातुनी उठली आहे
अपराधी मन तुला सारखे
पापी म्हणते आहे ॥ १ ॥

संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : देव जागा आहे

# पुनवेच्या घरी निळी गोजिरी

पुनवेच्या घरी निळी गोजिरी, निजली अंगाई
नीज गुणिले नीज लवलाही ॥ धृ ॥

तव नयनीच्या नक्षत्राला दृष्ट व्हायची या चंद्राची
पुष्पदळे ही पापण्यांची, झणि लडिवाळे मिटुनी घेई
निजली अंगाई ॥ १ ॥

लाजविणारी जाईजुईला, करांगुळीची कोमलताही
गोड कहाणी सांगून तीही, अधुनीमधुनी देत जांभई
निजली अंगाई ॥ २ ॥

सर्व सुखांची प्रेमळ जननी, हळुहळू येई निद्रामाई
होऊन आता तुझीच आई, चुंबित राही वत्सलताही
निजली अंगाई ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : गृहदेवता

# गोड तुझ्या त्या स्वप्नामधली

गोड तुझ्या त्या स्वप्नामधली
दाखव मजला तुझी माऊली ॥ धृ ॥

जिने लाविला बाल मनाला
निज मायेचा रोज लळा
तुझ्या करीची वेळोवेळा
गळा गुंफिली माळ सानुली ॥ १ ॥

याच हातानी जिने भरविला
दहि-भाताचा अमृत काला
या ओठांनी ओठ पुसता
मकरंदाची शिते चाखिली ॥ २ ॥

जिने घेउनी तुला कुशीला
जीव आपुला सुखविला
सांगणार ना कधी कुणाला
अवसेने पौर्णिमा पाहिली ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : गृहदेवता

# सांग धावत्या जळा

सांग धावत्या जळा, तुझ्यापरी ओढ उरी
सांग कुणाची मला ? ॥ धृ ॥

लुकलुकणारी नेत्र मासळी
तुझ्या जीवनी कशी हरपली
मोहुनिया तिला धराया, जीव लाविते गळा ॥ १ ॥

हर्ष फुलांचे उधळित झेले
तुझे मनोगत कुठे चालले..
या धरतीला कसा लागला, तुझ्या मनाचा लळा ॥ २ ॥

पाणवटी या अशीच सखया
धीवर कन्या करता मृगया
कसा जाहला सांग प्रेमळा, राव शंतनु खुळा ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
गीत : वसंत प्रभू
चित्रपट : गृहदेवता

# मलाहि मुकले, तुलाहि मुकले

मलाहि मुकले, तुलाहि मुकले
प्रेम करून मी चुकले ॥ धृ ॥

मीच लाविल्या वेलीवरचे
मृदुल दलांचे मधुगंधाचे
फुलता फुलता मम प्रणयाचे
फूल अचानक सुकले ॥ १ ॥

धार प्रवाही संगमी तुटली
उगमापासुन सरिता आटली
पाण्याविण ह्या डोहाभवती
मृगजळ घेरून बसले ॥ २ ॥

दोन पांखरे मिळुनी रमता
एकावरती घाव बसता
सुखात दुसरे इतुके कळता
व्याकुळ लोचन हसले ॥ ४ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : बसंत प्रभू
चित्रपट : गृहदेवता

# मोट जरा हाक तू जपून ग

मोट जरा हाक तू जपून ग
विहिरीत धोका लपून ग ॥ धृ ॥

खिल्लारी जोडी ही बैलाची मारकी
नाकाला वेसण तोंडाला म्होरकी
सैल नको सोडू ताणून सारखी
ओढणीची दोरी घे खेचून ग ॥ १ ॥

फार नको वाकु तोल तुझा जाईल
डोळं नको झाकु कुणीतरी पाहील
चाक कुरुकुरु गीत तुझं गाईल
दृष्ट नको लावू कुठं चुकून ग ॥ २ ॥

पिकलाय मळा, मोर झाला खुळा
हिरव्या राईत घुमतोय गळा
दिवसानं केला वाकडा डोळा
लाजु नको, हसु नको फसून ग ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : ग्यानबा तुकाराम

# हर्षाचा, वर्षाचा दिवाळी सण आला

हर्षाचा, वर्षाचा
        दिवाळी सण आला ॥ धृ ॥

कारंजी उठती तेजाळ
नाचती बाळ गोपाळ
आनंद दीप गोविंद
        उधळतो चांदणी झेला ॥ १ ॥

लक्ष्मी देवता खरी
पुजितो दास श्रीहरी
भक्तीचा जीव प्रीतीचा
        अंबरी दीप लखलखला ॥ २ ॥

प्रतिपदा मूर्त मंगला
ओवाळी पति देवाला
हसता प्रेम अर्पिता
उतरला स्वर्ग भूमितला ॥ ३ ॥

गायीका : उषा मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : शिकलेली बायको

# आली हासत पहिली रात

आली हासत पहिली रात
उजळत प्राणांची फुलवात ॥ धृ ॥

प्रकाश पडता माझ्यावरती
फुलते बहरून माझे यौवन
हसली मग ती चंचल होउन
नयनाच्या महालात ॥ १ ॥

मोहक सुंदर फूल जिवाचे
पतिचरणावर प्रीत अर्पिता
मीलनाचा स्पर्श होता
विरली अर्धांगात ॥ २ ॥

लाज बावरी, सी बावरता
हर्षही माझा बघतो चोरून
भास तयाचां नेतो ओढून
स्वप्नाच्या हृदयात ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : बसंत प्रभू
चित्रपट : शिकलेली बायको

# का चिंता करसी ?

नयनी गंगा हृदयी काशी
कां चिंता करसी, प्राण्या
कां चिंता करसी ॥ धृ ॥

दो पायावर रचतो सुंदर
देहाचे जो मंगल देऊळ
तोच चालवी आपुले पाऊल
कां मागे बघसी ॥ १ ॥

घर हे सुटता नाते तुटता
जग ही झाले जरी पारखे
सुख दुःख ही रे तुला सारखे
कां डोळे पुससी ॥ २ ॥

चंद्र हासरा गोड मुखाचा
रसाळ वाणी अमृताची
प्रेमळ दृष्टी तुझ्या मनाची
देव तुझ्या पाशी ॥ ३ ॥

गायक : हृदयनाथ मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : शिकलेली बायको

# प्रेमा, काय देऊ तुला ?

प्रेमा, काय देऊ तुला ?
भाग्य दिले तू मला ॥ धृ ॥

प्रीतीच्या या पाखराचे रत्नकांचनी पंख देऊ का
देऊ तुला का हर्षगंध हा जीव फुलातून मोहरलेला... ॥ १ ॥

या हृदयीच्या जलवंतीची निळी ओढणी तुला हवी का
रूप मोहिनी लावण्याची हवी तुझ्या का चंद्रकलेला... ॥ २ ॥

मोहक सुंदर जे जे दिसते, तूच तयांचा जन्मदाता
घेशील का रे माझ्याकरिता अधरीच्या या अमृताला ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : शिकलेली बायको

# लेक लाडकी या घरची

लेक लाडकी या घरची
होणार सून मी त्या घरची ॥ धृ ॥

सौख्यात वाढलेली
प्रेमात नाहलेली
कळिकळि फुलुन ही चढते
मंडपी वेल मायेची ॥ १ ॥

संपताच भातुकली
चिमुकली ती बाहुली
आली वयात खुदुखुदु हासते
होऊन नवरी लग्नाची ॥ २ ॥

हे माहेर, सासर ते
ही काशी, रामेश्वर ते
उजळिते कळस दो घरचे
चंद्रिका पूर्ण चंद्राची ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कन्यादान

# कोकिळ कुहुकुहु बोले

कोकिळ कुहुकुहु बोले
तू माझा, तुझी मी झाले ॥ धृ ॥

ऋतुराजा तुझी वासंती
तरुतळी इथे एकांती
करकोमल देता हाती
चांदण्यात दिवसा न्हाले ॥ १ ॥

हिंदोलत डहाळीवरती
मोहरून आपुली प्रीती
निर्झरात टिपण्या मोती
पाखरु जीवाचे आले ॥ २ ॥

तू येता सखया जवळी
फुलवेल तरुला कवळी
मधुमरंद भरतो कमळी
पापणीत हसता डोळे ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कन्यादान

# माझिया नयनांच्या कोंदणी

माझिया नयनांच्या कोंदणी
उमलते शुक्राची चांदणी ॥ धृ॥

तम विरते रात्र सरते
पहाट-वारे झुळझुळते
प्राजक्ताचे तरु मोहरते
हृदयीच्या अंगणी ॥ १ ॥

प्रहर पहिला अविरत येतो
भूपाळीचे स्वर गुणगुणतो
अरुण मनाचा हर्ष रंगतो
पूर्वेच्या लोचनी ॥ २ ॥

दव बिंबातुनी क्षण सोन्याचा
उजळत राही जीव जिवाचा
स्वर्ग हासतो वसुंधरेचा
किरणा किरणातुनी ॥ ३ ॥

गायिका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कन्यादान

# मानसीचा चित्रकार तो

मानसीचा चित्रकार तो
तुझे निरंतर चित्र काढतो ॥ धृ ॥

भेट पहिली अपुली घडता
निळी मोहिनी नयनी हसता
उडे पापणी किंचित ढळता
गोड कपोली रंग उषेचे भरतो ॥ १ ॥

मम स्पर्शाने तुझी मुग्धता
होत बोलकी तुला न कळता
माझ्याविण ही तुझी चारुता
मावळतीचे सूर्यफूल ते करतो ॥ २ ॥

तुझ्यापरि तव प्रीतीसरिता
संगम देखून मागे फिरता
हसरी संध्या रजनी होता
नक्षत्रांचा निळा चांदवा धरतो ॥ ३ ॥

गायक : हृदयनाथ मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कन्यादान

# तू असता तर

तू असता तर, कधि नयनांनी
अश्रु ढाळले नसते झरझर ॥ धृ ॥

तू असता तर देवा पुढती
शरणांगत मी झाले नसते
म्हटले नसते आगतिक होऊन
करुणाकर तू या दीनेवर ॥ १ ॥

तू असता तर मायपित्यांचे
छत्र कृपेचे ढळले नसते
अनाथ दुबळी होऊन अशीरे
पडले नसते मी उघडयावर ॥ २ ॥

तू असता तर प्रीत तुझीही
दुःखद झाली नसती कधीही
रडते ती ही, रडते मी ही
काय करू मी तू नसल्यावर ? ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : कन्यादान

# डोळ्यांची सलामी झडली चारचौघात

अशी कशी गाठ तुझी पडली, नजर ही भिडली येऊन रंगात
डोळ्यांची सलामी झडली चारचौघात ॥ धृ ॥

तुम्हासाठी ल्याले सोनसळी शालु झोकात
झुलताती कर्णकुंडले नथणी नाकात
न्याहाळिते रूप ऐन्यात तुमच्या नैनात
का आला? काल स्वप्नात! सांगा कानात ॥ १ ॥

घ्या माझा हात गोंडस राया हातात
बोटानं सांगा बोटाला आपलं हृद्गत
मनगटी कमळाचा देठ धरा बळकट
झिणझिणती, कळ काकुळती, भरू द्या अंगात ॥ २ ॥

कमरपट्टा सैल कधि तंग होता कमरेला
पापणीत लाज बोलते तुमच्या शरमेला
दचकता मागं का सरता, भिता कोणाला
नाव जाता, घेईन मी तुमचं, पडता प्रेमात ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : सलामी

# पहिल्या प्रहरीं माझ्या दारीं

पहिल्या प्रहरी माझ्या दारी
सोन पाऊली सकाळ आली ।। धृ ।।

चंद्रमौळी घरात माझ्या
घेऊन संगे प्रकाश राजा
सूर्यफुलांच्या लेवुनी साजा
हासत गाली लक्ष्मी आली ।। १ ।।

उडवीत पाखरा हरखुन वारा
फुलवित चारा डुलवित शिवारा
गोठ्यात झरता अमृतधारा
सायीची बोटे चाखाया आली ।। २ ।।

रानफुलांचा उधळित गंध
तेजात न्हाला माझा आनंद
जिथे आनंद तिथे गोविंद
गोविंदाची ही राधिका आली ।। ३ ।।

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : सलामी

# आली प्रीत भेटीला

आली प्रीत भेटीला, धरु नका वेठीला
अहो राया तुम्ही. . . धरू नका वेठीला ॥ धृ ॥

नका रोखू नजर, नका धरू पदर
बिजलीची चाल माझी, लागू नका पाठीला ॥ १ ॥

टाकिते हा डाव, जिंकी मी गाव
हृदयाची पैज हीं, पदराच्या गाठीला ॥ २ ॥

ठायी ठायी बांधीन, मिरवीत जाईन
नाव रुपाचं सोनं, देहाच्या हो काठीला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : मलामी

# ओळख झाली काल

ओळख झाली काल–आज तुम्ही याल
चुकू चुकू बोले– मनाची ही पाल ॥ धृ॥

दिवसाच्या गळयामधि, गुंफुनिया हात
डोळीयाची बात करी, पुनवेची रात
गोरे तिचे गाल, होती लाजुनिया लाल ॥ १ ॥

हळुवार पाऊलांनी, मनामधे मन येई
मखमली पाकळ्यांचं फूल, गेलं मोहरूनी
गंध त्याचा घ्याल, कधी माझे तुम्ही व्हाल ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : मलामी

# पंख हवे मज पोलादाचे

पंख हवे मज पोलादाचे
शूर लढाऊ जटायूचे ॥ धृ ॥

सीतेपरि जो हरण करोनी
असह्य अबला नेईल कोणी
काळ फेक ती तिथे घालुनी
शील रक्षण्या स्त्री जातीचे ॥ १ ॥

निज जननीला मुक्त कराया
गरुड मागता अमृत ठेवा
तुच्छे हसता इंद्र देवा
वज्र तोडण्या त्या इंद्राचें ॥ २ ॥

गर्भ पिलांना सागर गिळता
क्रोधे उठली पक्षीण टिटवी
जळा पेटवी सागर आटवी
आगस्तीच्या सामर्थ्याचे ॥ ३ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : मीना मंगेशकर
चित्रपट : माणसाला पंख असतात

# आई कुणा म्हणू मी ?

आई कुणा म्हणू मी, तुजवीण सांग आई ?
इतुकेच सांगण्याला येशील का ग आई ? ॥ धृ ॥

तोडीत ना फुलाला वेलीस्वये कधीही
सोडून तू मुलाला गेलीस का ग आई ? ॥ १ ॥

रागावण्या तुलाही मजवीण बाळ नाही
बाळाविना तुलाही कोणी म्हणेल आई ? ॥ २ ॥

चुकतो असेन मी ग, म्हणतो तुला मी आई
चुकली ग तू परि का, होऊन माझी आई ? ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पुत्र व्हावा ऐसा

# यश हे अमृत झाले

यश हे अमृत झाले
सुख स्वर्गीचे आले ॥ धृ ॥

दिग्विजयाच्या मनोरथावर, नक्षत्रांचे झुलते अंबर
मागे पुढती राजपथावर, लक्षदीप लागले ॥ १ ॥

स्तुतिसुमनांचे उधळित शेले, जनगौरव तो जयजय बोले
कीर्तिध्वजावर लावून डोळे, भाग्य पुढे चालले ॥ २ ॥

वैभव मिरवीत मंदिरी येता, दिसेल डोळी ती मंगलता
सुख अंधारी मन व्याकुळता, दुःख सुखे हासले ॥ ३ ॥

गायक : तलत महमूद
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पुत्र व्हावा ऐसा

# बघता हसुनी तू मला

बघता हसुनी तू मला
का लाज वाटे मला ॥ धृ ॥

नकळत कितीदा येऊन मी
बसले तुजला बिलगुन मी
आजपरी मी आतुरलेली तुजजवळी यायला ॥ १ ॥

हसता हसता फुललेली
गोड कपोली खुललेली
मधुमासांची मोहक लाली, आज ती बघायला ॥ २ ॥

बावरले मी जवळी ये
स्वप्नी आपुल्या मजला ने
बोल मनीचे अबोल राणी, येता बोलायला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पुत्र व्हावा ऐसा

# जिथे सागरा धरणी मिळते

जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पाहाते ॥ धृ ॥

डोंगर दरिचे सोडून घर ते
पल्लव पाचूचे तोडून नाते
हर्षाचा जल्लोष करुनी जेथे
प्रीत नदी एकरूपते ॥ १ ॥

वेचित वाळूत शंख शिंपले
रम्य बाल्य ते जिथे खेळले
खेळाचा उल्हास रंगात येउनी
धुंदीत यौवन जिथे डोलते ॥ २ ॥

बघुनी नभीची चंद्रकोर ती
सागर हृदयी उर्मी उठती
सुख दुःखाची जेथे सारखी
प्रीत जीवना ओढ लागते ॥ ३ ॥

गायीका : सुमन कल्याणपूरकर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : पुत्र व्हावा ऐसा

# आज दिवाळी आली

आली दिवाळी आली दिवाळी
घर घर उधळित मानवतेच्या तेजाची पावली ॥ धृ ॥

नक्षत्रांचे बांधून तोरण
मनामनांचे करुनी मीलन
दिव्य ज्योत ही आनंद-हृदयी
गोविंदे लावली ॥ १ ॥

रत्नकांचनी लावुन ज्योती
मंगलमय सजवून आरती
बहीण लाडकी भाऊराया
ओवाळू लागली ॥ २ ॥

भावाविन हा दिन सोन्याचा
आज उदासिन या बहिणीचा
होउन बंधू ये रे चंद्रा
दीपांच्या राउळी ॥ ३ ॥

गायिका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बायकोचा भाऊ

# सुख येता माझ्या दारी

सुख येता माझ्या दारी
सुखासवे तो उदया येईल दिनसोन्याचा संसारी ॥ धृ ॥

सुवासिनीच्या देहतरुवर हर्ष-फुलांचा फुलता मोहर
गंधवती मी होऊन जाइन सुख देवाला सामोरी ॥ १ ॥

नेत्र शिंपली भरता स्वाती, आनंदाचे झरता मोती
पति प्रेमावर उधळित राहिन, मनोमनी का देव्हारी ॥ २ ॥

अमर सुखाची पडता दृष्टी, उजळुन जाता जीवनसृष्टी
उणे न काही सुखरुप मीही, सर्व सुखाच्या मंदिरी ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बायकोचा भाऊ

# शिकवतेस तू

तो– शिकवितेस तू शिकता शिकता
सहज मजकडे बघता बघता
ती– बघायलाही तुम्ही शिकवीता
सहज मजकडे बघता बघता
तो– तुझी पापणी ती ढळलेली
गूज मनीचे लिहिते गाणी
ती– कळते मजला तुम्ही वाचता
सहज मजकडे बघता बघता ॥ १ ॥

ती– स्पर्श सारखा पुसतो काही
हर्ष मनाचा अबोल राही
तो– परी बोलकी तुझी मुग्धता
सहज मजकडे बघता बघता ॥ २ ॥

तो– करिशी वेणी मागे पुढती
निळी पाखरे नयनी उडती
ती– हसता मजला अर्थ लागता
सहज मजकडे बघता बघता ॥ ३ ॥

ती– चंपक गोऱ्या रोमांचातुन
गीत सुगंधी येता बहरुन
तो– बावरशी का प्रीत गुंजता
सहज मजकडे बघता बघता ॥ ४ ॥

गायीका : आशा भोसले
गायक : दशरथ पुजारी
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बायकोचा भाऊ

# कोकिळा गा...

कोकिळा गा, गा गा रे
भूलोकीच्या गंधर्वा तू, अमृत संगीत गा ॥ ॥

सप्तसुरांचा स्वर्ग उभारुन
चराचराना दे संजीवन
अक्षय फुलवित हे नंदनवन पर्णफुलातुन गा ॥१॥

कुहूकुहू बोलत मधुर गायनी
मोहित होता सारी अवनी
कुसुम-कोमला ही वनराणी नाचत थयथय गा ॥२॥

मन्मथ मनीचा इंद्रधनूला
शर पंचम तो लावुनी आला
प्रीत भेटता अनुरागाला मीलन होउन गा ॥३॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : बायकोचा भाऊ

# पाहिलेस तू ऐकिलेस तू

पाहिलेस तू ऐकिलेस तू
काय पुन्हा रे सांगू ?
अपराधाविन कठोर शासन कुठवर मी साहू ? ॥ धृ ॥

काळजातील धागे तोडून
घरधनी जाता घर हे सोडून
पतिप्रेमाविन कर हे जोडून
काय तुला मागू ? ॥ १ ॥

येऊ नये ती वेळ येऊन
प्रपंच पूजा गेली उधळून
आसवांची माळ ही ओवून
सांग कुणा वाहू ? ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगित : वसंत प्रभू
चित्रपट : बायकोचा भाऊ

# माझ्या संग राया तुम्ही भांडणार कधी?

माझ्या संग राया तुम्ही भांडणार कधी?
तण तण तण तण तंडणार कधी? ॥ धृ ॥

चोरुन बघता, खुदकन हसता
दूर दूर सरता, जवळी बसता
नको मला अळणी, ही मन मिळणी
धसकन् हात माझा वडणार कधी? ॥ १ ॥

शब्दाचा मार द्या, प्रीतीला चिडवा
जीवाचं कोंबडं, शर्थीनं लढवा
जिथं तिथं अडवुन घडीभर, रडवून
काळजाचं पाणी पाणी करणार कधी? ॥ २ ॥

रागासाठी लोभ, माझा द्या सोडून
घेतली शपथ, एकदा मोडून
कुलपात कोंडून, छळवाद मांडून
पुरषाची जात तुम्ही दावणार कधी? ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
सिनेमा : सुंदरा मनामधे भरली

# छुन छुन बोलतीया हातामधी घाट

छुन छुन बोलतीया हातामधी घाट
प्रीत माझी चालतीया जेजुरीची बाट ॥ धृ ॥

मार्गसर आलाबाई बाळपण गेलं
अंगामधी अंग असं चोरटं आलं
डोईमधी मरवा साज संग हिरवा
मोतियाचा गजरा भरजरी थाट ॥ १ ॥

काल माझा झाला राया साखरपुडा
देवाच्या नावानं रं भरलाय् चुडा
लाजरी बुजरी पोर झाली नवरी
पापणीनं धरलाय अंतरपाट ॥ २ ॥

नजरेच्या पाखरा मारु नको खडं
काळजात धडधड येऊ नको पुढं
लागाबांधा तोड रं नाद माझा सोड
मल्हारीची नार मी, हट, सोड माझी वाट ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
सिनेमा : सुंदरा मनामधे भरली

# पहिल्या प्रहरी देतो दर्शन

पहिल्या प्रहरी देतो दर्शन
गृहलक्ष्मीला तो नारायण ॥ धृ ॥

घरच्या आपुल्या गोड फुलांचे
घेतो अलगद पहिले चुंबन
पतिव्रतेच्या परमेशाचे
हसुनी उघडी प्रेमळ लोचन ॥ १ ॥

मम आईचे होता दर्शन
सहस्र करांनी करितो वंदन
भावभक्तीचे अर्घ्य अर्पिता
होतो नराचा तो नारायण ॥ २ ॥

पर्णकुटीच्या कौलावरती
उधळी दिनभर कांचन कणकण
सायंतनीला देवापुढती
रत्नदीप तो जातो उजळुन ॥ ३ ॥

---

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : आई कुणा म्हणू मी



ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

# उन्हात घर हे, आपुले बाळा

उन्हात घर हे, आपुले बाळा
नशीब हसते, हसु दे त्याला
चिंता सारी भगवंताला ॥ धृ ॥

अन्नपाणी कोण देतो ?
पाषाणातील मंडुकाला
दिधली ज्याने भूकतहान ही
शमवायाची फ़िकिर तयाला ॥ १ ॥

वस्त्र पांघरुण कोण पुरविते ?
वनात उघड्या पशुपक्ष्यांना
दिधला ज्याने अंगपिंड हा
झाकायाची लाज तयाला ॥ २ ॥

माणसाचा जन्म चांगला
ज्या देवाने आपणा दिधला
सांगितले रे त्या देवाला
नशीब छळते छळू दे त्याला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : आई कुणा म्हणू मी

# मीच देवकी मीच यशोदा

मीच देवकी, मीच यशोदा
ये गोपाला, ये गोविंदा ॥ धृ ॥

प्रेमजलाने न्हाऊ घालिन
गालबोट हे रूपा लाविन
सजविन नटविन जवळी घेऊन
चाखिन मी या मकरंदा ॥ १ ॥

क्षणात हसतो क्षणात रडतो
ऊन पाऊस घरात पडतो
यमुनेपरी तो पूर चढतो
ह्या आईच्या आनंदा ॥ २ ॥

घुंगुरवाळा तुझा वाजतो
रोमांचातुनि निनाद उठतो
बाळ मला हो आई म्हणतो
मायेचा हा लागा बांधा ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : लक्ष्मी आली घरा

# चंपक गोरा कर कोमल हा

चंपक गोरा कर कोमल हा, करात तुझिया देते;
नेशील तेथे येते ॥ धृ ॥

चैत्रतरुंच्या छायेमधला गोड गारवा प्रेमे कवळू
फुलाफुलांच्या हृदयामधला मधुमासाचा सुगंध उघळू
पवनामधुनी सूर गुंजता, तुझे गीत मी गाते ॥ १ ॥

निळ्या नभाचे तेज उतरता मोहक सुंदर वातावरणी
दोन मनांचा संगम बघुनी हसू लागली ही जलराणी
लाजत लाजत प्रीत देखणी जिथे मोहुनी बघते ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : लक्ष्मी आली घरा

# रामाविना एकली सीता वनवासा चालली

रामाविना एकली सीता वनवासा चालली ॥ धृ ॥

चालत पायी ती अनवाणी
माय धरेने व्याकुळ होउनी
लेकीसाठी काळजाची पायघडी घातली ॥ १ ॥

विकल मनाने रामाभवती
अश्रुफुलांच्या रचल्या भिंती
पतिव्रतेच्या शीर्षावरती स्वर्ग धरी साउली ॥ २ ॥

सोडुनी काशी परत फिरावी
माहेराला नदी जान्हवी
स्त्री जन्माची कठोरता ही, करुणस्वरे बोलली ॥ ३ ॥

गायक : जितेंद्र अभिषेकी
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : लक्ष्मी आली घरा

# मी नाही कुणाची

मी नाही कुणाची, नाही कुणाची
मी आज बहिण हो भावाची ॥ धृ ॥

मायपित्याची पूजा करिते
चरणधूळ ही भाळी लाविते
हात जोडुनी क्षमा मागते, लेक नव्हे मी तुमची ॥ १ ॥

अमृत ज्योति नयनी लाविन
डोळे भरुनी तुजला पाहिन
देवा आधी तुज ओवाळिन, पंचारती प्राणांची ॥ २ ॥

जन्मो जन्मी तुझीच ताई
असा धाकला होऊन भाई
नको भेट रे याहून काही, मजला भाऊबिजेची ॥ ३ ॥

गायिका : आशा भोसले
संगीत : यशवंत देव
चित्रपट : सुखी संसार

# मूर्तिमंत भगवंत भेटला

मूर्तिमंत भगवंत भेटला
दे कंठ कोकिळे मला ।धृ।।

मधुमास जीवनी आज अचानक आला
आम्रतरु मोहरला
पर्णपाचूच्या पडद्याआडून
भक्तिभाव हासला ।।१।।

या अभागिनीने, प्रसन्न प्रभुला
या नयनी पाहिला
कृपा तयाची मिळता मजला
भाग्य अर्पिते तुला ।।२।।

गायीका : आशा भोसले
संगीत : राम कदम
चित्रपट : छंद प्रीतीचा

## जयजय रामकृष्ण हरी

पुंडलिका भेटी आले जगजेठी
उभे विटेवरी चंद्रभागे तिरी ॥ धृ ॥

मुक्तीचे माहेर, भक्तीचे सासर
संतांची पंढरी चंद्रभागेतीरी ॥ १ ॥

वैराग्याचा पाया, घाली ज्ञानराया
चौकोनी चौफेरी चंद्रभागेतीरी ॥ २ ॥

नाथ जनार्दन वाही कावडीनं
पाणी जन्मभरी चंद्रभागेतीरी ॥ ३ ॥

नामयाची वीट, जनी सांधे नीट
चोख्याची पायरी चंद्रभागेतीरी ॥ ४ ॥

गायक : स्नेहल भाटकर आणि इतर
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट : नांदायला जाते

# नांदायला जाते मी नांदायला जाते

नांदायला जाते मी नांदायला जाते
गावासंग नावाचा निरोप घेते ॥ धृ ॥

उठू नका पावणं तिथंच बसा
पदरानं माझ्या डोळं पुसा
रडव्या गालात खुदकन् हसा
हसून खुदूखदू मी पण जाते ॥ १ ॥

शनिवारी नारळ देवाला फोडा
सात फेऱ्या काढा हात दोन्ही जोडा
जेवतानं नावानं तुकडा मोडा
उचकी लागता पाणी मी पिते ॥ २ ॥

मोत्याची बांगडी घडवा अशी
हाताचं माप राया तुमच्यापाशी
शिंप्याला सांगा वाढवा ठुशी
झोपाळा बांधा बाई पंचमीला येते ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
सिनेमा : नांदायला जाते

# सजू मी कशी ? नटू मी कशी ?

सजू मी कशी ? नटू मी कशी ?
चोरुन सांग तुला भेटू मी कशी ? ॥ धृ ॥

रुप्याचं जोडवं बोटात कचतंय्
तुरुतुरु चालता खण्खण् वाजतंय्
गावाला कळतंय्, चालू मी कशी ? ॥ १ ॥

लज्जेला लागता वाकडी नजर
गोरट्या हातानं सावरता पदर
काकणांचा गजर, थांबवू कशी ? ॥ २ ॥

झोकदार नथनी कानात डूल
उरात फुलतंय चाफ्याचं फूल
वासाची भूल ही, छपवू कशी ? ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
चित्रपट: नांदायला जाते

# शेत बघा आलय् राखणीला

शेत बघा आलय् राखणीला
सोन्याचं घुंगरु गोफणीला ॥ धृ ॥

लखलख पाचूचा हिरवा वाडा
रोखलाय वाऱ्यानं तेजाचा घोडा
गव्हाल्या गाईचा अवखळ पाडा
धन्यानं बांधलाय् दावणीला ॥ १ ॥

मोत्याची नथनी मराठमोळी
लज्जेची लेणी अंगभर ल्याली
सोन्याच्या पाऊली लक्ष्मी आली
राहिली जन्माची चाकरीला ॥ २ ॥

एकीच्या सुखाला लावता पिडा
पाखरांनो उडा नजरेत दडा
गोफणीत घुमतोय विषारी खडा
नका गणू गुजावण देखणीला ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : वसंत प्रभू
सिनेमा : नांदायला जाते

# कुणी न मालक, कुणी न सेवक

कुणी न मालक, कुणी न सेवक
जनता येथे राज्य करी
हरिचे प्यारे हरिजन सारे समतेच्या मंदिरी ॥ धृ ॥

गगनभेदी उंच हवेली
तिथेच काही दीन झोपडी
शाल पांघरुन धनिक झोपतो
वस्त्राविन ही गरिबी उघडी
धनिक न कोणी, गरीब न कोणी, एक चूल ती घरोघरी ॥ १ ॥

प्रत्येकाचे नाव प्रभू तो
कणाकणावर सदैव लिहितो
ज्याचे त्याला कण ते मिळता
कोण उपाशी कसा राहतो ?
कुणी न उपाशी, कुणी न आधाशी, नसेल जेथे कुणी भिकारी ॥ २ ॥

मायपित्याचे दर्शन घ्याया
वंचित झालो आम्ही लेकरे
बंधमुक्त हो त्यास कराया
एक जुटीने चला चला
आम्ही न साधु, आम्ही न भोंदु, सत्यशांतीचे आम्ही पुजारी ॥ ३ ॥

गायक : जयवंत कुलकर्णी आणि इतर
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : मायमाऊली

# खरा ब्राह्मण नाथची झाला

खरा ब्राह्मण नाथची झाला
जो महारा घरी जेवला ॥ धृ ॥

गोदावरीचे करुनी स्नान
पवित्र पावन नाथ देखुन
दृष्ट थुंकितो अंगावरती
क्रोध जाळितो शंभरवेळा ॥ १ ॥

पददलिताचे मूल तान्हुले
रडता स्फुंदुन कडे घेतले
मुके पटापट घेता त्याचे
हसवी खुदुखुदु बालप्रभुला ॥ २ ॥

मुके जनावर व्याकुळलेले
मार्गी पाहुन नाथ धावले
गंगाजळ ते मुखी घालता
पाषाणाला पाझर फुटला ॥ ३ ॥

पुढील पानावर

(मागील पानावरुन)

घरात आमुच्या पुरणपोळी
तुमच्यासाठी नाथा केली
महाराची ती पोर बोलता
बोट धरूनी संत चालला ॥४॥

धूप घालता सुवास सुटला
मागे पुढती पाट मांडिला
नाथाने मुखी घास घालता
पुंडलिक वरदा हरी बोलला ॥५॥

गायक : सुधीर फडके
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : मायमाऊली

# चंद्रकला रुक्मिणी नेसली

चंद्रकला रुक्मिणी नेसली
पाहता दर्पणी का हसली ? ॥ धृ ॥

काजळ काळे भरता डोळी
प्रतिबिंबातुन दिसु लागली
श्रीकृष्णाची मूर्त सावळी
भीमक बाला लाज लाजली ॥ १ ॥

दूता करवी पत्र धाडिले
श्रीकृष्णाने तुझ्या वाचले
गोड कपोली उत्तर आले
प्रीत कंचुकी तिला बोलली ॥ २ ॥

वधु नियोजित ती शिशुपाला
मुहूर्त मंगल समीप आला
उभी राऊळी उदास बाला
तोच हरिची मुरली वाजली ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : मायमाऊली

# प्रीत माझी पाण्याला जाते

एक हात तुझा, एक हात माझा,
घागर उचलुनी घेते
प्रीत माझी पाण्याला जाते ॥ धृ ॥

गव्हाळी वाणाचा हसरा मुखडा
फुलकळी नाकाला, नथीचा आकडा
हेरला प्रीतिनं गुलजार फाकडा
चोरुनि त्याला भेटाया जाते ॥ १ ॥

मोहर आंब्याला पहिला आला
मैनेला राघू भेटुनि गेला
लागला पिकाला पाण्याचा लळा
कुहुकुहु गीत कोकिळा गाते ॥ २ ॥

चंद्रकळा, नेसून
बाई सुगंधी साज
शपथ गळ्याची घेणार आज
खुदुखुदु गाली हसली, लाज बाई
रंगले गुलाबी प्रितीचे नाते ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : दत्ता डावजेकर
चित्रपट : सून लाडकी या घरची

# टक टक नजर, पडतो पदर

टक टक नजर, पडतो पदर
नार तोऱ्यात नखऱ्यात चालते
डाव्या डोळ्याची शीळ अशी घालते ॥ धृ ॥

सळसळ शालू भरजरी हिरवा
उरात घुमतोय ज्वानिचा पारवा
घमघम वासाचा डोईत मरवा
काळ्याभोर केसात गजरा माळते ॥ १ ॥

रंगानं सावळा, दिसायला देखणा
मनात भरला वळखीचा पावणा
नजरेला नजर बाई ग, तुझी माझी जुळते ॥ २ ॥

पदराचा पतंग व्हटात धरला
धुंदीचा वारा अंगात शिरला
मनाचा भवरा गरगर फिरला
मदनाच्या मिठीत ही, कमळण डुळते ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : दत्ता डावजेकर
चित्रपट : सून लाडकी या घरची

# आठवणींनो, उघडा डोळे

घरास माझ्या परतुनि आले
आठवणींनो, उघडा डोळे ॥ धृ ॥

मायपित्याविण पोर पोरकी
तुम्हीच मजला पोटी धरले
दहीभाताचा घास भरविता
लहानाची मज मोठी केले ॥ १ ॥

गौरीहर इथे पूजिला
वाजत गाजत सासरी गेले
मिठी मारता कर थरथरले
आसवाचे अमृत प्याले ॥ २ ॥

मोठ्याची मी सून होता
नाही बघवले ह्या दैवाला
आठवणींनो, नयनी बघु द्या
कशी वागले कशी मी चुकले ? ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : दत्ता डावजेकर
चित्रपट : सून लाडकी या घरची

# तुजसाठी शंकरा

तुजसाठी शंकरा भिल्लीण मी झाले
धुंडित तुज आले ॥ धृ ॥

अंजन चर्चून चंद्रमुखाला, शामल सुंदर बनले
मृगाजिनाची कंचुकी घालून प्रतिबिंबाला हसले ॥ १ ॥

नयनामधल्या जलगंगेला दुःख प्रीतिचे कथिले
म्हणते गंगा, ब्रह्म कधी का मायेवरती रुसले ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : स्नेहल भाटकर
चित्रपट : चिमुकला पाहुणा

# भक्तिच्या फुलांचा बोलतो सुवास

भक्तिच्या फुलांचा बोलतो सुवास
तुझा देव येतो तुला भेटण्यास ॥ धृ ॥

चंदनाचा देह उटी उगाळीत
प्राणदीप माझा लावीं फुलवात
धूप जाळी देवा अंतरीचा ध्यास ॥ १ ॥

देवा तुझ्यावरी जीव फुल वाही
नामाची तुझीया आरती मी गाई
ध्यानमग्न होता या हो सावकाश ॥ २ ॥

पडता घरात देवाचे पाऊल
जाहले घराचे मंगल देऊळ
नित्य घडो देवा तुझा सहवास ॥ ३ ॥

गायीका : सुमन कल्याणपूरकर
संगीत : राम कदम
चित्रपट : आई कुणा म्हणू मी

# गंगेचं पाणी पाटाला

गंगेचं पाणी पाटाला
सोन्याची घागर रहाटाला
अमृताची चव पाण्याला
देवाचा बैल रं माझ्या घाण्याला
पूर्व दिशेला अरुण रथावर
ध्वज सोन्याचा झळकत सुंदर ॥ धृ ॥

पर्णामधुनी किरण कोवळे
चिलापिलांचे उघडी डोळे
पंख उभारूनी उडती गगनी
सप्तसुरांनी उजळे अंबर ॥ १ ॥

अरुण उषेच्या मीलन काळी
प्राजक्ताच्या झाडाखाली
फुले वेचती भरुनी ओंजळी
गुंफीन प्रभूला माळ मनोहर ॥ २ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट : धर्मकन्या

# चोच जयाने दिधली बाळा

चोच जयाने दिधली बाळा
घास द्याया विसरलेला
कळुनी येता चूक आपुली
देव नाही जेवलेला ॥ धृ ॥

अनंत कोटी जीव जिवांचा
पोशिंदा तो प्रभू एकला
सर्वामुखी तो घास भरविता
असेल शिणला चालुन थकला
भूक आमची मिठी मारता
गहिवरुनी तो व्याकुळलेला ॥ १ ॥

अश्रु ढाळित येता धावत
सीमेवरती दिन मावळता
चंद्रमौळी घर हे आपुले
अंधारातच शोधित आला
मिटल्या नयनी येईल स्वप्नी
घास आपणा भरवायाला ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट : धर्मकन्या

# गोड गोजरी लाज लाजरी

गोड गोजरी लाज लाजरी ताईच होणार नवरी
फुला फुलांच्या बांधुन माळा मंडप घाला ग दारी ॥ धृ ॥

करकमलाच्या देठावरती चुडा पाचुचा वाजे
हळदीहुनही पिवळा बाई रंग तुला तो साजे
अंगणी फुगडी नाचे
रूप पाहुनी तुझे, साद घाली मणी मंगळ सरी ॥ १ ॥

भरजरीचा शालु नेसुनी, जाई, ताई आमुची गोरी
लग्न-मंडपी तिच्या समोरी, उभी तिकडची स्वारी
अंतरपाट धरी, शिवापार्वती वरी, लाडकी ही जाई ताई ॥ २ ॥

मंगेशकर कोरस
संगीत : हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट : धर्मकन्या

# सखी ग, मुरली मोहन मोही मना

सखी ग, मुरली मोहन मोही मना!
गाऊ किती पुन्हा पुन्हा, त्याच्या गुणा ॥ धृ ॥

शृंगाराची प्रीत करिता चिंतन
अनुराग त्याचा देता आलिंगन
चंदनाचा गंध येत पंचप्राणा ॥ १ ॥

कानी येता ज्याच्या बासरीचे सूर
कालिंदीला येता आनंदाचा पूर
गोपिकांच्या घरी प्रीतीचा पाहुणा ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट : धर्मकन्या

# पैठणी बिलगुनी म्हणते मला

पैठणी बिलगुनी म्हणते मला
जानकी वनवास ग संपला ॥ धृ ॥

हर्षित होऊनिया सुंदरी
वल्कले फेकुन दे तू दुरी
गोजिरा गजरा माळून शिरी
लाव तू भाळी कुंकुम-टिळा ॥ १ ॥

पाहुनी रूप तुझे देखणे
जाहली लज्जित ही भूषणे
पतिप्रेमाचे उधळित सोने
प्रीतीचा दिवाळसण तो आला ॥ २ ॥

गायीका : लता मंगेशकर
संगीत : हृदयनाथ मंगेशकर
चित्रपट : धर्मकन्या

## मी वारकरी आगळा

पर्णपाचू सावळा सावळा, विठ्ठल माझा मळा
मी वारकरी आगळा ॥ धृ ॥

समानतेच्या विहिरीमधली पुण्याईची चंद्रभागा
न्हाऊ घालते पावन करते चराचरातील पांडुरंगा
पाटामधुनी तीर्थ चालले, पिकवित कांदा, भाजी मुळा ॥ १ ॥

मणिमोत्यांचा मंदील बांधुन डुलत शिवारी राव जोंधळा
विठ्ठल नामे कणकण टिपतो पाखरांचा हसरा मेळा
उसात भरता रसाळ गोडी मोर सांगतो निळा ॥ २ ॥

तीर्थरूप त्या प्राणपित्याची मीच समाधी बांधलेली
भावभक्तीची फुले वाहिली हात जोडून सांजसकाळी
या मातीचा अबिर कपाळी, भक्त पुंडलिक पुत्र खुळा ॥ ३ ॥

गायक : सुधीर फडके
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : भालू

# इतुकेच विचारू का ?

इतुकेच विचारू का
दिनदुबळ्या या लेकिची
आई झालीस का ? ॥ धृ ॥

आईबापावीण पोर पोरकी
बघुनी ज्याचे मन कळकळले
मायेने मज पोटी धरले
अपराधाविण देव माणसा
शिक्षा केलीस का ? ॥ १ ॥

घाव विषारी सोशित सखया
अखेरची तो घटका मोजीत
वाचविण्या त्या प्राणसख्याला
या लेकीचे आयुष्य उरले
घेऊन जाशील का ? ॥ २ ॥

उग्रचंडीके आसुरमर्दिनी
दुष्ट मारिसी त्रिशुल फेकुनी
ब्रिद तुझे ते स्मरुनी आता
तुझ्या कृपेचा मळवट भाळी
आई भरशिल का ? ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : भालू

# मनात नसता काही गडे

मनात नसता काही गडे
का प्रीत तयावर तुझी जडे ॥ धृ ॥

मंदिरात मी हात जोडिता
अनोळखी तो जवळी येता
बघता बघता हरवून जाता
का नेत्रपाखरु तुझे उडे ॥ १ ॥

किंचित हसता, किंचित फसता
रूपदेखणे प्रीत लाजता
विसरेना ते विसरू जाता
का उघडया नयनी स्वप्न पडे ॥ २ ॥

शतजन्माचे बंधन बांधुन
हिरवे कंकण करात घालुन
प्रीत तिकडची कुंकू लाविता
का हळदीचे ते ऊन पडे... ॥ ३ ॥

गायीका : आशा भोसले
संगीत : विश्वनाथ मोरे
चित्रपट : भालू

गंधफुलांचा गेला सांगून
तुझे नि माझे व्हावे मीलन.

गायक :- सुधीर फडके
सं. दि. :- विश्वनाथ मोरे
चित्रपट :- भाकू

२५७६
२४८३४
काव्य २६८५८(४)
REFBK-0024434
REFBK-0024434